# प्रथम वर्ष कला

# तत्त्वज्ञान अभ्यासपत्रिका क्र. १

# सत्र - १

# नैतिक तत्त्वज्ञान

# विषय कोड : UBA 1.26

© UNIVERSITY OF MUMBAI

**डॉ. सुहास पेडणेकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रा. प्रकाश महानवार**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रा. अनिल आर. बनकर,**
सहयोगी प्राध्यापक इतिहास आणि सहाय्यक संचालक व
प्रभारी अध्ययन साहित्य विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. अनिल आर. बनकर**
सहयोगी प्राध्यापक आणि
प्रभारी अध्ययन साहित्य विभाग,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**संपादक** : **डॉ. साहेबराव निगळ**
निवृत्त प्राध्यापक,
तत्त्वज्ञान विद्यापीठ, पुणे

**लेखक :** : **प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक**
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख
जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणे

: **डॉ. सुगीता पांडे**
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख
आदर्श महाविद्यालय, बदलापूर,

: **डॉ. सुनीलदत्त गवरे**
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख
शिवळे महाविद्यालय, शिवळे

: **डॉ. नारायण गडदे**
तत्त्वज्ञान विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई

: **डॉ. सुनीलदत्त गवरे**
तत्त्वज्ञान विभाग,
शासकीय विधी महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई

**डिसेंबर २०२०, प्रथम वर्ष कला, तत्वज्ञान अभ्यासपत्रिका क्र. १, नैतिक तत्त्वज्ञान**

**प्रकाशक :** प्रभारी संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी :** अश्विनी आर्टस्,
गुरुकृपा चाळ, एम्. सी. छगला मार्ग, बामणवाडा,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०९९.

**मुद्रण** :

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **सत्र - १** | |
| १) | नैतिक तत्त्वज्ञानाची प्रस्तावना | ०१ |
| २) | भारतीय तत्त्वज्ञानाच्या संदर्भातील नैतिकता | २१ |
| ३) | शुभ (चांगले) जीवन : ग्रीक नैतिक चिंतन | ३८ |
| ४) | आम्ही मुक्त आहोत का ? स्वातंत्र्य आणि नियतत्ववाद | ४९ |


❖❖❖❖

# F.Y.B.A. PAPER - I

# MORAL PHILOSOPHY

# SEMESTER - I

**Unit 1:Introduction to Moral Philosophy [ 15 lectures]**

(a) Definition, nature and scope (branches) of philosophy

(b) Nature of moral philosophy (facts and values; intrinsic and extrinsic values) and areas of ethics (descriptive ethics, normative ethics, meta-ethics and applied ethics)

(c) Ethical Relativism: arguments defending this position; critical evaluation

**Unit 2: Moral concepts in Indian Philosophy [ 15 lectures]**

(a) Philosophy of non-attachment (Nishkama karma yoga)

(b) Sthitaprajna: the moral ideal

(c) Concepts of Rta, Rna, and Purusartha

**Unit 3: The Good Life: Greek Ethics [ 15 lectures]**

(a) Socratic Ethics: virtue is knowledge; can ethics be taught?

(b) The Four Virtues: Plato (in the context of Republic)

(c) Ethics of Character: Aristotle

**Unit 4: Are we Free?: Freedom and Determinism [ 15 lectures]**

(a) Determinism: types of determinism: scientific determinism, religious determinism (i.e. predestination) and fatalism; critical appraisal of determinism

(b) Indeterminism (i.e. libertarianism): arguments in support of free will; agency theory of freedom; critical appraisal of indeterminism

(c) Compatibilism: reconciling determinism and freedom

❖❖❖❖

विभाग-१

# घटक -१

## नैतिक तत्त्वज्ञानाची प्रस्तावना

## (INTRODUCTION TO MORAL PHILOSOPHY)

**घटक रचना :**

१.० उद्दिष्ट्ये
१.१ प्रस्तावना
१.२ तत्त्वज्ञानाच्या व्याख्या, स्वरुप व शाखा
१.३ नैतिक तत्त्वज्ञानाच्या व्याख्या व स्वरूप
१.४ नैतिक तत्त्वज्ञानाच्या शाखा
१.५ नैतिक सापेक्षतावाद
१.५.१ नैतिक सापेक्षतावादाचे प्रकार
१.५.२ रुथ बेनेडिक्ट यांचे नैतिक सापेक्षवादाचे विवेचन
१.५.३ मूल्यमापन
१.६ सारांश
१.७ विद्यापीठीय दीर्घोत्तरी प्रश्न

### १.० उद्दिष्ट्ये

- तत्त्वज्ञानाचा अर्थ व अभ्यासविषय समजून घेणे.
- तत्त्वज्ञानाच्या विविध शाखांची ओळख करुन घेणे.
- नैतिक तत्त्वज्ञानाचा (नीतिशास्त्राचा) अर्थ व अभ्यास विषय जाणून घेणे.
- नीतिशास्त्राच्या शाखांची माहिती करुन देणे.
- संस्कृतीमधील भिन्न भिन्न असणाऱ्या नीतिशास्त्राच्या संकल्पनांची जाणीव व त्यांचे महत्त्व ओळखता येईल.

### १.१ प्रस्तावना

मनुष्य एक बुद्धिमत्ता असलेला जीव आहे. त्याला सुट्या-सुट्या अनाकलनीयघटनांच्या गोंधळामध्ये जगणे अशक्य आहे. त्याच्या अवतीभोवती घडणाऱ्या घटनांचासंदर्भ लागला नाही तर संपूर्ण विश्व त्याला परके होऊन जाते. सभोवार असणाऱ्या सृष्टीचे अंतिम स्वरुप कसे आहे हे

जाणून घेण्याची मनुष्याची एक आंतरिक प्रेरणा असते. अंतिम सत्ता शोधण्याचा प्रयत्न दुहेरी असतो. तो म्हणजे ज्ञान आणि

**व्यवहार्यता; सिद्धान्त आणि आचरण.**

अंतिम सत्तेविषयीच्या चिंतनात्मक व समीक्षात्मक शोधातून तत्त्वज्ञान निर्माण होते. या विश्वात घडणाऱ्या घटनांचे एक सुसंगत स्पष्टीकरण तत्त्वज्ञान देऊ शकते. तसेच या विश्वामध्ये कार्यरत असलेल्या शक्तींचा मागोवा सुद्धा तत्त्वज्ञानामध्ये घेतलाजातो. म्हणजेच तत्त्वज्ञान विचारांची एक पद्धतशीर गुंफण आहे.

अंतिम सत्तेचा शोध घेताना मानवी मनाची व्यावहारिक बाजू सुद्धा कार्यरत असते. सभोवरची परिस्थिती जाणून घेऊन योग्य तो प्रतिसाद देण्याच्या क्षमतेवर मनुष्याचे अस्तित्व अवलंबून आहे. ज्ञानाची उपयुक्तता प्रतिसाद देण्याच्या क्षमतेमधून सिद्ध होते. बाह्य परिस्थिती नुसार योग्य निर्णय घेण्याच्या बौद्धिक परिपक्वतेवर मानवी अस्तित्व अवलंबून असते. मानवी मनाची ही बाजू नीतिशास्त्राच्या उगमास कारणीभूत आहे.

नीतिशास्त्र अथवा नैतिक तत्त्वज्ञानातील प्रश्न मानवी अस्तित्व तसेच एकासुसंघटीत, सुसंगत अश्या नैतिक जीवन जगण्यासाठी आवश्यक बाबींचा विचार यातूनउद्‌भवतात. मनुष्य अन्य जीवांपेक्षा अधिक विवेकशील जीवन जगणारा प्राणी आहे.मनुष्याला सत्याचे आकलन होते, शुभची प्राप्ती करुन घेता येते व सौंदर्याची निर्मितीकरता येते. बौद्धिक व्यवहार्यतेमधून मनुष्याने नैतिकतेचा मोठाच प्रवास केला, सहजप्रवृत्तीनुसार आचरण करणाऱ्या मनुष्याने तर्काधिष्ठित आचरणास सुरवात केली. मनुष्यसमूहाच्या बाह्य नियमांपेक्षा स्वतःच्या सारासार विवेक बुद्धीला अनुसरुन स्वतःच्यापरमप्राप्तव्याकडे वाटचाल करु लागला आहे. सूज्ञ मनुष्य सत्य, शुभ (कल्याण) वसौंदर्य या मानवी आदर्शाची एकात्मता साधू पाहतो.

## १.२ तत्त्वज्ञानाच्या व्याख्या, स्वरुप व शाखा :

तत्त्वज्ञान विचारांची पद्धतशीर मांडणी आहे. जीवनाचा अर्थ व जीवन मूल्यांचे आकलन तत्त्वज्ञानामुळे होते. अंतिम सत्ता काय आहे, ज्ञानाची मूलतत्त्वे काय आहेतह्याचा शोध तत्त्वज्ञानात घेतला जातो. आपल्या सर्व अनुभवांचा सुसंगत अर्थ लावणे,त्यांचे सुसंघटीत स्वरुप दर्शविणे हे तत्त्वज्ञानाचे काम आहे. Philosophy हा शब्द philosophia ह्या ग्रीक शब्दापासून आलेला आहे. त्याचा अर्थ ज्ञानाचा शोध अथवा शहाणपणाचे प्रेम असा होतो. तत्त्वचिंतक हाज्ञानाचा शोध घेणारा, ज्ञानाचा प्रेमी असतो. प्लेटोच्या मते संपूर्ण सृष्टीच्या प्रवाहाकडे तटस्थपणे, स्थिरपणे पाहणारा प्रेक्षक म्हणजे तत्त्वचिंतक होय. सुरवातीच्या काळामध्येतत्त्वज्ञान म्हणजे कोणतेही ज्ञान संपादन करण्याची तळमळ होती. त्याचा अभ्यासविषयविशिष्ट किंवा मर्यादित नव्हता.

भारतामध्ये तत्त्वज्ञानाला 'दर्शन' म्हटले जाते. दर्शन म्हणजे 'दृष्टि' व'दृष्टिसाठी उपयुक्त' साधने होय. भारतीय तत्त्वज्ञानाचा उगम अंतिम सत्तेची अनुभूती घेण्याच्या उत्कट इच्छेतून झाला आहे. त्याची बीजे उपनिषदांमध्ये सापडतात. तत्त्वज्ञानाचा उगम कुतूहल आणि आश्चर्य भावनेतून झाला आहे. ह्यानिसर्गातील घटना, पाऊस, वादळे तसेच आकाशात दिसणारे

सूर्य, चंद्र व तारे याविषयी मनुष्याच्या मनात कुतूहल होते. हे निसर्गातील चमत्कार नेमके कसे घडतातह्याचे कोडे सोडविण्याचे प्रयत्न त्याने बुद्धिच्या सहाय्याने केले. हळूहळू आश्चर्य भावनेचेरुपांतर चिंतनामध्ये झाले. निसर्गातील चमत्कार एक किंवा अधिक मूल तत्त्वांच्यासहय्याने स्पष्ट होऊ लागले. तत्त्वज्ञानाची चिंतनात्मक तत्त्वमीमांसा म्हणून अभिव्यक्तीहोऊ लागली. दृश्य असणाऱ्या भौतिक वस्तू व घटनांचा शोध व हळूहळू त्यामागीलतत्त्वांचा शोध झाला. तत्त्वज्ञान प्रथम भौतिक व त्यानंतर अधिभौतिक तसेच गूढानूभूतीयांची चिकित्सा करु लागले.

**१.२.१ तत्त्वज्ञानाच्या व्याख्या व स्वरुप:**

आपल्या अवतीभोवती जे काही आहे ते (तत्), त्याचे सार म्हणजे तत्त्व होय. विश्वाचे एकूण आस्तित्व, त्याचा आशय म्हणजे विश्वाचे तत्त्व होय. ह्या तत्त्वाचे स्वरुप जाणण्याचा प्रयत्न म्हणजे तत्त्वज्ञान होय. म्हणून तत्त्वज्ञानाची नेमकी व्याख्या करणेअतिशय कठीण आहे. तत्त्वज्ञानाची व्याख्या करण्याचे अनेक प्रयत्न आजवर झालेआहेत त्यातील काही व्याख्या व स्वरुप आपण जाणून घेऊ या.

**१. तत्त्वज्ञान इंद्रियगोचर विश्वाला आधार असणाऱ्या अनुभवातीत सत्तेचा अभ्यास करते:**

तत्त्वज्ञान अंतिम सत्तेचा शोध आहे. हे विश्व आपल्याला पंचेंद्रियांद्वारे समजते. आपली ज्ञानेंद्रिये ह्या विश्वाचे वास्तविक ज्ञान करुन घेण्यास असमर्थ ठरतात. तत्त्वज्ञानाचे उद्दिष्ट आपल्या अनुभवांच्या पलीकडे असणाऱ्या अंतिम सत्तेचे ज्ञान करुन घेणे हे आहे. जडद्रव्य, आत्मतत्त्व, ईश्वर, दिक्, काल या सारख्या संकल्पनांचा आपण प्रत्यक्ष अनुभव घेऊ शकत नाही. आपल्याला अनुभवास येणाऱ्या विविध भौतिक गोष्टींमध्ये काही समान तत्त्व असल्याची जाणीव आपणास होत असते. विविध, विभिन्न वस्तुंमागील एकता समजून घेण्याचा प्रयत्न तत्त्वज्ञानामध्ये केला जातो. उदा. प्रकाश कमी जास्त झाल्यावर एकच वस्तु विविध रंगछटा दर्शविते. त्यामुळे वस्तुचा नेमका रंग कोणता आहे हा प्रश्न उपस्थित होतो. बाह्य परिस्थिती बदलत असताना वस्तूचे मूलभूत स्वरुप काहीतरी वेगळेच असावे असे तर्कनिष्ठ बुद्धीला जाणवत राहते. विविध अनुभवांमधून प्रकट होणाऱ्या त्या एकाच अंतिम सत्तेचा शोध घेण्याचा प्रयत्न तत्त्वज्ञान करते.

**२. तत्त्वज्ञान समग्रतेचा दृष्टिकोन आहे:**

तत्त्वज्ञान अंतिम सत्याचा शोध घेत असल्यामुळे त्याचे स्वरुप अत्यंत व्यापक आहे. विविध ज्ञानशाखा विश्वाच्या विशिष्ट क्षेत्राचा अभ्यास करतात. मानसशास्त्र मानवी मनोव्यापारांचा अभ्यास करते. खगोलशास्त्र आकाशस्थ ग्रहगोलांचा व त्यातील घडामोडींचा अभ्यास करते. भौतिकशास्त्र जड वस्तूंशी संबंधित आहे.

तत्त्वज्ञान कोणत्याही एका विशिष्ट क्षेत्राशी संबंधित नसून संपूर्ण मानवी जीवन व त्याच्या सभोवारची परिस्थिती त्यांच्याशी संबंधित आहे. जड द्रव्य तसेच सचेतन मनोव्यापार; आत्मतत्त्व तसेच ईश्वर तत्त्व, दिक्-काल कार्यकारण संबंध, त्यांचे परस्परसंबंध, उद्दिष्टचे या सर्वांची चिकित्सा तत्त्वज्ञान करते. विल ड्यूरँटच्या मते, तत्त्वज्ञान म्हणजे समग्र अनुभवाचा किंवा विशिष्ट अनुभवाचा समग्रतेच्या संदर्भामध्ये अभ्यास होय.''

तत्त्वज्ञान म्हणजे विविध शाखेतील ज्ञानकणांची एक सूत्रबद्ध मालिका आहे. तत्त्वज्ञान आपल्यासमोर विश्वातील वेगवेगळ्या तत्त्वांचे एकत्रित असे संयुक्तिक चित्र उभे करते.

### ३. तत्त्वज्ञान म्हणजे सुसंगतपणे प्रश्न सोडविण्याचा आटोकाट प्रयत्न होयः

तत्त्वज्ञान चिंतनात्मक आहे. त्यातील प्रश्न अत्यंत व्यापक व अंतिम स्वरुपाचे असतात. तत्त्वज्ञानात काहीच गृहीत धरले जात नाही. आपल्या सर्व अनुभवांना तर्कशुद्धतेचा निकष लावून त्यांचे परीक्षण तत्त्वज्ञानात केले जाते. त्यामुळे तत्त्वज्ञान म्हणजे अंतिम सत्याचा शोध घेण्यासाठी केलेली अविरत चिकित्सा आहे. अत्यंत तर्ककठोरपणे प्रश्नांची उत्तरे शोधताना ह्या विश्वाचे सुसंगत आकलन होऊ शकते. सुसंगतपणे प्रश्न सोडवितांना चुकीच्या कल्पना, संदिग्ध संकल्पना, पूर्वग्रह यांचा त्याग केला जातो. व ह्या विश्वाचे तर्कसंगत आकलन होऊ शकते. म्हणून प्लेटोच्या मते तत्त्वज्ञान म्हणजे सुसंगतपणे तर्कनिष्ठतेने प्रश्न सोडविण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न आहे.

### ४. तत्त्वज्ञान विविध ज्ञानशाखांमधील सिद्धांन्ताचा समन्वय करतेः

हर्बट स्पेन्सर च्या मते तत्त्वज्ञान एक सुसंघटित ज्ञान आहे. तत्त्वज्ञान जणू एक समवायी सेंद्रिय रचना आहे. त्यातून वेगवेगळ्या ज्ञानशाखांच्या तत्त्वांचे अनुमान काढले जाऊ शकते. विविध शास्त्रे जे निष्कर्ष स्थापित करतात त्यांच्यातील सुसंगती व एकात्मता दर्शविण्याचे कार्य तत्त्वज्ञान करते.

हर्बर्ट स्पेन्सरच्या विचारांना संश्लेषणात्मक तत्त्वज्ञान म्हटले जाते. स्पेन्सरच्या मते तत्त्वज्ञान विशिष्ट शास्त्रानी स्थापन केलेल्या सिद्धान्तांची समन्वयात्मक संरचना करणारे विश्वव्यापी शास्त्र आहे.

### ५. तत्त्वज्ञान सर्व शास्त्रांची जननी आहेः

जीवन एक संघर्ष असून त्यात टिकून राहण्यासाठी ज्ञान आवश्यक आहे. अस्तित्वाच्या संघर्षामध्ये विशिष्ट पद्धतीचे किंवा विशिष्ट क्षेत्राचे ज्ञान प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या वेगवेगळ्या ज्ञानशाखा म्हणजेच शास्त्रे निर्माण झाली.

कुतूहलामधून प्रश्न उपस्थित करुन त्या त्या प्रश्नांची उत्तरे शोधत असताना ज्ञानसाठा निर्माण होत गेला. ज्या प्रश्नांची उत्तरे मिळाली त्यांची वेगवेगळी शास्त्रे बनत गेली. एकेकाळी भौतिकशास्त्र हे नैसर्गिक तत्त्वज्ञान होते. प्राणीशास्त्र, मानसशास्त्र इ. तत्त्वज्ञानातूनच विकसित झालेली शास्त्रे आहेत. त्यामुळे तत्त्वज्ञानाला सर्व शास्त्रांची जननी म्हटले जाते. तत्त्वज्ञानाला शास्त्रांचे शास्त्र व सर्व शास्त्रांची साम्राज्ञी असेही म्हटले जाते..

### ६. तत्त्वज्ञान संकल्पनांचे विश्लेषण आहेः

ए. जे. एअर सारखे विश्लेषणवादी तत्त्वचिंतक असे मानतात की तत्त्वज्ञानाचा अनुभवातीत संकल्पनांशी काही संबंध नाही. मानवी अनुभव हाच तत्त्वज्ञानाचा अभ्यास विषय आहे. तत्त्वज्ञानातील सर्व प्रश्न भाषेशी संबंधित आहे. अनेक संकल्पनांचे अर्थ सुस्पष्टपणे न कळल्यामुळे गंभार प्रश्न निर्माण होतात. उदा. जड, द्रव्य, चैतन्य तत्त्व, सत्यता, शुभ, सौंदर्य, धर्म, राष्ट्रीयत्व, मैत्री, प्रेम इत्यादि यासारख्या संकल्पनांचे अर्थ वेगवेगळ्या रुपाने अभिव्यक्त होतात. काही वेळा तर त्यांचे सिद्धान्त एकमेकांच्या विरोधी ठरतात. ॲरिस्टॉटलच्या मते कार्यकारण संबंध मूलभूत संकल्पना आहे. तर ह्यूमच्या मते असा संबंध अस्तित्वात नाही.

आजच्या युगात मैत्री, प्रेम तसेच राष्ट्रीयत्व, देशप्रेम या सारख्या संकल्पनांचे अर्थ निर्धारित करीत असताना समाजामध्ये गंभीर समस्या निर्माण होत आहेत. अशा संकल्पनांचे

नेमके सुस्पष्ट अर्थउलगडून सांगितले गेले तर तत्त्वज्ञान मानवी अनुभवांशी व मानवी व्यवहारांशी जोडले जाईल. विश्लेषणवादी तत्त्वज्ञांच्या मते भाषेचे विश्लेषण करणे हे तत्त्वज्ञानाचे कार्य आहे.

हा विचार सॉक्रेटीसच्या मतांशी जुळणारा आहे. सॉक्रेटीसच्या मते तत्त्वचिंतकाचे काम संकल्पनांचा सुस्पष्ट, बिनचूक व निश्चित अर्थ प्रकट करण्यास मदत करण्याचे आहे. सॉक्रेटीसच्या मते प्रत्येक मनुष्य विवेकनिष्ठ जीव आहे. प्रत्येक व्यक्तीच्या मनात ज्ञान सुप्त अवस्थेत असते. तत्त्वचिंतकाचे काम मानवी मनातील ज्ञान विश्लेषणाद्वारे व्यक्त करविणे हे आहे. एक सुईण बाळास जन्म देत नाही पण त्याला या जगामध्ये येण्यास मदत करते. त्याप्रमाणेच तत्त्वचिंतक कोणतेही ज्ञान नव्याने निर्माण करीत नाही परंतु विश्लेषणाद्वारे व्यक्तीच्या मनातील अव्यक्त ज्ञानाला आविष्कृत होण्यास मदत करतो.

### १.२.२ तत्त्वज्ञानाच्या शाखा:

तत्त्वज्ञानाचा अभ्यासविषय अतिशय व्यापक आहे. तत्त्वज्ञानामध्ये विविध प्रकारच्या समस्यांचा विचार केला जातो. या समस्यांच्या स्वरुपानुसार तत्त्वज्ञानाच्या विविध शाखा होतात.

**१. सत्ताशास्त्र :** सत्ताशास्त्र अथवा सद्वस्तूमीमांसा अंतिम सत्तेविषयीच्या प्रश्नांचा अभ्यास करते. या शाखेचे दोन उपविभाग आहेत. वस्तुमीमांसा अंतिम सत्तेच्या स्वरुपाविषयी चिकित्सा करते. विश्वशास्त्र भौतिक विश्वाच्या स्वरुपाचा अभ्यास करते.

**२. ज्ञानमीमांसा:** या शाखेमध्ये मानवी ज्ञानाचा आधार, स्वरुप व ज्ञानाची साधने यांचा अभ्यास केला जातो.

**३. तर्कशास्त्र :** तर्कशास्त्र युक्तिवादांतील तत्त्वे व त्यांच्या पद्धतिंची चिकित्सा करते. योग्य व अयोग्य युक्तिवादांतील फरक तर्कशास्त्रामुळे करता येतो.

**४. नीतिशास्त्र :** मानवी आचरण, चारित्र्य व जीवनमूल्ये यांच्याशी संबंधित असलेली ही शाखा नैतिक तत्त्वज्ञान म्हणूनही ओळखली जाते. जीवनाच्या व्यावहारिक बाजूशी नीतिशास्त्र संबंधित आहे.

**५. सौंदर्यशास्त्र :** सौंदर्य ह्या मानवी मनाच्या भावनिक बाजूशी संबंधित प्रश्नांची चिकित्सा सौंदर्यशास्त्र करते. याच्या क्षेत्रामध्ये मानवी भावना, कला निर्मिती, साहित्य निर्मिती व त्यामधील तत्त्वे, यांचा समावेश होतो.

**६. धर्माचे तत्त्वज्ञान :** या शाखेमध्ये धर्मामधील विविध धारणांचा अभ्यास केला जातो. ईश्वर, दुरित, कर्मकांड इत्यादि धार्मिक संकल्पनांसाठी बुद्धिनिष्ठ स्पष्टीकरण तसेच समर्थन करण्याचा प्रयत्न या शाखेमध्ये केला जातो.

**७. विश्लेषणात्मक तत्त्वज्ञान :** तत्त्वज्ञानातील समस्या प्रामुख्याने भाषेचे प्रश्न असून संकल्पनांचे विश्लेषण या शाखेमध्ये केले जाते.

**८. सामाजिक तत्त्वज्ञान :** व्यक्तीचे सामाजिक संस्थांशी असलेले संबंध तसेच ह्या संस्थांचे आंतर-संबंध यांचा अभ्यास सामाजिक तत्त्वज्ञानात केला जातो.

**९. राजकीय तत्त्वज्ञान :** राज्याचे आदर्श, त्याचे कार्य यांचा विचार राजकीय तत्त्वज्ञानात केला जातो.

प्रत्येक ज्ञानशाखेचा उगम तत्त्वज्ञानातून झाला आहे. मानवी ज्ञानाचा अधिकाधिक विस्तार होत असताना तत्त्वज्ञानाच्या नवनवीन शाखा उदयास येत आहेत. उदा. व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान, शिक्षणाचे तत्त्वज्ञान, इतिहासाचे तत्त्वज्ञान इ.

**आपली प्रगती तपासा**

१) 'तत्त्वज्ञान' शब्दाचा अर्थ काय आहे ?
२) तत्त्वज्ञान समग्रतेचा दृष्टिकोन कश्या प्रकारे आहे ?
३) तत्त्वज्ञानाची विश्लेषक दृष्टिकोनातून व्याख्या काय आहे ?
४) तत्त्वज्ञानाच्या शाखा कोणकोणत्या आहेत.

## १.३ नैतिक तत्त्वज्ञानाच्या व्याख्या व स्वरुप

प्लेटोच्या मते तत्त्वज्ञान आश्चर्य भावनेचे अपत्य आहे. आपल्या सभोवार असलेल्या विश्वाच्या स्वरुपाविषयीच्या तसेच माणसांच्या वर्तनाविषयीच्या कुतुहलातून ज्ञान प्राप्त करुन घेण्याची प्रक्रिया सुरु होते. मानवी आचरणामध्ये दिसून येणाऱ्या मूल्यांविषयीच्या कुतुहलातून नैतिक तत्त्वज्ञान अथवा नीतिशास्त्र उदयास आले. मनुष्याच्या वर्तनामध्ये अधिक उच्चतम, श्रेष्ठ अशा आदर्शाचा शोध जाणवत असतो. मानवी कृती काही ध्येयाने प्रेरित झालेल्या असतात. मनुष्य जीवनाच्या सर्वश्रेष्ठ ध्येयाला परमप्राप्तव्य, शुभ, कल्याण, इष्ट, परम ध्येय, Summum Bonum असेही संबोधिले जाते. सर्वश्रेष्ठ ध्येयाला अनुलक्षून मानवी कृतीचे मूल्यमापन नीतिशास्त्रात केले जाते.

### १.३.१ नैतिक तत्त्वज्ञानाच्या व्याख्या:

नैतिक तत्वज्ञान अथवा नीतिशास्त्रास इंग्रजी भाषेमध्ये Ethics अथवा Moral Philosophy असे म्हटले जाते. Ethics हा शब्द Ethos ह्या ग्रीक शब्दावरुन आला आहे. Ethos म्हणजे चालीरीती, सवयी किंवा रुढी होय. Moral हा शब्द Mores ह्या लॅटीन शब्दा वरुन आला आहे. त्याचाही अर्थ चालीरीती, सवयी किंवा रुढी असा होतो. त्यामुळे शब्दशः अर्थ घेतल्यास नीतिशास्त्र हे चालीरीती, सवयी किंवा रुढींचे शास्त्र आहे. रुढी किंवा चालीरीती ह्या एखाद्या विशिष्ट समूहाने मान्यता दिलेल्या कृती असतात. त्या समूहाचा घटक असलेल्या व्यक्तीने विशिष्ट रुढी अथवा चालीरीतीप्रमाण आचरण करणे त्या व्यक्तीसाठी बंधनकारक ठरते. पाश्चात्य परंपरेनुसार नैतिक तत्त्वज्ञानाचा उदय ग्रीस देशामध्ये झाला व त्याचे श्रेय ॲरिस्टॉटल या ग्रीक तत्त्वचिंतकाला दिले जाते.

'नीती' हा शब्द 'नी' ह्या धातूपासून बनला आहे 'नी' म्हणजे नेणे. आपणास आयुष्याच्या मार्गावरुन नीटपणे घेऊन जाते ती 'नीती' ती होय. नीतिशास्त्र म्हणजे आदर्श जीवनाच्या रीतीचे शास्त्र होय.

नैतिक तत्त्वज्ञान अथवा नीतिशास्त्राच्या अभ्यासविषय स्पष्टीकरण करणाऱ्या विविध व्याख्या दिल्या जातात. त्या पुढीलप्रमाणे-

- पॉल्सनने नीतिशास्त्राची व्याख्या ''रुढी अथवा नीतिमत्ता यांचे शास्त्र'' अशी केली आहे.
- मॅकेन्झीच्या मते, 'नीतिशास्त्र आचरणाच्या इष्टतेसंबंधी अथवा योग्यतेसंबंधी एक चिकित्सा होय. नितिशास्त्र मानवी आचरणाचे सिद्धान्त सांगून इष्टानिष्टता आणि योग्यायोग्यता ह्यांच्या संदर्भात मानवी कृतींचे मूल्यमापन करते.''
- सेथ च्या मते 'इष्टतेसंबंधीचे शास्त्र ह्या दृष्टीने मानवी ध्येय आणि कर्तव्य ह्यांचे सर्वोत्तम असे शास्त्र म्हणजे नीतिशास्त्र होय. '
- जदुनाथ सिन्हा यांची नीतिशास्त्राची व्याख्या, ''जीवनात अनुस्यूत असलेल्या परमप्राप्तव्याची मीमांसा म्हणजे नीतिशास्त्र होय. ''
- विलियम लिली यांची व्याख्या सर्वव्यापी व अधिकयोग्य आहे. नीतिशास्त्र हे समाजात राहणाऱ्या मानवांच्या आचरणाचे आदर्शी शास्त्र असून ह्या आचारणाच्या इष्टानिष्टतेसंबंधी आणि योग्यायोग्यतेसंबंधी निर्णय देणारे शास्त्र आहे.

### १.३.२ नैतिक तत्त्वज्ञानाचे स्वरुपः

नीतिशास्त्राच्या उपरोक्त व्याख्यामधून नैतिक तत्त्वज्ञानाचे स्वरुप पुढील प्रमाणे सांगता येईल :-

**नीतिशास्त्र एक शास्त्र आहेः**

एखाद्या विशिष्ट प्रकारच्या घटनांविषयीचे व्यवस्थाबद्ध व जास्तीत जास्त परिपूर्ण ज्ञान म्हणजे शास्त्र होय. घटनांचे निरीक्षण, वर्गीकरण व स्पष्टीकरण या तीन पायऱ्यांमधून विशिष्ट प्रकारच्या घटनासमूहामध्ये सूत्रबद्धता आणली जाते.

नीतिशास्त्र शास्त्रीय पद्धतीच्या वरील तिन्ही पायऱ्यांचा अवलंब करते. आपल्या सामाजिक जीवनामध्ये आपण मानवी वर्तनाविषयी निंदात्मक अथवा प्रशंसात्मक विधाने करीत असतो. मानवी आचरणाचे व अश्या प्रकारच्या नैतिक विधानांचे निरीक्षण तसेच वर्गीकरण नीतिशास्त्र करीत असते. नैतिक विधानांचा परस्परांशी तसेच आदर्शाशी कसा संबंध आहे ह्याचे स्पष्टीकरण नीतिशास्त्र करते.

**नीतिशास्त्र एक आदर्शी शास्त्र आहेः**

मानवी मनाचे चिंतनक्षमता, भावात्मकता व क्रियात्मकता असे तीन पैलू आहेत. चिंतनक्षमतेमुळे मनुष्य ज्ञानाचा शोध घेतो व सत्य जाणण्याचा प्रयत्न करतो. मनुष्याला भावात्मकतेमुळे मनोविकारांचा (भावनांचा) अनुभव येतो व सौंदर्याची निर्मिती केली जाते. क्रियात्मकतेमुळे मनुष्य अनुभव येणाऱ्या वस्तुस्थितीच्या पलीकडे जाऊन शुभ (कल्याण) प्राप्त करुन घेण्याचा करतो. म्हणजेच मनुष्य जीवनाची सत्य, सौदर्य व शिव (शुभ/कल्याण) ही तीन

अंतिम ध्येये आहेत. ह्या तीन अंतिम ध्येयांवर आधारित तीन प्रकारची शास्त्रे उदयास आली. सत्य ह्या आदर्शाचा अभ्यास तर्कशास्त्र करते. सौंदर्य या आदर्शाचा अभ्यास सौंदर्यशास्त्रामध्ये केला जातो. नीतिशास्त्र शिव (शुभ/कल्याण) या ध्येयाचा अभ्यास करते. त्यामुळे नीतिशास्त्र, तर्कशास्त्र व सौदर्यशास्त्र ही तीनही आदर्शी शास्त्रे ठरतात. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र ह्या सारख्या नैसर्गिक अथवा वर्णनात्मक शास्त्रांपेक्षा आदर्शी शास्त्र भिन्न असते.

नैसर्गिक शास्त्रांमध्ये वस्तुस्थितीचे यथार्थ वर्णन केलेले असते. ही शास्त्रे घटनांशी संबंधित असतात. आदर्शी शास्त्र मूल्यांशी अथवा आदर्शांशी संबंधित असते. नैसर्गिक शास्त्रे काय आहे याचा विचार करते तर आदर्शी शास्त्र काय असावयास हवे याचा विचार करते.

नैसर्गिक शास्त्रांमध्ये घटनांची कारणे त्यांच्या विकासाच्या अवस्था सांगून घटनांचे स्पष्टीकरण केले जाते. आदर्शी शास्त्रांमध्ये मूल्यांचे विवेचन केले जाते. परंतु त्यांचा उगम अथवा विकास याबद्दल काहीच स्पष्टीकरण केले जात नाही.

नैसर्गिक शास्त्रांचे कार्य मापनाचे असून प्रत्येक शास्त्र त्याच्या क्षेत्रातील तथ्यांचे यथार्थ बारकावे नोंदविते. आदर्शी शास्त्रांचे कार्य मूल्यमापनाचे आहे. मानवी कृतींचे इष्ट किंवा अनिष्ट, योग्य किंवा अयोग्य असे मूल्यमापन नीतिशास्त्र करते.

नैसर्गिक शास्त्रांमधील नियमांची अथवा तत्त्वांची सिद्धता दिली जाते. त्यात घटनांकडे बघण्याचा दृष्टिकोन तर्कनिष्ठ असतो. आदर्शी शास्त्रांमधील मूल्यांची सिद्धता देता येत नाही. मूल्यांची केवळ प्रशंसाच केली जाऊ शकते. तसेच नेमकी कोणती मूल्ये आचरणात आणावीत हे मनुष्याची संकल्पशक्ती ठरविते, बुद्धी नाही.

नैसर्गिक शास्त्रांमधील विधानांना तथ्यविषयक (वर्णनात्मक) विधाने म्हटले जाते. अशी विधाने सत्य किंवा असत्य यापैकी एक  असतात. आदर्शी शास्त्रांमधील विधानांना मूल्यविषयक विधाने (निर्णय) म्हटले जाते. अशी  मूल्यविषयक विधाने सत्य किंवा असत्य म्हणता येत नाहीत.

नैसर्गिक शास्त्रांच्या बाबतीत मनुष्याचा ज्ञानविषयक भाग महत्त्वाची भूमिका पार पाडतो. आदर्शी शास्त्राच्या बाबतीत मनुष्याचा क्रियाशीलतेचा भाग म्हणजे मनुष्याची संकल्पशक्ति अत्यंत जोरकसपणे कार्यरत असतो.

**नीतिशास्त्र मानवी आचरणाच्या आदर्शांचे शास्त्र आहे:**

नीतिशास्त्र मानवी चालीरीतींचे अथवा सवयींचे शास्त्र आहे. जीवन म्हणजे कृतींची एक अखंड मालिका आहे.  वारंवार केलेल्या कृतींची सवय बनते व सवयीतून व्यक्तीचे चारित्र्य घडत जाते. व्यक्तीचे चारित्र्य त्याच्या आचरणामधून प्रकट होते.

स्पेन्सरच्या मते आचरण म्हणजे कृतींचे ध्येयाशी समायोजन होय. एखादे विशिष्ट ध्येय प्राप्त करुन घेण्यासाठी व काही साधने निवडून केलेली सहेतुक कृती म्हणजे आचरण होय. आचरण हे एका विशिष्ट ध्येयाने (आदर्शाने) प्रेरित झालेले असते. म्हणून नीतिशास्त्र मानवी आचरणातील आदर्शाचे शास्त्र आहे.

**नीतिशास्त्र मानवी कृतींचे मूल्यमापन करते:**

नैतिकतेचा विचार मानवी कृतींशी संबंधित असतो. नीतिशास्त्र मानवी आचरणाची म्हणजेच मनुष्याच्या सहेतुक कृतींची आदर्शाशी तुलना करुन त्या कृतींचे मूल्यमापन करते. मूल्यमापन करताना त्या सहेतूक कृतींना इष्ट किंवा योग्य तसेच अनिष्ट किंवा अयोग्य ठरविले जाते.

Right (योग्य) हा शब्द लॅटिन भाषेतील (Rectus) या शब्दापासून आला आहे. Rectus ह्या शब्दाचा अर्थ ''नियमानुसार'' असा होतो. कोणताही नियम काही अन्य ध्येय प्राप्त करण्याचे साधन असतो. नियम स्वतः साध्य नसतो.

(Good) इष्ट हा शब्द जर्मन भाषेतील Gut या शब्दापासून तयार झाला आहे. Gut या शब्दाचा अर्थ कोणत्याही ध्येयास उपयुक्त असा होता. त्यामुळे इष्ट हा शब्द ध्येय तसेच ध्येयाप्रत जाण्यास उपयुक्त या अर्थाने वापरला जातो.

आचरण म्हणजे ध्येयांशी कृतींचे समायोजन होय. जर हे समायोजन नियमानुसार असेल तर ते आचरण योग्य ठरते. जर असे समायोजन ध्येय प्राप्त करुन घेण्यास उपयुक्त असेल तर असे आचरण इष्ट असते. नियमबाह्य कृती अयोग्य असते व ध्येयाप्रत जाण्यास अयशस्वी ठरलेली कृती अनिष्ट असते.

मानवी ध्येये व ध्येयासाठी उपयुक्त साधने यांच्या आधाराने मानवी आचारणाचे मूल्यमापन नीतिशास्त्रामध्ये केले जाते.

**आपली प्रगती तपासा :**

१. नीतिशास्त्राची व्याख्या कश्या प्रकारे केली जाते ?
२. नैतिक तत्त्वज्ञानाचा अभ्यास विषय काय आहे ?
३. मानवी मनाचे कोणकोणते पैलू आहेत ?
४. नीतिशास्त्रास आदर्शी शास्त्र का म्हणतात ?

**नीतिशास्त्र : सैद्धान्तिक शास्त्र की व्यावहारिक शास्त्र ?**

अनेक पाश्चात्य तत्त्वचिंतकांच्या मते नैतिक तत्त्वज्ञान हे व्यावहारिक किंवा उपयोजित शास्त्र नाही. व्यावहारिक शास्त्र आपणास 'कसे करावे' याचे ज्ञान देते. विशिष्ट ध्येय तसेच ध्येयप्राप्तीची साधने याचे मार्गदर्शन व्यावहारिक शास्त्रांमध्ये केले जाते. वैद्यकशास्त्र हे एक व्यावहारिक शास्त्र आहे. चांगले आरोग्य म्हणजे नेमके काय तसेच चांगले आरोग्य कोणत्या मार्गाने प्राप्त होते. आरोग्य बिघडल्यास रोग दूर कसे करावे ह्या सर्व बाबींचे मार्गदर्शन

वैद्यकशास्त्रात केले जाते. पाश्चात्य विचारवंतांच्या मते नीतिशास्त्र सिद्धान्तांची स्थापना करते. परंतु जीवनाची ध्येये प्राप्त कशी होतील याचे मार्गदर्शन करीत नाही.

भारतीय परंपरेमध्ये नीतिशास्त्र एक व्यावहारिक शास्त्र आहे. बहुतेक भारतीय दर्शने मोक्ष हे जीवनाचे परमप्राप्तव्य मानतात. त्याचबरोबर मोक्ष हे सर्वोच्च ध्येय प्राप्त करुन घेण्यासाठी विशिष्ट आचरण संहिता निर्धारित करतात. योग दर्शन, बौद्ध दर्शन, जैन दर्शन तसेच वेदान्त दर्शन त्यांच्या अनुयायांसाठी विशिष्ट मार्ग आखून देतात. श्रीमद्‌भगवद् गीतेमध्ये तर व्यक्तीची नेमकी कर्तव्ये सुद्धा सांगितली गेली आहेत.

**नीतिशास्त्र कला नाही:**

नीतिशास्त्र मनुष्याच्या जीवनाच्या व्यावहारिक बाजूशी म्हणजे आचरणाशी संबंधित आहे. त्यामुळे असा प्रश्न उपस्थित होतो की चांगले आचरण आत्मसात करता येते का? ज्या प्रमाणे संगीत, नृत्य, चित्रकला इत्यादि कला वारंवार विशिष्ट कृती केल्याने शिकता येतात. त्याप्रमाणे नीतिमान बनणे शिकता येईल का? मॅकॅन्झीने ह्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी नीतिशास्त्र व कला यांची तुलना केली. त्याच्या मते नीतिशास्त्र कला नाही. चांगल्या आचरणाची कला शिकता येणार नाही. मॅकॅन्झीच्या मते नीतिशास्त्र व कला यांतील भेद पुढील प्रमाणे आहे:-

मॅकॅन्झीच्या मते कला एक विशिष्ट क्षेत्राशी संबंधित असते तर नीतिशास्त्र संपूर्ण मानवी जीवनाशी संबंधित असते. कलेचे क्षेत्र मर्यादित असून आचरणाचे व नैतिकतेचे क्षेत्र अत्यंत व्यापक आहे.

ज्या व्यक्तीमध्ये कलाकृती निर्माण करण्याचे सामर्थ्य असते तो कलाकार ठरतो. परंतु चांगली कृती करण्याचे सामर्थ्य असणारा माणूस नीतिमान ठरत नाही. जो प्रत्यक्षात नीतीने वागतो तो माणूस चांगला माणूस ठरतो.

एखाद्या कलाकृतीचे मूल्यमापन करताना त्या कलाकाराचा अंतस्थ हेतू लक्षात घेतला जात नाही. मानवी आचरणाचे मूल्यमापन करताना कर्त्याचा अंतस्थ हेतू निर्णायक असतो.

कलाकार कालांतराने आपली कला सोडून देऊ शकतो. गायक गाणे गाण्याचे थांबवू शकतो व तरीही तो जिवंत असेतो किंवा त्याच्या मृत्युनंतरही तो गायकच राहतो. सद्‌गुणी माणूस जिवंत असेपर्यंत सदाचरणी असावयास हवा. ज्यावेळी त्याचे आचरण योग्य रहात नाही त्यावेळी तो सद्‌गुणी रहात नाही. कलेपासून निवृत होता येत नाही.

मॅकॅन्झी चे हे विचार आजच्या युगातही महत्त्वाचे आहेत. आज अनेक नवनवीन अभ्यासक्रम उदयास येत आहेत. विशेषतः व्यक्तिमत्त्व विकासाचे अभ्यासक्रम. मॅकॅन्झीच्या मते आचरणाची कला आत्मसात करता येणार नाही. चांगले आचरण व नैतिकता ही व्यक्तीची आंतरिक बाजू आहे. अभ्यासक्रमामधून बाह्य वर्तन शिकविले जाऊ शकते. परंतु मनुष्याच्या चारित्र्यामधील सद्‌गुण शिकविले जाऊ शकतील काय ? व्यक्तिमत्व विकासाच्या शिबिरामधून व्यक्ती खरोखर नीतिमान बनू शकेल का हा प्रश्न अनुत्तरीत राहतो.

**नीतिशास्त्र मूल्याशी संबंधित आहे:**

नीतिशास्त्र मानवी आचरणाच्या इष्टतेसंबंधी अथवा योग्यतेसंबंधी चिकित्सा करते. नीतिशास्त्रातील प्रश्न मूल्यांशी संबंधित असतात. मूल्यविषयक निर्णय इंद्रियानुभव, बुद्धि व

अंत:प्रेरणा यातून दिले जातात. नैतिक तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून मूल्य म्हणजे काय योग्य आहे, काय इष्ट आहे तसेच मानवी जीवनात काय महत्त्वाचे आहे किंवा इच्छा करण्यासारखे आहे ते होय. मूल्यांचा संबंध कृतीची निवड करण्याशी येतो. ज्या कृतीमुळे जीवनाचे संवर्धन होते अश्या कृतीची निवड करावयास हवी. अंतिम सत्ता आणि अंतरात्मा, निसर्ग आणि चैतन्य यांच्या आंतरक्रियेमधून मूल्ये निर्माण होत जातात. यातून मानवी अस्तित्व अधिकाधिक समृद्ध होत जाते. मानवी मूल्ये ही विकसित होत जाणाऱ्या मनाला जाणविलेल्या अंतिम सत्तेच्या स्वरुपाच्या खाणाखुणा आहेत. कान्ट ने अस्तित्व आणि मूल्य यातील फरक दर्शविला आहे.

**तथ्य आणि मूल्ये :** नैसर्गिक शास्त्रे तथ्यांशी संबंधित असतात. जे अस्तित्वात 'आहे' त्याच्याशी तथ्ये जोडलेली असतात. विशिष्ट दिक्‌काल मध्ये असणाऱ्या वस्तू किंवा घडणाऱ्या घटनांना तथ्य म्हटले जाते. मानवी अनुभवाच्या कक्षेमध्ये जेवढे जाणवते त्याच्या पलीकडे तथ्यांना अन्य काही सुप्त अर्थ नसतो. घटनांचे वर्णन करता येते. तथ्य म्हटले की ते सत्य आहे असे गृहीत धरले जाते. तथ्य सभोवार असणाऱ्या विश्वाच्या माहितीचा एक अंश असते. तथ्याचा संबंध मानवी बुद्धीशी असतो.

आदर्शी शास्त्रे मूल्यांशी संबंधित असतात. मूल्यांचा संबंध 'काय असावयास हवे' याच्याशी असतो. जीवनामध्ये ज्यांचा मागोवा घ्यावा, ज्यांना साध्य मानावे अश्या गोष्टी म्हणजे मूल्य होय. मूल्ये नेहमीच घटनांच्या, तथ्यांच्या पार्श्वभूमीवर असतात आणि त्यांची अंतर्मनाने जाणीव होते. मूल्ये आदेशात्मक आणि मूल्यांकन करणारे असतात. विश्व जड द्रव्य, दिक्, काल, कारणता या धाग्यानी बनलेलेआहे. मूल्ये ह्या विशिष्ट चौकटीच्या कक्षेबाहेर तसेच अधिक श्रेष्ठ असतात. मूल्यांना सत्य अथवा असत्य म्हणता येत नाही. मूल्ये मानवी मनाच्या भावात्मक भागाला संतुष्ट करतात.

अन्य जड वस्तूंप्रमाणे मूल्यांना भौतिक अस्तित्व नसते. मूल्यांचे अस्तित्व दिक् कालाच्या पलीकडे असून ती स्वत:हून अस्तित्वात असतात. ह्या विश्वाचे ज्ञान आपल्याला इंद्रिये व बुद्धि यांच्या द्वारे होते. मूल्यांचे ज्ञान अंत:प्रज्ञेने व तात्काळ होते. मूल्ये आपल्याला अनुभवास येणाऱ्या विश्वाच्या पलीकडे असतात.

ह्या विश्वात होणाऱ्या घडामोडींच्या बौद्धिक आकलनाचा अपरिहार्य परिणाम म्हणून मूल्यविषयक संवेदना विकसित होत जातात. तथ्य आणि मूल्य यांचा अतिशय निकटचा संबंध आहे. जोपर्यंत तथ्य आहेत तोपर्यंत त्यांच्या पार्श्वभूमीवरील मूल्यांचे अनुमान होत राहणार. मूल्य व वस्तुस्थिती एकमेकांपासून वेगळे करता येणार नाहीत. मूल्यांशिवाय अस्तित्व नाही व अस्तित्वाशिवाय मूल्ये नाहीत.

**साध्य मूल्ये व साधन मूल्ये :**

मूल्यांकडे बघण्याचे वेगवेगळे दृष्टिकोन असू शकतात.  सर्व मूल्ये मानवी व्यक्तित्वाच्या विकासामधील महत्त्वाच्या पायऱ्यांवरील अनुभव आहेत. मूल्यांना दिल्या जाणाऱ्या महत्त्वानुसार मूल्यांचे वर्गीकरण करता येते.

साध्य मूल्यांना आंतरिक मूल्य अथवा स्वतोमूल्य म्हटले जाते. सत्य, सौंदर्य, सहिष्णुता, संयम, धैर्य ह्यांना साध्य मूल्ये म्हटले जाते. स्वतोमूल्य असलेली मूल्ये त्यांच्या

परिणामांमुळे महत्त्वाची न ठरता ती मूलतः महत्त्वाची ठरतात. सत्य अथवा सौंदर्यही अन्य कशाशीही समष्टी झाली नाही तरीही, स्वतंत्रपणे साध्य करावीत अशी मूल्ये आहेत. सहिष्णुता, चारित्र्य इ. मूल्यांची इच्छा सहिष्णुतेसाठी किंवा चारित्र्यासाठीच केली जाते. म्हणजेच ह्या मूल्यांना आंतरिक मूल्य आहे व दुसऱ्या काही ध्येयांच्या प्राप्तीची त्यांना अपेक्षा नाही.

साधन मूल्यांना स्वतःचे काही मूल्य नसून अन्य मूल्यांच्या प्राप्तीसाठी त्यांची इच्छा केली जाते. साधन मूल्यांना बहिःस्थमूल्य असेही म्हटले जाते. काही विशिष्ट उद्देशाने साधन मूल्यांना प्राप्त केले जाते. साधन मूल्यांना त्यांच्या पेक्षा बाहेरील गोष्टी प्राप्त करण्यासाठी महत्त्व प्राप्त होते. साधन मूल्यांमुळे अधिक मूल्यवान ध्येय प्राप्त होते. चष्म्याला साधन मूल्य आहेय. चष्म्यामागे बघणारे डोळे असले तर चष्मा मूल्यावन असतो. 'स्वच्छ' बघणे या ध्येयासाठी चष्म्याला साधन मूल्य आहे. साधन मूल्ये एका समष्टीचे घटक असतात. साधन मूल्यांना साध्यामुळे मूल्य प्राप्त होते. त्यांना स्वतंत्रपणे मूल्य नसते.

साध्य मूल्य व साधन मूल्ये ह्या संज्ञा सापेक्ष आहेत. ही दोन्ही प्रतीचीं मूल्ये एकमेकांपासून संपूर्णतया स्वतंत्र नाहीत. उद्दिष्टाला अनुसरुन मूल्ये साध्य मूल्ये अथवा साधन मूल्ये ठरतात. एखाद्या व्यक्तीसाठी जे उद्दिष्ट असेल ते अन्य व्यक्तीसाठी केवळ साधन असू शकते. उदा. बुलेट ट्रेन एखाद्या अभियंत्यासाठी साध्य असेल तर तीच बुलेट ट्रेन एखाद्या प्रवाशासाठी इच्छित स्थळी लवकर जाण्याचे साधन असेल. चालण्याचा व्यायाम ह्या साधनाने चांगले आरोग्य हे साध्य प्राप्त होते. तर चांगले आरोग्य ह्या साधनाने तीर्थयात्रा हे साध्य प्राप्त होऊ शकते.

मूल्यांचे वर्गीकरण अथवा प्रतवारी काही वेगळ्या प्रकारे केले जाते-धन मूल्ये व ऋण मूल्ये, उत्पादक मूल्ये व अनुत्पादक मूल्ये, शाश्वत मूल्ये व नश्वर मूल्ये इत्यादि. सर्वसाधारणपणे साध्य मूल्ये साधनमूल्यांपेक्षा श्रेष्ठ मानली जातात. धन मूल्ये ऋण मूल्यांपेक्षा उच्च प्रतीची ठरतात.

मानवी मन हे मूल्याचे आश्रयस्थान आहे. बाह्य परिस्थितीला दिलेला एक विशिष्ट प्रकारचा प्रतिसाद म्हणजे मूल्य होय. मानवी मनाची तीन कार्ये आहेत-विचार, भावना व संकल्प. मनाच्या कार्यांना अनुलक्षून अनुक्रमे बौद्धिक मूल्ये (सत्य) सौंदर्यात्मक मूल्ये (सौंदर्य) व नैतिक मूल्ये (शुभ) असतात. सत्य, सौंदर्य व शिव, शुभ ही वैश्विक मूल्ये आहेत.

**आपली प्रगती तपासा :**

१. नीतिशास्त्र व्यावहारिक शास्त्र आहे काय ?

२. नीतिशास्त्र कलेपासून वेगळे कसे आहे ?

३. तथ्य आणि मूल्य यात काय फरक आहे ?

४. मूल्य म्हणजे काय ?

५. साध्य मूल्य व साधन मूल्य म्हणजे काय ?

## १.४ नैतिक तत्त्वज्ञानाच्या शाखा

एके काळी चालीरीती, सवयी अथवा रुढींचे शास्त्र असलेले नीतिशास्त्र आज चार शाखांमध्ये विकसित झाले आहे. नीतिशास्त्राच्या वर्णनात्मक नीतिशास्त्र, आदर्शी नीतिशास्त्र, अधिनीतिशास्त्र व उपयोजित नीतिशास्त्र अशा चार शाखा आहेत.

### १. वर्णनात्मक नीतिशास्त्र:

समाजामध्ये ज्या नीतिविषयक संकल्पना असतात त्यांचा अभ्यास वर्णनात्मक नीतिशास्त्रामध्ये केला जातो. निरनिराळ्या समाजसमूहांमध्ये वेगवेगळ्या नीतिच्यासंकल्पना तसेच आचारणाविषयी विभिन्न संकेत प्रचलित असतात. त्याचप्रमाणे एकाच समाजसमूहामध्ये कालानुरुप नैतिक संकल्पना बदलत जातात. वेगवेगळ्या मानव समूहांमधून व वेगवेगळ्या काळी रुढ असलेले नैतिक संकेत व आचरणविषयक संकेत अभ्यासण्याचे कार्य वर्णनात्मक नीतीशास्त्र करते. नीतिशास्त्राचा इतिहास व विकास यांचा अभ्यास वर्णनात्मक नीतिशास्त्रात केला जातो. वेळोवेळी समाजांमध्ये प्रचलित असलेल्या रुढी परंपरा, प्रथा, तसेच निषिद्ध कृती व शब्द यांची नोंद वर्णनात्मकनीतिशास्त्र करते.

जनसमूहाचे नैतिक आदर्श व समूहांमधील वर्जित आचरण (कृती वशब्दोच्चारण यांची चिकित्सा नीतिशास्त्राच्या या शाखेमध्ये केली जाते. कोणत्या कृती योग्य, कोणत्या कृती अयोग्य, सदाचार अथवा दुराचार, सद्‌गुण अथवा दुर्गुण या विषयी लोकसमूहाच्या धारणा संकलित केल्या जातात. मनुष्य आचरण करताना नेमक्या ज्या कृतींची निवड करतो त्यांचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न तसेच विविध समाजांतील आचारसंहिताचे परीक्षण वर्णनात्मक नीतिशास्त्रामध्ये केले जाते. कोणत्याही समाजामध्ये जे नैतिक संकेत, रुढी, परंपरा प्रस्थापित झालेले असतात त्यांची ती केवळ तथ्ये आहेत. अश्या दृष्टीने नोंद घेऊन त्यातून काही निष्कर्षकाढले जातात. वर्णनात्मक नीतिशास्त्रामध्ये मूल्यमापनात्मक दृष्टिकोन न ठेवता मनुष्याच्या नैतिक श्रद्धा व विश्वासांचे तथ्यानुरुप परीक्षण केले जाते.

### २. आदर्शी नीतिशास्त्र:

आदर्शी नीतिशास्त्र आदेशात्मक असते. 'लोकांचे आचरण कसे असावे' या संबंधीच्या सिद्धान्तांची चर्चा आदर्शी नीतिशास्त्र करते. मानवी आचरणाचे मानदंड काय असावेत याची चिकित्सा या शाखेमध्ये केली जाते. नैतिक निर्णय घेताना उद्‌भवणाऱ्या संघर्षात्मक परिस्थितीमध्ये मार्गदर्शक ठरणाऱ्या नैतिक तत्त्वांची चर्चा आदर्शी नीतिशास्त्रामध्ये केली जाते. कृतीची युक्तता कशी ठरवावी. सदाचार कशास म्हणावे,जीवनामध्ये मनुष्याने काय प्राप्त करुन घ्यावे, मनुष्यांची कर्तव्ये काय असावीत इत्यादि प्रश्नांची चर्चा नीतिशास्त्राच्या या शाखेमध्ये केली जाते. योग्य अथवा इष्ट आचरणाची माहिती देण्यापेक्षा योग्य / इष्ट आचरणाचे निकष निर्माण करणे व आचरणाचे मूल्यमापन करणे हे आदर्शी नीतिशास्त्राचे कार्य आहे. ज्यावेळी मानवी आचरण निर्धारित मानदंडापेक्षा वेगळे ठरते किंवा त्या मानदंडाच्या विरोधी असते त्यावेळी परिणामस्वरुप शिक्षा करण्याविषयीचा संकेत सुद्धा आदर्शी नीतिशास्त्रामध्ये मिळतो. सामाजिक तसेच नैतिक सुव्यवस्था विस्कळीत करणाऱ्या व्यक्तीला शासन का करावे याचे समर्थन करणारे सिद्धान्त आदर्शात्मक नीतिशास्त्रामध्ये दिले जातात.ॲरिस्टॉटलचा सद्‌गुणांविषयीचा विचार, कान्टचा कर्तव्यवादी बुद्धिवाद, मिल्लचा उपयुक्ततावाद तसेच श्रीमद्‌भगवद् गीतेतील निष्काम कर्मयोग हे सर्व आदर्शी नीतिशास्त्रातील सिद्धान्त आहेत.

### ३. अधिनीतिशास्त्र:

नीतिशास्त्राच्या या शाखेमध्ये विविध नैतिक विधाने, संकल्पना व संज्ञा यांचे विश्लेषण केले जाते. मानवी आचरणाचे मूल्यमापन करताना नैतिक निर्णय दिले जातात. नैतिक निर्णय देताना ज्या संकल्पना वापरल्या जातात त्यांचे नेमके अर्थ सुनिश्चित करणे आवश्यक ठरते. शुभ, योग्य, इष्ट, कर्तव्य इ. नैतिक संकल्पनांचे विश्लेषण व व्याख्या ह्या मुख्यतः भाषेशी संबंधित असतात. त्यासाठी नैतिक भाषेचे अध्ययन करण्याचे कार्य अधिनीतिशास्त्र करते. विश्लेषणात्मक किंवा समीक्षात्मक नीतिशास्त्र याचे एक उदाहरण आहे. अधिनीतिशास्त्रामध्ये नैतिक निर्णयांचे स्वरुप व प्रयोजन स्पष्ट केले जाते.

नैतिक निर्णयांचा अन्य ज्ञानशाखांतील निर्णयांशी कश्या प्रकाराचा संबंध आहे हे ही स्पष्ट केले जाते.अधिनीतीशास्त्र एकूणच नैतिक तत्त्वांचे प्रमाणीकरण करते. नैतिक तत्त्वांचे अथवा निर्णयांचे समर्थन कसे करता येईल तसेच नैतिक विधानांचे प्रामाण्य कसे सिद्ध करता येईल याचा विचार अधिनीतिशास्त्रामध्ये केला जातो.अधिनीतिशास्त्र नैतिक भाषेच्या योग्य व काटेकोर वापराबाबत निःपक्ष परंतु अतिशय आग्रही भूमिका घेते.

### ४. उपयोजित नीतिशास्त्र:

मानवी जीवन दिवसेंदिवस अधिकाधिक गुंतागुंतीचे होत चालले आहे.मनुष्याच्या वैयक्तिक तसेच सामाजिक जीवनातील घडामोडींना नैतिक सिद्धांन्त कसे लागू होतील याचा विचार आवश्यक आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे मनुष्यापुढे नवनवीन पेच उभे रहात आहेत. स्वेच्छामरण, दया मरण, गर्भपात, आत्महत्या, पर्यायी माता यासारख्या विषयांवर वेगवेगळे मतप्रवाह आढळून येत आहेत. ह्या बाबी नैतिक की अनैतिक अशा गोंधळवून टाकणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न उपयोजित नीतिशास्त्रामध्ये केला जातो.

वैज्ञानिक प्रगती व अधिकाधिक विकसित होणारे तंत्रज्ञान मनुष्यापुढे नवीन आव्हानेउभी करीत आहेत. पर्यायी मातृत्व, गर्भलिंग चाचणी, जैव तंत्रज्ञान, क्लोनिंग यातून नवीन नैतिक प्रश्न उभे रहात आहेत.

काही नैतिक प्रश्न मनुष्याच्या बेजबाबदार वर्तनातून तसेच अन्य जीवांबद्दल संवेदनक्षमतेचा अभाव यातून निर्माण होत आहेत. काही प्रजातींचे नष्ट होणे, निसर्गाची हानी यासारख्या ढासळत्या जीवन शृंखलेची व पर्यावरणाची नैतिक जबाबदारी श्रेष्ठतम बुद्धिमान मनुष्य प्राण्यावर आहे.उपयोजित नीतिशास्त्र जनमत व कायदे निर्मिती यासाठी मार्गदर्शन करते.

नैतिक प्रश्नांची हो/नाही यासारखी वस्तुनिष्ठ उत्तरे नसतात. नैतिक समस्या बहुआयामी असतात. त्यांची समाधानकारक उत्तरे मनुष्य जीवनाच्या विविध अंगांचा एकत्रितपणे अभ्यास केल्यानंतर मिळू शकतात. स्त्री-भ्रूणहत्येचा प्रश्न, प्रचलित विवाह पद्धती, हुंडा पद्धती, पालकांची आर्थिक स्थिती अश्या अनेक गोष्टींशी जोडलेला आहे. उपयोजित नीतिशास्त्र अश्या समस्यांचा साधक-बाधक चर्चेद्वारा अभ्यास करुन निश्चित धोरणे ठरविण्यास मार्गदर्शन करते.

उपयोजित नीतिशास्त्र ही शाखा अनेक अंगांनी बहरलेली शाखा आहे.प्रसारमाध्यमांचे नीतिशास्त्र, पर्यावरणाचे नीतिशास्त्र, व्यावसायिक नीतिशास्त्र, जैवनीतिशास्त्र, शिक्षक-विद्यार्थी तसेच वकिल व व्यापारी यांच्यासाठी आचार संहिता इत्यादिंचा उपयोजित नीतिशास्त्रामध्ये

सामावेश होतो. यांमध्ये मानवी जीवनातील विविध क्षेत्रातील कृतींची नैतिक दृष्ट्या चिकित्सा केली जाते.

**आपली प्रगती तपासा**

१. अधिनीतिशास्त्र म्हणजे काय ?

२. उपयोजित नीतिशास्त्र म्हणजे काय ?

३. वर्णनात्मक नीतिशास्त्र म्हणजे काय ?

## १.५ नैतिक सापेक्षतावाद

सापेक्षतावाद (Relativism) हा निरपेक्षवादाच्या (Objectivism) विरुद्ध आहे. सापेक्ष व निरपेक्ष ही दोन्ही नीतिशास्त्रीय दृष्टीकोनातून महत्त्वाची आहेत. ही दोन्ही पदे परस्परांशी विरोधी आहेत. सापेक्ष पद व्यक्त करण्यासाठी दुसऱ्या पदाचा आधार घ्यावा लागतो. उदा. श्रीमंत पद व्यक्त करण्यासाठी गरीब हे पद घ्यावे लागते कारण ते सापेक्ष आहेत. सापेक्ष पदे देश, काल, परिस्थितीनुसार बदलत असतात.याउलट निरपेक्ष पद व्यक्त करण्यासाठी दुसऱ्या पदावर अवलंबून राहाण्याची आवश्यकता नसते. त्याला इतर पदाचा आधार घ्यावा लागत नाही. त्याला स्वगत मूल्य असते. निरपेक्ष पदात कोणताही गुणात्मक वा परिमाणात्मक फरक पडत नाही. उदा.चित्ताच्या एकाग्रतेसाठी ध्यानाची आवश्यकता ही आध्यात्मिक आनंद मिळविण्यासाठीअसतो. निरपेक्ष आनंद कशावरही अवलंबून नसतो. तो निरपेक्षच असतो.

आधुनिक नीतिशास्त्रात सापेक्षतावाद व निरपेक्षतावाद ह्या दोन विचारसरण्या (उपपत्त्या) नीतिशास्त्रज्ञांनी मांडल्या. नैतिक सापेक्षतावादाचा पुरस्कार रुथ बेनेडिक्ट, गिल्बर्ट हरमन, माँटेग्यू यांनी केला तर नैतिक निरपेक्षतावादाचा पुरस्कार जेम्स रॅचेल फिशेर, पोजमन व लिलेगार्ड यांनी केला. नीतिशास्त्रीय संकल्पना आणि नैतिक मूल्ये ही सापेक्ष असतात की निरपेक्ष असतात या दृष्टीकोनातून आधुनिक नैतिक तत्त्ववेत्यांनी या दोन विचारसरण्या वा उपपत्त्या भिन्न रीतीने मांडल्या.

भिन्न भिन्न समाजातील व संस्कृतीतील अभ्यास मानववंशशास्त्रज्ञांनी करुन असा निष्कर्षकाढला की सार्वत्रिक नैतिक तत्त्वे कुठे आहेत ? सांस्कृतिक दृष्ट्याही नैतिक संकल्पना त्या त्या संस्कृतीपरत्वे भिन्न असतात. अशा प्रकारची एक नैतिक समस्या म्हणून सापेक्षतेची संकल्पना निर्माण होते.

**नैतिक किंवा नीतीशास्त्रीय सापेक्षतावादः**

नैतिक किंवा नीतिशास्त्रीय सापेक्षतावाद ही विचारसरणी रुथ बेनेडिक्ट या अमेरिकन मानववंशशास्त्रज्ञीने मांडली. रुथ बेनेडिक्ट या अमेरिकन सांस्कृतिक मानवंशशास्त्रज्ञ आहेत. त्यांनी व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासातील प्रमुख भूमिकेवर जोर दिला रुथ बेनेडिक्टेने

''संस्कृतीचे आकृतीबंध'' (Patterns of Culture) हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात आपले विचार व्यक्त करताना त्या म्हणतात की प्रत्येक व्यक्ती ह्या भिन्न भिन्न वर्तनाच्या सांस्कृतिक आकृतीबंधाशी आणि नैतिक मानदंडाशी किंवा आदर्शांशी समायोजन करते. रुथ बेनेडिक्ट नीतिमत्तेचे स्वरुप व त्याची अवधारणे स्पष्ट करतांना त्या सामाजिक विचारवंतानी व तत्त्ववेत्यांनी मांडलेल्या नैतिक सापेक्षतावादाचा संदर्भ देतात. नैतिक वा नितिशास्त्रीय सापेक्षतावाद असे सांगतो की, योग्य आणि अयोग्य, शिव आणि अशिव यांच्या सार्वत्रिक कसोट्या नाहीत. स्थल कालानुसार नैतिक संकल्पना बदलत जातात. नीतिशास्त्राचे प्रश्न या ग्रंथात प्रा. दि. य. देशपांडे यांनी सापेक्षवादाचे प्रतिपादन असे केले की, ''नैतिक अवधारणे व्यक्तिनिरपेक्ष असून त्याचे विवेकी समर्थन शक्य आहे. म्हणजे नि:पक्षपाती आणि सर्वांगिण परीक्षेत ती उतरु शकतील हे मत चुकीचे आहे असे सापेक्षतावादाचे प्रतिपादन आहे.

नैतिक सापेक्षतावादाच्या उपपत्तीचा आधुनिक काळात रुथ बेनेडिक्ट या अमेरिकन मानववंशशास्त्रज्ञाने पुरस्कार केला या उपपत्तीला बेनेडिक्ट ''सांस्कृतिक सापेक्षतावाद'' (Cultural Relativism) असेही म्हणतात. सांस्कृतिक सापेक्षतावादाचा दृष्टीकोन अनेक मानववंश शास्त्रज्ञानी स्वीकारलेला आहे. रुथ बेनेडिक्टने आपल्या सांस्कृतिक आकृतीबंध'' या ग्रंथात त्याचे विवेचन केले आहे. नैतिक सापेक्षतावाद ही एक नैतिक उपपत्ती असून नैतिकता ही त्या संस्कृतीत असणाऱ्या मानदंड प्रती (Norm) वा आदर्शाप्रती सापेक्ष असते. निरनिराळ्या काळी व स्थळी मानदंड निरनिराळे असतात की एकच असतो. ज्या कृती आज योग्य समजल्या जातात त्यापूर्वी अयोग्य समजल्या जात असत. उदा. सतीची चाल पूर्वी योग्य मानली जाई पण आज त्यावर कायद्याने बंदी घातली आहे. यावरुन नैतिक मानदंड वा आदर्श हे सापेक्ष असल्याचे स्पष्ट होते. एखादी कृती योग्य आहे की अयोग्य आहे हे त्या समाजातील व्यवहारात असणाऱ्या नैतिक मानदंडावर आधारित असते.एका समाजात प्रचलीत असणारी कृती नैतिकदृष्ट्या योग्य असेल तर दुसऱ्या समाजात तीच कृती नैतिकदृष्ट्या अयोग्यही असू शकतो. नैतिक सापेक्षतावादी असे प्रतिपादन करतात की नैतिक तत्त्वे ही सार्वत्रिक नसतात. कारण सर्व काळी सर्व लोकांना ती सार्वत्रिकदृष्ट्या लागू करता येणे शक्य नाही. समाजापरत्वे नैतिक तत्त्वे सापेक्ष असतात असे नैतिक सापेक्षतावादी म्हणतात.

### १.५.१ नैतिक सापेक्षतावादाचे प्रकार

नैतिक सापेक्षतावादाचे दोन प्रकार आहेत ते पुढीलप्रमाणे.

अ) वर्णनात्मक सापेक्षतावाद

ब) आदर्शात्मक सापेक्षतावाद

अ) वर्णनात्मक सापेक्षतावाद:

याचे प्रतिपादन असे आहे की मानवाची आणि समाजाची मूलभूत नैतिक अवधारणे (Judgements) भिन्न असतात. मूलभूत नैतिक अवधारणे समान असूनही थदुद्भूत अवधारणे भिन्न असू शकतील उदा. बालविवाह करु नये असे म्हणणारे लोक व बालविवाह करावा असे म्हणणारे लोक या दोहोत विरोध आहे.परंतु या मतांची समर्थने एकाच प्रकारच्या कारणांनी देता येतील. जसे बालविवाहाने समाजाचे पोषण होईल असे एक व्यक्ती मानत असेल तर दुसरी व्यक्ती प्रौढ विवाहाने समाजाचे पोषण होईल असे मानत असेल. येथे दोन्ही व्यक्तींच्या मतांचे मूलभूत अवधारणांच्या बाबतीत एकमत आहे. थोडक्यात ज्याने समाजाचे पोषण होते ते चांगले.

वर्णनात्मक सापेक्षतावाद असे प्रतिपादन करतो की, मानवाची एकाच समाजातील एकाच काळातील मानवांची आणि संस्कृतींची मूलभूत नैतिक आणि मूल्यात्मक अवधारणे ही भिन्न भिन्न वा परस्परविरुद्ध असतात. परंतु हे मत निर्विवादपणे प्रस्थापित झालेले नाही. उलट काही सांस्कृतिक व सामाजिक मानवंशशास्त्रज्ञांनी शंका घेतली की, अधिनीतीशास्त्रीय सापेक्षतावाद सिद्ध करण्यात वर्णनात्मक सापेक्षतावाद पुरेसा नाही. थोडक्यात वर्णनात्मक सापेक्षतावाद विविध संस्कृतीमधील नैतिक व्यवहार आणि मानदंड यांचे समर्थनाविषयी काही एक बोलतनाहीत. सर्व नैतिक निर्णय मानवी मते असतात.

**ब) आदर्शात्मक सापेक्षतावाद :**

आदर्शवादीशास्त्रे ही मूल्यवादी असून घटना कशी असावी? या स्वरुपाचा मूल्यवादी विचार आदर्शवादीशास्त्रे करीत असतात. यामध्ये नैतिक आचरणाचे काही मानदंड त्या त्या समाजात प्रस्थापित केलेले असतात त्यात मानवी आचरणाच्या युक्ततेचे निकष सांगितलेले असतात. आदर्शात्मक सापेक्षतावाद असा दावा करते की एका संस्कृतीत प्रस्थापित केलेले मानदंड इतर संस्कृतीतील लोकांच्या वर्तनाचे मूल्यमापन करण्यास लागू होत नाहीत. आदर्शात्मक सापेक्षतावाद हा समाजाशी वा संस्कृतीशी संबंधीत असल्याने रुथ बेनेडिक्ट त्यास सांस्कृतिक सापेक्षतावाद असे म्हणतात. हाच दृष्टीकोन इतर मानववंशशास्त्रज्ञ स्वीकारतात. बेनेडिक्ट असे म्हणतात की सांस्कृतिक नीतीमत्ता मानवी स्वभावाला टाळता न येणाऱ्या घटनेपासून दूर न जाता सर्वत्र असलेल्या व संस्कृतीपरत्वे भिन्न असलेल्या आचरणाच्या पद्धतीतून प्रमाणित होतात. बेनेडिक्ट ह्या नैतिक सापेक्षतावाद व आदर्शात्मक सापेक्षतावाद भिन्न मानतात. अंतिम आदर्श वा मानदंड हे योग्य काय आहे आणि योग्य काय नाही हे व्यक्ति ज्या समाजात राहते त्या समाजातील व्यक्ती कशाला योग्य म्हणते त्यावर निश्चित केले जाते. आदर्शवादी नीतिशास्त्र विविध प्रकारच्या नैतिक समस्यांना उत्तरे देण्याचा प्रयत्न करते. याशिवाय अधिनीतिशास्त्र ही नीतिशास्त्राची एक शाखा असून त्याचा अभ्यास विषय वेगळा आहे. आधिनीतिशास्त्र प्रामुख्याने नैतिक संकल्पना, त्यांचे अर्थ व तार्किक विश्लेषण करुन नैतिकतेचा अभ्यास करते. नैतिक विधानांचा निश्चित अर्थ शोधण्याचा प्रयत्न या शाखेत केला जातो.

## १.५.२ रुथ बेनेडिक्ट यांचे नैतिक सापेक्षवादाचे विवेचन

नैतिक सापेक्षतावादाचे विवेचन रुथ बेनेडिक्ट यांनी आपल्या ''संस्कृतिचे आकृतीबंध'' या ग्रंथात केले आहे. तसेच आधुनिक सामाजिक मानववंशशास्त्रज्ञ हे सांस्कृतिक परिसराचा आणि त्याचा मानवी जीवनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करते. जेव्हा विविध संस्कृतीचे निरीक्षण केले जाते तेव्हा त्या संस्कृतीत भिन्न प्रकारची मूल्ये आणि मानवामधील व्यवहार दिसून येतात. योग्य काय? अयोग्य काय हे त्या समाजातील संस्कृतीवर अवलंबून असते. योग्य कृती कोणती व अयोग्य कृती कोणती हे त्या त्या संस्कृतीत असलेल्या नियमावरुन ठरते. आधुनिक सामाजिक मानववंश शास्त्रज्ञानी सांस्कृतिक परिसराच्या घटकांचा परिणाम मानवी वर्तनावर वा आचरणावर कसा होतो याचा अभ्यास केला. रुथ बेनोडिक्ट ह्या त्यापैकीच एक मानववंशशास्त्राच्या अभ्यासक आहेत. विविध सामाजिक घटकांच्या अभ्यासामुळे प्राचीन काळातील लोकांचे आचार विचार समजून घेतल्यामुळे एक वैचारिक बैठक तयार होते.उच्चभ्रू संस्कृतीमध्ये असणाऱ्या श्रद्धा आणि विश्वास यांच्या प्रमाणीकीकरणासाठी विशिष्ट प्रकारे परंतु टाळता न येणाऱ्या आकृतीबंधाना खोटा अर्थ दिला जातो. कोणताही निर्णय तपासण्यासाठी व्यापक प्रमाणात सर्वेक्षण पद्धतीची आवश्यकता असते. परंतु घिसडघाईने प्रसिद्ध रुढींच्या सार्वत्रिकेला आपण पाया मानतो. बहुतेक संस्कृतीमध्ये आपल्या अनुभवाच्या पलिकडे जाऊन

आपण माणसांचे स्वभाव ओळखतो. त्याविषयीची ऐतिहासिक कारणेही असतात. परंतु कोणत्याही प्रकारचा सामाजिक चांगूलपणा वा सभ्यता या विषयीची मक्तेदारी निश्चित नसते. या दृष्टीकोनातून चांगूलपणा किंवा सभ्यता ही मानवी प्राप्तव्याच्या उच्च पातळीवर असण्याची गरजही नाही. परंतु समायोजन करण्यासाठी संधी मात्र आहे. तसेच काहीप्रमाणात सर्वसामान्य परिस्थितीवर प्रभाव पाडणारे घटक संस्कृतीतील समाजरचनेच्या पायामध्ये आहेत. केवळ चर्चा करुन त्यांना न्याय देता येत नाही. यासाठी रुथ बेनेडिक्ट या एकापेक्षा अधिक उदाहरणे देतात. त्यापैकी एक उदाहरण पुढीलप्रमाणे दिले आहे. वायव्य प्रातांतील मलेशिया बेटावरील केलेल्या संशोधनावरुन असे दिसून आले की, ज्या गुणवैशिष्ट्यांवर समाजाची रचना झालेली आहे ती संशय विक्षोभ विकृतीच्या पलिकडील वर्णन आहे. तेथील भटक्या जमातींच्या कुटुंबामध्ये परस्परांना जादूटोण्यांनी हाताळले गेले. या जमातीतील माणसे आपल्या शत्रू गटातील व्यक्तींशी विवाहबद्ध होतात. त्यांचा शत्रू हा कट्टर असून ते अशांतता निर्माण करतात. ते बागेत आलेल्या पीकाला चोरीचे तसेच पापशालन म्हणून मानतात. तेथील जमातीतील प्रत्येक व्यक्ती आपल्या शेतातील पीकाची उत्पादनक्षमता शेजारच्या पिकाशी होणाऱ्या उत्पादनक्षमतेपेक्षा जास्त व्हावे म्हणून जादूचे प्रयोग करतात. त्यामुळे शेतातील कंदमुळांच्या उत्पादनेविषयी तेथे कोणत्याही प्रकारची गुप्तता व गोपनियता राहात नाही.तसेच एखाद्याने दिलेल्या देणगीचा स्वीकार करतांना त्यांच्या नम्रतापूर्वक वाक्प्रचार असा आहे की ''या भेटवस्तूद्वारे विषाचा प्रयोग केला तर या भेटदिलेल्या वस्तूची परतफेड कशाप्रकारे करता येईल. आपल्यावर विषाचा प्रयोग करणार असा पूर्वग्रह ते कायमस्वरुपाचाच मानतात. तसेच शेतात मशागत करण्यासाठी व पेरण्यासाठी बीबियाणांची देवाणघेवाण सुद्धा करण्यास तेथील कुटुंबातील माणसे नकार देतात. यावरुन इतरांच्या संस्कृतीवरुन आपल्या संस्कृतीचे चिकित्सक परीक्षण वा मूल्यमापन करणे त्यांचे आकलन पुरेसे होत नाही. नैतिक सापेक्षतावादी असे म्हणतात की, नैतिक तत्त्वे व सांस्कृतिक वर्तनाची समीक्षा करणे ही इतर संस्कृतीच्या तुलनेत त्याचे आकलन करणे तसे अवघड असते.

### १.५.३ मूल्यमापन

बहुतेक नीतीशास्त्रज्ञ नैतिक सापेक्षतावादाची उपपत्ती नाकारतात. काही असा दावा करतात की समाजाची नैतिक तत्त्वे भिन्न असतात. मूलभूत नैतिक तत्त्वे वेगवेगळ्या समाजात व्यावहारिकदृष्ट्या प्रत्यक्ष उतरविणे अवघड असते. शमाजातसुख दु:खे दोन्हीही आढळतात दु:ख असण्याचे कारण कुसमायोजन होय. जेथे परिस्थितीशी समायोजन असेल तेथे सुखप्राप्ती असते असे समायोजन आदर्शसमाजरचनेत होते. थोडक्यात नैतिक सापेक्षतावाद ह्या उपपत्तीनुसार शिव-अशिव, योग्य–अयोग्य यांच्या सर्वत्रिक कसोट्या नाहीत या संकल्पना स्थल, काल यानुसार बदलतात. नैतिक सापेक्षतावादाची उपपत्ती ही एखाद्या समाजातील असणाऱ्या चांगल्या रुढी, परंपरा, विचार हे इतर समाजापेक्षा त्या परंपरा व विचार चांगले असतात हे ओळखण्यात नैतिक सापेक्षतावादी अयशस्वी झालेले दिसतात.

डब्ल्यू टी. स्टेस या तत्त्ववेत्त्यांने नैतिक सापेक्षतावादाचे टीकात्मक विवेचन करुन नैतिक निरपेक्षतावादाचा स्वीकार केला. स्टेसच्या मते नैतिक मूल्ये ही सापेक्ष नसून ती निरपेक्ष (स्वयंमूल्य) आहेत.नैतिक निरपेक्षतावाद म्हणजे अशी नैतिक आचारसंहिता की जी सर्वकाळी, सर्वस्थळी म्हणजेच स्थलकाल अशी कायम टिकणारी असून ती प्रत्येक व्यक्तीला लागू पडते. मग आपल्याला त्याविषयीची जाणीव असो वा नसो. स्टेसच्या मते सार्वत्रिक असे नैतिक मानदंड वा आदर्श हे सत्य आहेत. ऐतिहासिकदृष्ट्या पाहिले तरनीतिमत्ता ही ईश्वराची आज्ञा मानली जाते.

**आपली प्रगती तपासून पहा**

१) नैतिक सापेक्षतावादाचा पुरस्कार कोणी केला ?

२) सापेक्षतावादाची व्याख्या द्या.

३) संस्कृतीविषयी रुथ बेनेडिक्टचे निरीक्षण काय आहे ?

४) नैतिक सापेक्षतावाद म्हणजे काय ?

५) नैतिक सापेक्षतावाद कोणत्या मूल्यांना प्राधान्य देते ?

## १.६ सारांश

ह्या विश्वाविषयीच्या कुतुहलामधून तत्त्वज्ञानाचा उदय होतो. अनुभवगम्य तसेच अनुभवातीत जगाविषयी चिंतन म्हणजे तत्त्वज्ञान होय.नीतिशास्त्र म्हणजे मानवी बुद्धिमत्तेच्या व्यावहारिक उपयोगातून निर्माण होणारे शास्त्र होय. नीतिशास्त्र मनुष्याचे ह्या विश्वातील अस्तित्व व त्याचा आदर्शाचा शोध याच्याशी संबंधित आहे. मानवी कृतींची परमोच्च ध्येयांशी तुलना करुन त्या कृती इष्ट किंवा अनिष्ट, योग्य किंवा अयोग्य ठरविल्या जातात. नीतिशास्त्र एक आदर्शी शास्त्र आहे की व्यावहारिक शास्त्र आहे. असाही प्रश्न उपस्थित होतो. नीतिशास्त्र मूल्यांशी संबंधित असून मूल्ये तथ्यांपेक्षा वेगळी असतात. व्यक्तीच्या जीवनातील महत्त्वानुसार मूल्यांचे वर्गीकरण केले जाते. मूल्यांचे वर्गीकरण साध्य मूल्ये-साधन मूल्ये, (आंतरिक मूल्ये - बहिःस्थ मूल्ये), धन मूल्ये -ऋण मूल्ये, उत्पादक मूल्ये-अनुत्पादक मूल्ये, शाश्वत मूल्ये-नश्वर मूल्ये या प्रकारे गेले जाते.

नीतिशास्त्राचा विकास वर्णनात्मक नितिशास्त्र आदर्शी नीतिशास्त्र,अधिनीतिशास्त्र व उपयोजित नीतिशास्त्र या चार शाखांमध्ये विस्तारित झाला आहे.वर्णनात्मक नीतिशास्त्र नीतिशास्त्राचा इतिहास व विकास यांचा अभ्यास करते. आदर्शी नीतिशास्त्र काही मानदंडांच्या आधारे आचरणासाठी काही सिद्धान्तांची स्थापना करु पाहते. अधिनीतिशास्त्र नैतिक संकल्पनांचे विश्लेषण करते. उपयोजित नीतिशास्त्र आधुनिक जीवनशैलीमुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नांशी संबंधित आहे.

नैतिक सापेक्षतावादाची उपपत्ती रुथ बनेडिक्टने संस्कृतीचे आकृतीबंध या ग्रंथात मांडलेले आहेत. नैतिक सापेक्षतावादात योग्य- अयोग्य, शिव-अशिव यांच्या सार्वत्रिक कसोट्या नाहीत. स्थल कालानुसार नैतिक संकल्पना बदलतात. नैतिक सापेक्षतावादाचे वर्णनात्मक व आदर्शात्मक सापेक्षतावाद असे दोन प्रकार आहेत.

## १.७ विद्यापीठीय दीर्घोत्तरी प्रश्न

१. तत्त्वज्ञानाच्या विविध व्याख्यांची चर्चा करा / अथवा तत्त्वज्ञानाचे स्वरुप स्पष्ट करा.
२. नीतिशास्त्राचे स्वरुप सविस्तर सांगा
३. नैतिक सापेक्षतावादाची व्याख्या द्या आणि नैतिक सापेक्षतावादाच्या प्रकारांचे वर्णन करा.
४. नैतिक सापेक्षतावाद म्हणजे काय ते सांगून रुथ बेनेडिक्टचे नैतिक सापेक्षतावाद विषयीचे चिकित्सक विवेचन करा.
४. टिपा लिहा
   अ) तत्त्वज्ञानाच्या शाखा
   ब) नैतिक तत्त्वज्ञानाच्या शाखा
   क) नीतिशास्त्र व कला यातील फरक
   ड) नीतिशास्त्र - एक आदर्शी शास्त्र
   इ) तथ्य व मूल्य यांचा परस्परसंबंध
   फ) साध्य मूल्ये - साधन मूल्ये
   ग) नैतिक सापेक्षतावादाचें प्रकार

❖❖❖❖

# घटक-२

# भारतीय तत्त्वज्ञानाच्या संदर्भातील नैतिकता

# (MORAL CONCEPTS IN INDIAN PHILOSOPHY)

**घटक रचना :**

२.० उद्दिष्ट्ये
२.१ प्रस्तावना
२.२ भारतीय नीतिशास्त्राची वैशिष्ट्ये
२.३ श्रीमद्‌भगवद् गीतेमधील निष्काम कर्मयोग
२.४ स्थितप्रज्ञ नैतिक आदर्श
२.५ ऋत, ऋण व पुरुषार्थ या संदर्भातील धर्म संकल्पना
२.६ सारांश
२.७ विद्यापीठीय दीर्घोत्तरी प्रश्न

## २.० उद्दिष्ट्ये

१. भारतीय नैतिक तत्त्वज्ञानातील आस्तिक व नास्तिक दर्शनांची वैशिष्ट्ये जाणून घेणे.
२. नीतिशास्त्रामधील 'धर्म' संकल्पना एक परमोच्च तत्त्व म्हणून समजून घेणे.
३. नीतिनिर्णय घेण्याची गरज लक्षात घेणे.
४. कर्तव्य करण्यामागील नैतिक भूमिका समजून घेणे.

## २.१ प्रस्तावना

पाश्चात्य तत्त्वज्ञानात नीतिशास्त्रास तत्त्वज्ञानाची एक शाखा मानली जाते. भारतीय दर्शनामध्ये तत्त्वज्ञान व नीतिशास्त्र यांचा एकाच वेळी उदय झाला असे मानले जाते. भारतीय परंपरेनुसार तत्त्वज्ञान केवळ बौद्धिक चिंतन नसून जीवनाची एक पद्धती आहे. अंतिम सत्तेचे केवळ ज्ञान प्राप्त करणे हे साध्य नसून अंतिम सत्तेची अनुभूती घेणे हे जीवनाचे लक्ष्य आहे. भारतीयांच्या मते सर्व तात्विक प्रश्न एकमेकांशी संलग्न असतात. या विश्वामध्ये एक नैतिक व्यवस्था कार्यरत आहे. प्रत्येक व्यक्तीला या व्यवस्थेमध्ये काही निश्चित स्थान असून त्या अनुषंगाने प्रत्येकाची काही कर्तव्ये व जबाबदाऱ्या आहेत.

प्रत्येक मनुष्याचे कर्तव्य केवळ मानव समाजापुरते मर्यादित नाही. मनुष्याची बांधिलकी संपूर्ण सजीव सृष्टीशी असते. भारतीय तत्त्वज्ञानानुसार स्वतःइतकेच आपल्या शेजाऱ्यावर प्रेम करा आणि प्रत्येक सजीव आपला शेजारी आहे.

## २.२ भारतीय नीतिशास्त्राची वैशिष्ट्ये

भारतीय तत्त्वज्ञानातील संप्रदायांची आस्तिक व नास्तिक अशी विभागणी करता येते. वेदांना प्रमाण मानणारी न्याय, वैशेषिक, योग, सांख्य, मीमांसा व वेदान्त ही दर्शने आस्तिक दर्शने मानली जातात. वेदप्रामाण्य नाकारणारी चार्वाक, जैन व बौद्ध ही दर्शने नास्तिक दर्शने मानली जातात. आस्तिक व नास्तिक भारतीय दर्शनांची पुढील प्रमाणे वैशिष्ट्ये आढळून येतात.

१. भारतीय नीतिशास्त्र मानवी संस्कृतीइतकेच प्राचीन आहे. भारतीय दर्शनांचा नेमका कालखंड निश्चित करणे फार कठीण आहे. याला अपवाद केवळ भगवान बुद्ध हे होत. भगवान बुद्धांचा जन्म इसवीसन पूर्व ४८७ मध्ये झाला. भारतीय नीतिशास्त्राची प्राचीनताच मानवी जीवनात नैतिक तत्त्वज्ञानाला प्रस्थापित करण्यास कारणीभूत आहे. प्रत्येक दर्शन चिरस्थायी नैतिक आदर्शाचा पुरस्कार करते.

२. भारतीय दर्शनांमध्ये परिपूर्ण जीवन जगण्यासाठी व्यावहारिक साधनांचा पुरस्कार केला जातो. गेली हजारो वर्षे योग, जैन व बौद्ध दर्शनाचे अनुयायी विहित मार्गाने आध्यात्मिक प्रगती करुन घेत आहेत. भारतीय दर्शने केवळ आदर्शांचा उहापोह न करता त्यासाठी मार्ग सुद्धा सुचवितात.

३. भारतीय नीतिशास्त्राला सत्ताशास्त्राचा भक्कम पाया आहे. भारतीय दर्शने ज्या परमतत्त्वांची अनुभूती घेणे आवश्यक मानतात त्या तत्त्वांसाठी सत्ताशास्त्रीय आधार सिद्ध करतात. सिद्धान्त व आचरण तसेच बुद्धिप्रामाण्य व प्रत्यक्ष अनुभूती याची सांगड भारतीय दर्शनांमध्ये आढळून येते. उदा. बौद्ध दर्शनामध्ये निर्वाणासाठी अष्टांग मार्गाचा पुरस्कार केला आहे. भारतीय तत्त्वचिंतकांच्या मते बुद्धी व नीती या दोन पंखांच्या सहाय्याने मानवी आत्मा आध्यात्मिक भरारी घेतो.

४. भारतीय नैतिक तत्त्वज्ञान आध्यात्मिक व निरपेक्ष आहे. अंतिम सत्तेची अनुभूती सुख दुःख, योग्य - अयोग्य यांच्या पलीकडे गेल्याने होते. परमतत्त्वाची प्राप्ती विशिष्ट नैतिक आचरणाने होते. नैतिक आचरण व्यक्ती निरपेक्ष असते.

५. भारतीयांचे नैतिक तत्त्वज्ञान मानवहितवादी आहे. नैतिक नियमांचे पालन हे व्यक्तिगत उन्नती तसेच समाजकल्याणासाठी आवश्यक ठरते. नैतिकतेचे उद्दिष्ट मानव कल्याण हे आहे.

भारतीय परंपरेमध्ये केवळ मानव कल्याण अभिप्रेत नसून त्यात सर्व सजीव म्हणजे पशु, पक्षी, वृक्ष, दृश्य अथवा दृष्टीस न पडणारे जीव यांचे कल्याण अभिप्रेत आहे. या सर्वांसाठी अहिंसा, सत्य, करुणा, आस्था इ. मूल्ये आचरणात आणणे आवश्यक ठरते.

६. 'कर्म सिद्धान्त' भारतीय तत्त्वज्ञानाची महत्त्वाची संकल्पना आहे. मनुष्याच्या काही अपेक्षेने केलेल्या प्रत्येक कर्माचा परिणाम (शुभ / अशुभ ) त्या व्यक्तीच्या जीवनावर होत असतो. सोप्या शब्दांमध्ये कर्म सिद्धान्त म्हणजे जे पेराल तेच उगवते. शुभ कर्माचे फळ सुख व अशुभ कर्माचे फळ दु:ख असते. व्यक्तीचे वर्तमान जीवन, त्याचा भूतकाळ व भविष्यकाळ यांना साधणारा दुवा म्हणजे कर्म सिद्धान्त होय.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न:भारतीय नीतिशास्त्राची वैशिष्ट्ये कोणतीआहेत ?

## २.३ श्रीमद्भगवद् गीतेमधील निष्काम कर्मयोग

श्रीमद्भगवद्गीता हा हिंदूचा अत्यंत लोकप्रिय व प्रभावशाली असा धार्मिक ग्रंथ आहे. भारतीय तत्त्वज्ञानातील सर्व महत्त्वपूर्ण तत्त्वांचे गीतेमध्ये विवेचन आढळून येते. शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य तसेच संत ज्ञानेश्वर यासारख्या महान भारतीय तत्त्वज्ञांनी श्रीमद्भगवद्-गीतेवर अत्यंत उद्बोधक टीका लिहिल्या आहेत. लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यासारख्या महान राष्ट्रीय नेत्यांनीही गीतेपासून स्फूर्ती घेतली आहे.

श्रीमद्भगवद्-गीतेमधील तत्त्वज्ञान उपनिषदांवर आधारित आहे. सांख्य व योग दर्शनातील तत्त्वांचा परामर्श ही गीतेमध्ये घेतला गेला आहे.

अर्जुनाने आपल्या आप्तस्वकीयांना कुरुक्षेत्रावर आपले शत्रु म्हणून पाहिले आणि तो गलितगात्र व किंकर्तव्यमूढ झाला. आप्त स्वकीयांशी लढावे की रणांगणावरुन निघून जावे असा प्रश्न त्याच्यापुढे उभा राहिला. भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला त्याचे कर्तव्य म्हणजे लढाई करण्याचा उपदेश केला. आजच्या युगातही मनुष्याची अर्जुनाप्रमाणे ''नेमके काय करावे'' ? अशी किंकर्तव्यमूढ अवस्था होते. भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला केलेला उपदेश आजही मार्गदर्शन करीत आहे.

श्रीमद्भगवद्-गीतेनुसार मानवी जीवनाचे सर्वोच्च ध्येय 'मोक्ष' हेच आहे. मोक्ष म्हणजे जीवात्म्याची विश्वात्म्याशी एकरुपता होय. जन्म मृत्युच्या चक्रातून सुटका म्हणजे मोक्ष होय. व्यक्तीच्या आत्मसाक्षात्कारातून ईश्वर साक्षात्कार घडतो. विहित कर्तव्यांचे निष्काम भावनेने पालन करुन व निरपेक्ष समाजसेवा करुन व्यक्ती आत्मानुभूती घेऊ शकते.

गीतेमध्ये मोक्ष प्राप्त करुन घेण्यासाठी ज्ञानमार्ग, भक्तिमार्ग व कर्ममार्ग असे तीन मार्ग सांगितले आहेत.

**१. ज्ञान मार्ग :**

श्रीमद्‌भगवद्‌गीतेमध्ये ज्ञान मार्गाचा पुरस्कार केला गेला आहे. ज्ञानासारखे शुद्ध व पवित्र करणारे अन्य काहीही या जगामध्ये नाही. नहि ज्ञानेन सदृशम् पवित्रमिह विद्यते.ज्ञानमार्ग हा सर्वोत्तम यज्ञ आहे. आत्मसंयमनाच्या अग्नीमध्ये व्यक्तीने स्वतःच्या कर्मबंधनांची आहुती द्यावी.

आपली बुद्धी, मन व इंद्रिये यांवर भावनांचे नियंत्रण असते. मनुष्याचा मोह बंधने निर्माण करतो. आपण जे कर्म करतो त्याचा परिणाम अनिवार्यतेने घडून येतो. कर्म व त्या कर्माचे फळ असे चक्र अविरत चालू असते. ज्ञानी माणूस इंद्रिय निग्रहाच्या मार्गाने कर्मफळाचा मोह न बाळगता कर्म करतो.

ज्ञानी माणूस जीवात्मा व परमात्मा यातील तादात्म्य अनुभवू शकतो. मात्र ज्ञानी माणूस कर्मापासून विन्मुख होऊ शकत नाही. सामान्य माणसे ज्ञानी जनांचे अनुकरण करतात. त्यामुळे समाजाला उदाहरण घालून देण्यासाठी मोक्ष प्राप्त झालेल्या ज्ञानी माणसाने त्यांचे विहित कर्तव्य करीत राहणे आवश्यक आहे. स्वतःच्या कर्तव्यांचे पालन करीत असताना निरपेक्षपणे मानवसेवा करावी असे गीतेमध्ये सांगितले आहे.

भगवद्‌गीता असेही सांगते की ज्ञानमार्ग जनसामान्यासांठी अतिशय कठीण आहे. केवळ काही प्रज्ञावंत हा ज्ञानमार्ग अनुसरु शकतात. सर्व व्यक्तींचा आत्मा एकच आहे असा अनुभव येणे ही कठीण गोष्ट आहे. तसेच बौद्धिक चिकित्सेने परमात्म्याची किंवा विश्वात्म्याची अनुभूती घेणे हे फार थोडया बुद्धिमंतांना शक्य आहे.

**२. भक्तिमार्ग:**

ज्ञानमार्गाबरोबर भगवद्‌गीता मोक्ष प्राप्तीसाठी भक्तिमार्गाचाही पुरस्कार करते. दिव्य शक्तीची उपासना करुन दिव्यत्वाशी तादात्म्य पावता येते. चिरंतन पण अमूर्त अशा दिव्य शक्तीची आराधना करणे सामान्य माणसाला कठीण आहे. सामान्य माणसाला निर्गुण शक्तीची उपासना करण्यापेक्षा सगुण साकार वा मूर्त ईश्वराची भक्ती करणे सोपे जाते.

भगवद्‌गीतेमध्ये असे सांगीतले आहे की, जो ईश्वराची आराधना करतो त्याचा कधीही नाश होत नाही (न मे भक्तः प्रणश्यति) गीतेमध्ये चांगल्या भक्ताचे वर्णन दयाळू, संयमी व निष्पक्ष व्यक्ती असे केलेले आहे. सुख किंवा दुःख चांगल्या भक्ताच्या मनाचा समतोल बिघडवू शकत नाहीत. खऱ्या भक्ताला अहंकार नसतो. तसेच ह्या भौतिक विश्वातील गोष्टींविषयी त्याला आसक्ती सुद्धा नसते.

खरी भक्ती निःस्वार्थ असते. भक्ती ही ज्ञान व कृती युक्त असते. खरा भक्त आपली सर्व कर्तव्ये निस्वार्थ व निरासक्त भावाने करतो. ईश्वराला संपूर्ण समर्पण भावनेने शरण जाणे हे खऱ्या भक्ताचे लक्षण आहे.

भक्तिचा मार्ग ही सोपा नाही. ईश्वराला सर्वस्व अर्पण करणे, स्वत्व विसरुन समर्पित होणे कठीण आहे. खऱ्या भक्ताला तो करीत असलेल्या कर्माच्या परिणामांची अपेक्षा नसते. स्वतःचा अहम् विसरुन इच्छांचा त्याग करुन खरा भक्त त्याची कर्मफळे ईश्वराला अर्पण करतो.

स्वतःला पूर्णपणे विसरुन आराध्य देवतेची समर्पण भावनेने भक्ती करणे अतिशय कठीण आहे. श्रीमद्भगवद्गीतेनुसार ईश्वर सेवा ही समाजसेवेच्या माध्यमातून व्हायला हवी.

### ३. कर्म मार्ग:

श्रीमद्भगवद्गीते मध्ये कोणासही अपवाद न करता, सर्वांसाठी कर्ममार्गाची शिकवण दिलेली आहे. ह्या विश्वाचे चक्र कर्मानुसार चालते व त्याचा घटक बनणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे. जीवन कर्माधिष्ठित आहे. कोणतीही व्यक्ती क्षणमात्रसुद्धा निष्क्रिय राहू शकत नाही. श्वास घेणे ही एक क्रियाच आहे. निष्क्रियता म्हणजे मृत्यू होय.

भगवद्गीता निष्काम कर्मयोगाची शिकवण देते. कर्ममार्ग दुहेरी असतो. १. व्यक्तीच्या स्वतःच्या कर्तव्यांचे पालन २. कोणतीही अपेक्षा न ठेवता कर्तव्याचे पालन

### स्व-धर्म:

निष्काम कर्मयोगाची पहिली पायरी म्हणजे स्वधर्माचे पालन करणे व्यक्तीच्या स्वभावानुसार निर्धारित असलेली कर्तव्ये म्हणजे स्व-धर्म होय. भगवद्गीतेनुसार प्रत्येक व्यक्ती विशिष्ट वर्णाची असते. तसेच ती त्याच्या जीवनाच्या विशिष्ट अवस्थेमध्ये असते. त्या व्यक्तीचे समाजातील स्थान व जीवनावस्था यांच्याशी निगडीत कर्तव्ये असतात. म्हणजेच व्यक्तीच्या वर्णाश्रमानुसार त्याची स्वतःची कर्तव्ये म्हणजे स्व-धर्म ठरलेली असतात. गीतेमध्ये स्वधर्माचे पालन श्रेष्ठ मानले असून दुसऱ्या कोणाची कर्तव्ये पार पाडणे जोखमीचे मानले आहे. (स्वधर्मे निधनम् श्रेयः पर धर्मो भयावह :)

गीतेप्रमाणे प्रत्येक व्यक्ती सत्त्व, रजस व तमस या तीन गुणांनी युक्त असते. सात्विकता, क्रियाशीलता व अज्ञान या तीन गुणांच्या मात्रेनुसार चार वर्ण बनतात. स्वतःच्या त्रिगुणात्मक प्रवृत्तिनुसार प्राप्त वर्णाची निर्धारित कर्तव्ये पार पाडणे हेच इष्ट आहे.

भगवद्गीतेमध्ये आत्मविकासाबरोबर सामाजिक एकात्मतेचा म्हणजे लोकसंग्रहाचा संदेश देण्यात आला आहे. स्वधर्मानुसार आचरण केल्याने समाजाची प्रगती होते. स्वधर्म तसेच साधारण धर्म यांचे आचरण करणारा म्हणजे निस्वार्थ, अनासक्त बुद्धीने कर्तव्य करणारा, मानवतेच्या कल्याणासाठी कार्यरत असणारा तसेच परिणामांची अपेक्षा न ठेवणारा माणूस स्थितप्रज्ञ माणूस असतो.

### निष्काम कर्म (कर्तव्य पालन ):

सामान्य माणूस जे काही कर्म करतो त्याच्या विशिष्ट परिणामाची त्याला अपेक्षा असते. सामान्य माणसे सकाम भावनेने कर्तव्य करीत असतात. परिणामांची अपेक्षा म्हणजे कर्मफलाची आसक्ती हेच बंधनाचे कारण असते. कर्मबंधन दुहेरी असते. मनुष्य स्वतःला त्या कृतीचा कर्ता समजतो. तसेच त्याला परिणामांची आसक्ती असते. कृतीचे कारकत्व व कर्मफलाची अपेक्षा असे दुहेरी बंधन प्रत्येक कृतीशी जोडलेले असते.

प्रत्येक कृतीसाठी प्रतिक्रिया निर्माण होत असते. त्यातून परत प्रतिक्रिया निर्माण होते. अश्या प्रकारे कर्मबंधांची साखळी तयार होत जाते. हे बंधन थांबविण्याचा मार्ग म्हणजे निरपेक्षपणे कोणत्याही आसक्तीशिवाय कर्तव्ये करीत राहणे.

निष्काम कर्मयोग अनुसरणे सुद्धा दुहेरी आहे. सर्वप्रथम सर्व क्रियांचे कर्तृत्व स्वतःकडे न घेता त्रिगुणात्मिका प्रकृति या तत्त्वाकडे दिले पाहिजे. त्यानंतर व्यक्तीने त्याच्याकडून होत असलेल्या कर्माच्या फळाची अपेक्षा सोडून दिली पाहिजे.

भगवद्‌गीता निष्काम कर्म मार्गाची शिकवण देते. व्यक्तीने कर्त्याचा भाव व कर्मफळ या दोन्हींचा त्याग केला पाहिजे. स्वतःची कर्तव्ये स्वार्थाने प्रेरित होऊन करु नयेत. आपण केलेल्या कर्तव्याची फळे ईश्वराला अर्पण करावीत. कर्तव्यावर आपला अधिकार आहे. मात्र कर्मफळावर आपला अधिकार नाही. (कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन)

निस्वार्थपणे कर्तव्यपालन हे मनुष्याच्या जीवनाचे ध्येय आहे. भगवद्‌गीता कर्माचा त्याग करायला सांगत नाही तर कर्माच्या परिणामांचा म्हणजे कर्मफलाचा त्याग करण्याची शिकवण देते. गीता स्वार्थी इच्छा, कर्त्यांचा भाव व कर्मफलाचा त्याग करण्याचा संदेश देते. स्वतःच्या कृतीच्या परिणामांविषयी आसक्ती न बाळगता निस्पृहपणे स्वधर्माचे पालन करावे असा भगवद्‌गीतेचा संदेश आहे.

श्रीमद्‌भगवद्‌गीतेमध्ये मध्यम मार्ग सांगितला आहे. गीतेचे तत्त्वज्ञान सुखवादी नाही तसेच निवृत्तीवादी ही नाही. वासनांची निरंकुश पूर्ती किंवा वासनांचे दमन या दोन्ही भूमिका श्रीमद्‌भगवदगीतेमध्ये अमान्य केल्या आहेत. आत्मसंयमनाने इच्छांची पूर्ती करावी, जीवनाच्या प्रत्येक अवस्थेमध्ये विहित सुखे उपभोगावीत तसेच विहित कर्तव्ये निष्काम भावनेने पार पाडावीत असा भगवद्‌गीतेचा संदेश आहे.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्नः १. श्रीमद्‌भगवद्‌गीतेमध्ये मोक्षाप्रत जाण्याचे कोणते मार्ग सांगितले आहेत ?

२. गीतेमधील स्वधर्म म्हणजे काय ?

३. निष्काम कर्म म्हणजे काय ?

## २.४ स्थितप्रज्ञ : नैतिक आदर्श

भगवद्गीतेचा दुसरा अध्याय स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगितली आहेत. स्थितप्रज्ञाची मूर्ती जर अंतकरणात समोर उभी राहिली तर सांख्य बुद्धी आणि बुद्धी यांचा संगम होऊन त्याची परिणिती आत्म समाधीत कसे होते, हे उत्तम प्रकारे लक्षात येते.

भगवत गीता ही एक धार्मिक स्वरूपाचा ग्रंथ म्हणून रचली गेली नव्हती, तर त्यात भगवान श्रीकृष्णांची मुख इच्छा ही सर्वसामान्य संसारिक जीवन जगणाऱ्या लोकांचा प्रतिनिधी

म्हणून अर्जुनाला चांगले, सफल व समाधानी जीवन कसे जगायचे याविषयी मार्गदर्शन करावयाचे होते. या जगात राहत असताना भूकंप, अतिवृष्टी, अनावृष्टी, ज्वालामुखी उद्रेक, गुन्हेगारी, दहशतवाद, जाळपोळ, मारामाऱ्या, मोह, स्पर्धा, महत्वकांक्षा इत्यादी अनेक कारणांनी व रूपांनी माणसाला दुःखे सतावीत असतात. या आपत्तींना दुःखांना तोंड देण्यासाठी दोन मार्ग अवलंबिता येतात. एक म्हणजे आपत्तीचे कारण शोधून काढणे आणि दूसरा मार्ग म्हणजे त्या आपत्तींना यशस्वीपणे तोंड देण्यासाठी आवश्यक अशी मानसिक तयारी करणे व मनोधैर्य वाढविणे. संकट प्रसंगी माणसाला निराधार वाटू लागले व त्याची हिम्मत खचते, त्याच्या मनात निवृत्तीचे विचार सुरु होतात, तेव्हा त्याला नैराश्यातून बाहेर काढण्यासाठी भगवान श्रीकृष्णाने अशा वेळी स्थितप्रज्ञ हा आदर्श ठेवला आहे व तो सर्वांसाठी उपयुक्त आहे.

भगवद्गीतेचा आदर्श पुरुष स्थितप्रज्ञ या शब्दाने दाखवला गेला आहे. मनुष्याचे दोन भेद होतात. एक स्थितप्रज्ञ व दुसरा चंचल प्रज्ञ ज्याची प्रज्ञा चंचल असते, ते हीन अवस्थेला प्राप्त होतात आणि ज्याची प्रज्ञा स्थिर असते ते उच्च अवस्थेमध्ये विराजत असतात. हा अनुभव जगाच्या व्यवहारांमध्ये दिसत असतो. चंचलप्रज्ञ माणसे सर्व जगात आहेत. स्थितप्रज्ञ मनुष्यमात्र विरळ, कोठेतरी आढळतो. उन्नतीची ईच्छा करणाऱ्या प्रत्येक माणसाने आपल्या बुद्धीचा बुद्धीची चंचलता आधी दूर करावी आणि बुद्धिमत्तेने स्थिरता आणावी. स्थितप्रज्ञ बनलेला मनुष्यच हवा त्यावेळी समाधीमध्ये जाऊ शकतो किंवा जागृतीतही उत्तम व्यवहार करु शकतो.

अर्जुनाने श्रीकृष्णाला प्रश्न विचारला आहे की, समाधीत स्थित झालेल्या स्थितप्रज्ञाचे लक्षण काय असते ? स्थितप्रज्ञ कसा बोलतो ? कसा चालतो ? कोणत्या प्रकारच्या व्यवहारावरुन स्थितप्रज्ञ ओळखावा ? स्थितप्रज्ञ पुरुष हा दुसऱ्या लोकांना आदर्शवत होतो व हा आदर्श पुरुष दुसऱ्यांचा मार्गदर्शक होतो. स्थितप्रज्ञ आणि स्थिरबुद्धी हे दोन्ही शब्द एकच भाव दर्शवितात. स्थिर मनाच्या मनुष्य मोठेमोठे कार्य योग्य रीतीने पूर्ण करण्यास समर्थ असतो.

जेव्हा मनुष्य आपल्या मनात उत्पन्न होणाऱ्या सर्व कामनांचा त्याग करतो आणि आपल्या आत्म्याच्या ठिकाणी आपल्या योगानेच संतुष्ट राहतो, तेव्हा त्याला 'स्थितप्रज्ञ' म्हणतात. दुःखामध्ये ज्याचे मन उदास होत नाही आणि सुखावर ज्याची आसक्ती नसते, प्रीती, भय आणि क्रोध यांच्यापासून अलिप्त राहतो, त्याला मुनी स्थितप्रज्ञ म्हणतात. जो पुरुष सर्वत्र आसक्ती रहित होऊन शुभ अथवा अशुभ प्राप्त झाले असतानाही आनंदित होत नाही किंवा कशाचाही द्वेष करीत नाही, त्याची बुद्धी स्थिर झाली असे समजावे. स्थितप्रज्ञाचे पहिले लक्षण म्हणजे मनातील सर्व इच्छाचा त्याग करणे हे आहे. मनुष्याचे मन हे शुभाशुभ वासनांच्या गतीमुळे जागृतीच्या प्रत्येक क्षणामध्ये व्यग्र होऊन गेलेले असते. जेव्हा मनुष्याच्या मनाची ही व्यग्रता पूर्णपणे दूर होते, तेव्हा तो स्थितप्रज्ञ होऊ शकतो. मनाच्या शांततेसाठी शुभ आणि अशुभ कामना दूर करणे आवश्यक असते.

स्थितप्रज्ञ मनुष्य हा आत्म्यामध्येच आत्म्याच्या योगाने तृप्त होतो. तो सदा तृप्त राहिल्यामुळे त्याला कोणतीही कामना चंचल करु शकत नाही. त्यामुळे त्यांची प्रज्ञा स्थिर राहते. आत्मतृप्त मनुष्याकडून स्वभावतःच निष्काम भावनेने लोककल्याणाचे कार्य घडून येते. संपूर्ण मानवसमाजाच्या हितासाठी अशा आप्तकाम मनुष्याकडून कार्य घडून येते. पूर्णपणे निष्काम होऊन आत्मसाक्षात्काराच्या योगे चिरशांतीचा लाभ करुन घेऊन आत्मतृप्त होणे हे स्थितप्रज्ञाची अत्युच्च अवस्था होय.

दुःखात उदास न होणे, सुखाने लुप्त न होणे, आसक्ती, भय आणि क्रोध सोडणे आणि मौन धारण करणे म्हणजे अधिक बडबड न करणे ही स्थितप्रज्ञाची मानसिक लक्षणे सांगितली आहेत.

स्थितप्रज्ञ मौन धारण करुन मनन करीत राहतो. स्थितप्रज्ञ होण्यासाठी कमी बोलणे किंवा काही मर्यादेपर्यंत मौन धारण करणे आवश्यक असते. जो स्थितप्रज्ञ होऊ इच्छितो, त्याने कोणत्याही पदार्थावर किंवा कोणावरही स्नेह, प्रेम व आसक्ती ठेवू नये. स्थितप्रज्ञ कासवाप्रमाणे आपली इंद्रिये आत ओढून घेतो. त्यांना मोकाट वावरु देत नाही. हे सर्व त्याला शक्य होण्याचे कारण तो इच्छा पासून मुक्त असतो. त्याला आपले स्वरूप कळलेले असल्याने ब्रह्मी स्थिती प्राप्त होते. त्यांची ही स्थिती शेवटच्या क्षणापर्यंत टिकते. त्यामुळे त्याला परमशांती म्हणजेच ब्रह्मनिर्वाण प्राप्त होते, तो ब्रह्मात विलीन होतो.

स्थितप्रज्ञ आपल्या इंद्रियांनी नैसर्गिक रीतीने विषयसेवन करीत असतो पण त्याची रागद्वेषाची भावना नष्ट झालेली असते. त्यांची इंद्रियेही पूर्णपणे त्याच्या ताब्यात असतात, त्यामुळे त्याच्या चित्ताचे समाधान मिळत नाही. त्या अखंड समाधानवृत्तीमुळे त्याच्या सर्व दुःखांचा परिहार होऊन, त्याची बुद्धीही आत्मानंदात स्थिर होते.

ज्याप्रमाणे समुद्र हा नेहमी भरत असूनही शांत असतो, त्याप्रमाणे जो मनुष्य, समुद्रात अव्याहतपणे प्रवेश करणाऱ्या नद्यारूपी इच्छांच्या प्रवाहाने विचलित होत नाही, केवळ तोच शांती प्राप्त करु शकतो आणि इच्छा तृप्ती करण्यासाठी जो झगडतो त्याला शांती प्राप्त होत नाही. ज्या मनुष्याने इंद्रियतृप्तीच्या सर्व इच्छांचा त्याग केला आहे, जो निःस्पृह अथवा इच्छारहित जीवन जगत आहे. त्याने पूर्णपणे स्वामित्वाच्या भावनांचा त्याग केला आहे, ज्याच्या ठिकाणी मिथ्या अहंकार नाही तोच केवळ वास्तविक शांती प्राप्त करु शकतो किंवा स्थितप्रज्ञ होऊ शकतो.

जो पूर्णपणे भगवंताच्या भक्तीपूर्ण सेवेमध्ये आहे, त्याच्यामध्ये महान ऋषीकडे आढळणारे सर्व गुण असतात. परंतु जो याप्रकारे स्थितप्रज्ञ नाही त्याच्याकडे कोणतेही चांगले गुण नाहीत. कारण तो निश्चितपणे स्वतःच्या मानसिक तर्कवितर्काचा आश्रय घेत असतो. मानसिक तर्कवितर्कांना मुळे उत्पन्न झालेल्या इंद्रियतृप्तीच्या सर्व प्रकारच्या इच्छांचा मनुष्य जेव्हा त्यात करतो आणि याप्रमाणे त्याचे शुद्ध झालेले मन जेव्हा केवळ आत्म्यामध्ये संतुष्ट होते तेव्हा तो स्थितप्रज्ञ अर्थात, विशुद्ध दिव्यवस्थेत स्थित झाला असे म्हटले जाते.

कोणताही योगी, भक्त किंवा आत्मसाक्षात्कारी जीवाची कसोटी ही आहे की, तो आपल्या योजनेप्रमाणे आपल्या इंद्रियांना नियंत्रित करु शकत असतो. परंतु अधिकत्त लोक हे इंद्रियांचे गुलाम असतात आणि म्हणून ते इंद्रियांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करीत असतात. योगी कोणत्या प्रकारे स्थित असतो या प्रश्नाचे हेच उत्तर आहे. इंद्रियांची तुलनाही विषारी सर्पाशी केली जाते. त्यांना अनिर्बंध आणि स्वैर आचरण करावयाची असते. योगी किंवा भक्ताने गारुड्याप्रमाणे सर्परुपी इंद्रियांना नियंत्रित करण्यामध्ये अत्यंत खंबीर असले पाहिजे. तो आपल्या इंद्रियांना स्वतंत्र रीतीने वागण्याची मोकळीक कधीच देत नाही. शास्त्रांमध्ये अनेक आदेश, नियम आहेत व त्यापैकी काही सकारात्मक आहेत तर काही नकारात्मक आहेत. जोपर्यंत एखादा स्वतः

इंद्रीयतृप्तीवर बंधन घालत नाही व या सकारात्मक आणि नकारात्मक आदेशाचे पालन करीत नाही, तो पर्यंत तो दृढपणे स्थिर होऊ शकत नाही.

स्थितप्रज्ञ होण्यासाठी झटणाऱ्या साधकाने निष्काम बुद्धीयोगाचा व सर्वात्मभावाचा आश्रय प्रथम पासूनच घेतला पाहिजे असे गीतेचे सांगणे आहे.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्नः स्थितप्रज्ञ ही संकल्पना स्पष्ट करा.

## २.५ ऋत, ऋण व पुरुषार्थ या संदर्भातील धर्म संकल्पना

भारतीय तत्त्वज्ञानामध्ये 'धर्म' ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची सर्वसामावेशक संकल्पना आहे. 'धर्म' या शब्दाचा नेमका अर्थ अन्य भाषांमध्ये करणे अतिशय कठीण आहे. धर्म हा शब्द 'धृ' या संस्कृत धातूपासून आलेला आहे. त्याचा अर्थ धारण करणे, पोषण करणे, रक्षण करणे असा होतो. तत्त्वज्ञानामध्ये धर्म शब्दाच्या विविध छटा आढळून येतात.

ऋग्वेदामध्ये 'धर्म' हा शब्द सृष्टीचे नियम या अर्थी वापरला गेला आहे. 'ऋत' या वैश्विक नियमाचे समाजव्यवस्थेतील रेखाटन म्हणजे धर्म होय.

छांदोग्य उपनिषदामध्ये धर्म म्हणजे व्यक्तीच्या जीवनातील अवस्थानुसार निर्धारित कर्तव्यांचे (आश्रम धर्म) पालन होय.

ऐतरेय ब्राह्मणामध्ये धर्म म्हणजे योग्य आचरण होय. धर्माचे म्हणजे आचारसंहितेचे पालन व रक्षण राजा करतो.

महाभारतामध्ये धर्माची व्याख्या 'धारणात् धर्मं' इत्याहु धर्मो धारयते प्रजा अशी केली आहे. ज्याने समाजाची धारणा म्हणजे संवर्धन होते तो धर्म होय.

वैशेषिक दर्शनाचे प्रणेते कणाद यांच्या मते धर्माचे प्रयोजन ऐहिक उत्कर्ष व पारलौकिक सुख संपादन करणे व त्या संपादनासाठी साधने सांगणे हे आहे.

मीमांसा दर्शनानुसार धर्म म्हणजे वेदाज्ञा व विधी यांनी ज्ञात होणारा अर्थ होय.

मनुस्मृती व याज्ञवल्क्य व स्मृती यांच्या मते धर्म म्हणजे व्यक्तीच्या वर्ण व आश्रम यांनी निर्धारित कर्तव्याचे पालन होय.

डॉ. राधाकृष्णन यांच्या मते धर्म म्हणजे चार अवस्थांमध्ये (आश्रमांमध्ये) चार वर्णाच्या लोकांनी चार पुरुषार्थ संपादन करण्याकरिता केलेले कर्तव्य होय.

भारतीयांच्या दृष्टिकोनातून नैतिकतेची तीन अंगे आहेत. वैयक्तिक, सामाजिक व आध्यात्मिक. वैयक्तिक नैतिकता व व्यक्तिच्या स्वतःच्या आदर्शांची प्राप्ती पुरुषार्थ संकल्पनेतून व्यक्त होते. मोक्ष या पुरुषार्थामधून मनुष्याच्या आध्यात्मिक नैतिकतेचा आविष्कार होतो. 'ऋण' संकल्पना तसेच वर्णाश्रम व्यवस्था यातून सामाजिक नैतिकतेचा आविष्कार होतो.

वैश्विक व नैतिक नियमांमधील धर्म म्हणजे 'ऋत' होय. सामाजिक बांधिलकी मधील धर्म म्हणजे 'ऋण' होय. वैयक्तिक पातळीवर मूल्यांच्या पाठलागामधील धर्म म्हणजे पुरुषार्थ होय.

### २.५.१ ऋत संकल्पनाः

ऋत संकल्पना वेदांमधील अत्यंत महत्त्वाची संकल्पना आहे. ऋत म्हणजे शाश्वत अशी वैश्विक व नैतिक व्यवस्था होय. ऋत म्हणजे सत्य, सुसंगती व ज्यांचे उल्लंघन होऊ शकत नाही अशी चिरंतन प्रणाली होय. ऋत हे 'सत्यस्य सत्यम्' व 'केंद्रस्य केंद्रम्' आहे. ऋत म्हणजे 'व्रत' ही उपाधी दिलेली दैवी व्यवस्था आहे.

भौतिक विश्वामधील ऋत म्हणजे अपरिवर्तनीय असे निसर्ग नियम होत. आकाशातील ताऱ्यांचे भ्रमण, दिवस व रात्र यांचा नित्यक्रम, नद्यांचा प्रवाह, समुद्राची भरती व ओहटी या सर्व घटना ऋत ने संचालित होतात. या सृष्टीतील वेगवेगळ्या घटनांना त्यांच्या नेमक्या जागी योजणे तसेच अनेकतेतील एकता 'ऋत' मुळे शक्य होते. ऋत या सृष्टीच्या अंतर्यामी असलेले तत्त्व आहे.

नैतिक क्षेत्रामधील ऋत म्हणजे सदाचरण आहे. ऋत चा मार्ग अनुसरणारे 'व्रतानी' असून त्यांचा मार्ग देवाचा मार्ग मानला जात असे. नैसर्गिक व्यवस्थेशी सुसंगत ऋतचा मार्ग मनुष्याला समाधानी व समृद्ध जीवनाकडे घेऊन जातो.

अनृत म्हणजे चुकीचे आचरण जे ऋत च्या विरोधी असते. अनृत म्हणजे अव्यवस्था व संभ्रमावस्था होय. निसर्गनियमांच्या विरोधी असा अनृत मार्ग मनुष्याला रोग व मृत्यूकडे घेऊन जातो.

वेदांमधील देवता सुद्धा ऋत ने बद्ध आहेत. सर्वात शक्तिशाली व घृतव्रत म्हणजे दृढ संकल्प असलेली वरुण देवता ऋत ची संरक्षक देवता असून तिला 'ऋतस्य गोपः' म्हटले जाते. वरुण देवता शासक, शांतता प्रिय, रक्षक व अत्यंत दक्ष देवता आहे. सूर्य व चंद्र हे वरुण देवतेचे डोळे आहेत. वरुण देवतेच्या तीक्ष्ण व करड्या नजरेतून किंचितसेही पाप निसटू शकत नाही.

ऋत चा मार्ग अनुसरणाऱ्या लोकांवर देवतांची कृपा होते. जे ऋत चा मार्ग अनुसरत नाहीत त्यांच्यावर देवतांचा कोप होतो. म्हणजेच नैतिक व्यवस्थेमधील बक्षिस व शिक्षा 'ऋत' मुळे संचलित होते.

सदाचरणामुळे वैश्विक नैतिक व भौतिक व्यवस्थेची सार्वभौमता व एकता राखली जाते. सदाचरणाला विवेकाचे अधिष्ठान असते. वासनां आचरणामुळे ऋत ला धक्का बसतो. त्यामुळे अनाचारी लोकांना ऋत च्या संरक्षक देवतांच्या क्रोधाला सामोरे जावे लागते.

देवतांसाठी ऋत अतिभौतिक सत्ता असून मानवासाठी ऋत नैतिक नियम ठरतात. प्रारंभीच्या काळातील नित्य अश्या नैतिक व भौतिक व्यवस्थेची 'ऋत' ही संकल्पना कर्म सिद्धान्तात परिवर्तित होत गेली.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्नः ऋत संकल्पना स्पष्ट करा.

---

---

---

---

---

### २.५.२ ऋण संकल्पनाः

भारतीय परंपरेमध्ये आश्रमव्यवस्था एक अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण व्यवस्था आहे. व्यक्तीच्या जीवनातील चार अवस्थांची सांगड समाज जीवनाशी घालून वैयक्तिक व सामाजिक प्रगतीचा मार्ग या आश्रमव्यवस्थेने आखला जातो. प्रत्येक व्यक्ती त्याच्या जीवनामध्ये चार अवस्थांमधून जाते- ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यासी. या अवस्थांमध्ये व्यक्तीला काही जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. मनुष्य एक सामाजिक प्राणी आहे. समाजातील अन्य लोकांच्या सहकार्याने मनुष्याची प्रगती होत असते. प्रत्येक व्यक्ती समाजातील अन्य लोकांच्या सहकार्याने विकसित होत जाते. म्हणजेच प्रत्येक व्यक्ती काही ना काही ऋणामध्ये असते.

भारतीय तत्त्वचिंतकांच्या मते जन्माला आलेल्या प्रत्येक मनुष्यावर तीन ऋणे असतात. ऋषिऋण, पितृऋण व देवऋण हे 'ऋणत्रय' होत. ऋण फेडणे, ऋणातून मुक्त होणे म्हणजे ऋणाचे अपाकरण होय.

### १. ऋषि ऋणः

ऋषि ऋणास गुरु ऋण असेही म्हटले जाते. पूर्वीच्या काळी गुरुगृही राहून अध्ययन केले जात असे. गुरुगृही राहिल्यामुळे व्यक्तीच्या भावना व विकार यांना वळण लागत असे. व्यक्तीचे मन निकोप तरतरीत व कार्यक्षम बनत असे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होऊन पुढील प्रापंचिक व सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडण्यास व्यक्ती सक्षम बनत असे. ऋषिं कडून ज्ञानाचा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे दिला जात असे. व्यक्तीच्या विकासामध्ये ऋषींचा सहभाग अत्यंत मोलाचा असे. अध्ययन करणे, गुरुविषयी कृतज्ञता

बाळगणे, गुरुविषयी आदर बाळगणे, गुरुदक्षिणा देणे अश्या कृतींमधून ऋषिऋणातून मुक्त होता येत असे. ब्रह्मचारी आश्रमामध्ये ऋषिऋणाचे अपाकरण होत असे.

**२. पितृ ऋणः**

व्यक्तीचे स्वतःचे अस्तित्व त्याच्या पितरांवर अवलंबून असते. आपल्या पूर्वजांनी टिकविलेली वंशपरंपरा एका पिढीने पुढे नेण्याची जबाबदारी म्हणजे पितृऋण होय. पुत्रोत्पादनामुळे (अपत्यनिर्मितीमुळे) पितृऋणातून मुक्त होता येत असे. गृहस्थाश्रमामध्ये मनुष्याला अनेक कर्तव्ये पार पाडावयाची असतात. विवाह करुन आपल्या वंशाचे, घराण्याचे, समाजाचे व जमातीचे अस्तित्व अखंडित राहण्यासाठी प्रजोत्पादन आवश्यक ठरते. प्रजोत्पादन करुन गृहस्थाश्रमामध्ये व्यक्तीच्या पितृऋणाचे अपाकरण होत असे.

**३. देव ऋणः**

ही सृष्टी देवांनी निर्माण केली आहे. सृष्टीमधील शक्ती मानवी नियंत्रणाच्या कक्षेबाहेर आहेत. मनुष्याला जे काही निसर्गाकडून मिळते ते देवांच्या कृपेमुळे मिळते. यज्ञ व हवन करुन देवांविषयी कृतज्ञता व्यक्त केली जाते असे. त्यामुळे देवऋणाचे अपाकरण होत असे. गृहस्थाश्रमामध्ये तसेच वानप्रस्थाश्रमामध्ये यज्ञामध्ये देवतांसाठी आहुती देऊन देवऋणातून मुक्त होता येत असे.

सर्वसाधारणतः ऋण त्रय ही संकल्पना आढळून येते. मात्र शतपथ ब्राह्मणामध्ये व महाभारतामध्ये मनुष्य ऋण या चवथ्या ऋणाचा उल्लेख आढळतो. समाजसेवा व परोपकार करुन व्यक्ती मनुष्यऋणामधून मुक्त होत असे.

स्वतः वरील ऋणांचे अपाकरण झाल्यानंतरची व्यक्तीची अवस्था 'अननृण्य' अवस्था होय. कोणतेही ऋण शिल्लक राहिले नाही की मनुष्य मोक्ष या परम पुरुषार्थाची प्राप्ती करण्यास योग्य ठरत असे.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्नः ऋण संकल्पना स्पष्ट करा.

**२.५.३ पुरुषार्थः**

भारतीय तत्त्वचिंतकांचे ध्येय अंतिम सत्तेचे केवळ ज्ञान नव्हे तर प्रत्यक्ष अनुभूती घेणे होते. तत्त्वज्ञान म्हणजे शुभ जीवन जगण्याची कला होय. अंतिम सत्तेची प्रत्यक्ष अनुभूती घेण्यासाठी, योग्य जीवन जगण्यासाठी पुरुषार्थांची योजना केली गेली. पुरुषार्थ म्हणजे प्रत्येक व्यक्तीने (स्त्री/पुरुष) प्राप्त करुन घ्यावीत अशी परम ध्येये होत. मनुष्याच्या बौद्धिक, नैतिक, सामाजिक व आध्यात्मिक गरजांची पूर्ती करण्यासाठी धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे पुरुषार्थ

सांगितले गेले. शुभ जीवन जगण्यासाठी धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थांचा पाठलाग करावयास हवा. मनुष्यजीवनातील भौतिक गरजांची पूर्ती अर्थ या पुरुषार्थाने होते. मनुष्याच्या भावनिक व मानसिक गरजांची पूर्ती काम या पुरुषार्थाने होते.मोक्ष हा पुरषार्थ मनुष्याच्या आध्यात्मिक बाजूला संतुष्ट करतो. धर्म हा पुरुषार्थ मनुष्याच्या संपूर्ण जीवनास व्यापून असतो. सुरूवातीच्या कालखंडामध्ये धर्म, अर्थ, व काम या तीन पुरुषार्थाचा संदर्भ आढळतो. त्यांना 'त्रिवर्ग' पुरुषार्थ म्हटले जात असे. नंतर 'मोक्ष' या पुरुषार्थाचा समावेश झाल्याने पुरुषार्थ 'चतुर्वर्ग' झाले. अर्थ व काम या पुरुषार्थांना भौतिक मूल्य असून त्यांना दुय्यम स्थान आहे. धर्म व मोक्ष ह्या पुरुषार्थांना आध्यात्मिक मूल्य असून त्यांना श्रेष्ठ स्थान आहे. आत्मकल्याण व समाजकल्याण साधण्यासाठी चारही पुरुषार्थ साध्य करावयास हवे.

**धर्म :**

धर्म हा शब्द 'धृ' या धातूपासून आला असून त्याचा अर्थ संघटन करणे, संरक्षण करणे व संवर्धन करणे असा होतो. धर्माची व्याख्या 'धारणात धर्म इत्याहू:। ' अशी केली जाते. व्यक्तीचे जीवन व समाज व्यवस्था यातील समन्वय 'धर्म' या पुरुषार्थाने साधला जातो.

धर्म हा प्रथम पुरुषार्थ आहे. सर्व सजीवांमध्ये क्षुधा, निद्रा, भय व लैंगिक वासना आढळून येतात. केवळ मनुष्यप्राण्यामध्ये 'धर्म' प्रेरणा आढळून येते. धर्म प्रेरणा म्हणजे नैतिक व बौद्धिक चिंतनात्मकता होय. मनुष्याला इतर सजीवांप्रमाणे शारीरिक गरजा असतात. त्याचबरोबर इतर सजीवांपेक्षा अधिक उच्चतम मानसिक, नैतिक व आध्यात्मिक गरजासुद्धा असतात.

धर्म म्हणजे मनुष्याची कर्तव्ये होत. धर्माचे साधारण धर्म व विशेष धर्म असे वर्गीकरण केले जाते.

साधारण धर्मा मध्ये मनुष्याची निरपेक्ष कर्तव्ये येतात. सर्व मनुष्यांना काही समान कर्तव्ये असतात. साधारण धर्म व्यक्तीच्या व समाजाच्या प्रगतीसाठी आहे. साधारण धर्मपुढील प्रमाणे.

अहिंसा (वैचारिक शाब्दिक व कायिक) सत्य, अस्तेय, इंद्रियनिग्रह, अपरिग्रह, संयम, धैर्य, करुणा, क्षमा, तप, परोपकार इ.

विशेष धर्म व्यक्तीच्या वर्णानुसार व आश्रमानुसार निर्धारित होतो.

**वर्ण धर्म:**

श्रीमद्‌भगवद् गीते नुसार प्रत्येक व्यक्ती त्रिगुणात्मक म्हणजे सत्त्व, रजस व तमस या गुणांनी युक्त असते. सत्व गुण ज्ञानाचे प्रतिक असून रजस गुण क्रियाशीलतेचे प्रतिक आहे. तमस गुण अज्ञान व अकर्मण्यतेचे प्रतिक आहे. गुणांच्या कमी अधिक प्रमाणानुसार त्रिगुणात्मक व्यक्तीचा स्व-भाव बनतो. त्रिगुणात्मक स्व-भावाप्रमाणे व्यक्तीस त्याचा वर्ण प्राप्त होतो. एकूण चार वर्ण मानले जातात.

१. ब्राह्मण : शिक्षक, उपदेशक व बुद्धिजीवी हे ब्राह्मण होत. ज्ञानार्जन, ज्ञानदान, नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचे संवर्धन तसेच समाजास मार्गदर्शन ही ब्राह्मणाची कर्तव्ये होती.

२. क्षत्रिय : शासनकर्ते, राज्यकर्ते व योद्धे हे क्षत्रिय होते. समाजाचे अंतस्थ व बाह्य शत्रुंपासून संरक्षण करणे तसेच समाजाचे संवर्धन करणे ही क्षत्रियांची कर्तव्ये होती.
३. वैश्य : शेतकरी व व्यापारी हे वैश्य होत. शेती, पशुपालन व व्यापार यातून समाजाच्या गरजा भागविणे हे वैश्य वर्णाचे कर्तव्य होते.
४. शूद्र : समाजाच्या अन्य गरजांची पूर्ती तसेच उपरोक्त तीन वर्णांच्या लोकांच्या कर्तव्यपूर्तीसाठी पूरक अशी कौशल्याची कामे शूद्र वर्ण करीत असे.

ज्ञान, सामर्थ्य, संपत्ति व सेवा ही अनुक्रमे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र वर्णाची वैशिष्ट्ये होती. समाजातील प्रत्येक व्यक्तीने स्वतःचे विहित कर्तव्य निरपेक्षपणे पार पाडले की समाज रथ प्रगतीपथावर धावू शकतो. पूर्वीची त्रिगुणात्मक, स्वभावावर निर्धारित अशी वर्णव्यवस्था आज जन्मावर आधारित जाती व्यवस्थेमध्ये कलंकित झाली आहे.

**आश्रम धर्म :**

व्यक्तीच्या जीवनाच्या चार अवस्था असून त्या अनुषंगाने असलेली कर्तव्ये म्हणजे आश्रम धर्म होय.

१. ब्रह्मचर्य : व्यक्तीच्या जीवनातील ही अवस्था विद्यार्थी अवस्था होय. विद्यार्थ्याने ज्ञान संपादन करावे. काही कौशल्ये आत्मसात करावीत, आत्मसंयमन शिकावे असे ब्रह्मचारी अवस्थेसाठी अपेक्षित असे. विद्यार्थ्याने जीवन मूल्यांचे आकलन करुन घ्यावे व पुढील जीवनातील जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी स्वतःला सुसज्ज करावे.
२. गृहस्थ : ज्ञानार्जनानंतर व्यक्तीने विवाह करुन कुटुंब या सामाजिक संस्थेत प्रवेश केल्यावर गृहस्थ जीवन सुरु होत असे. प्रजोत्पादन, वृद्धांचे संरक्षण, अतिथींचे स्वागत, यज्ञ करुन समाज हितात आपले योगदान देणे गृहस्थाचे कर्तव्य असे.
३. वानप्रस्थ : कुटुंबाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर कुटुंबियांच्या मोहपाशातून मुक्त होण्यासाठी निवृत्त होणे आवश्यक ठरते. आप्त स्वकीयांपासून दूर होऊन स्वतःच्या आध्यात्मिक कल्याणाचा व समाजहिताचा मार्ग स्वीकारणे अपेक्षित होते.
४. संन्यास : सर्व परित्याग करुन भटकंती करीत समाज कार्य करणाऱ्या साधूची ही वैराग्य अवस्था असे. मोक्ष या परम पुरुषार्थाकडे वाटचाल करणे संन्यासी आश्रमात सुकर होत असे.

प्रत्येक व्यक्तीने आपली साधारण व विशेष कर्तव्ये पार पाडली की समाजाची उन्नती होते. कर्तव्यपालन म्हणजे धर्माचरण होय. बुद्धीला प्रमाण मानून केलेले संयमित आचरण म्हणजे धर्माचरण होय. सामाजिक नीती पाळली गेली की अर्थव्यवस्था चांगली चालते. धर्माने अर्थप्राप्ती व कामपूर्ती होते.

**अर्थ :**

अर्थ पुरुषार्थ संपत्तीशी जोडला गेलेला आहे. अर्थामुळे व्यक्तीच्या नैसर्गिक व भौतिक गरजांची पूर्ती होते. पशु, शेती, अन्न, वस्त्रे, धन, जमीन जुमला तसेच नफा या सर्वाचा समावेश 'अर्थ' पुरुषार्थामध्ये होतो. संपत्ती तसेच संपत्ती निर्माण करणाऱ्या साधनांचा समावेश अर्थ या संकल्पनेमध्ये होतो. मनुष्याच्या जैविक, भौतिक व आर्थिक गरजा / इच्छांची पूर्ती अर्थ या पुरुषार्थाने होते.

अर्थ पुरुषार्थ सामाजिकदृष्ट्या सुद्धा महत्त्वाचा आहे. प्रत्येक समाजामध्ये संपत्ति निर्माण होत असते. या प्रक्रियेमध्ये त्या समाजातील प्रत्येक व्यक्तीचा सहभाग असतो. निर्माण झालेल्या संपत्तीचा वाटा प्रत्येक मनुष्याला मिळायला हवा.

अर्थ संपादन करणे तसेच त्याचा विनियोग करताना धर्मपालन आवश्यक आहे. सत्ता व अधिकार यांच्याशी अर्थ पुरुषार्थाचा संबंध आहे. संपत्ति व सत्ता यांची सांगड समाजकल्याणाशी व नैतिकतेशी घालणे गरजेचे आहे. सदाचरणाने अर्थ संपादन करुन त्याचा विनियोग सह्रदयपणे व उदारपणाने समाज कल्याणासाठी व्हायला हवा.

अर्थ इच्छापूर्तीचे साधन आहे. इच्छापूर्तीने काम पुरुषार्थाचा मार्ग मिळतो. काम पुरुषार्थ, मोक्ष पुरुषार्थाचे साधन आहे. म्हणजेच अर्थ व काम हे पुरुषार्थ मोक्ष या परम पुरुषार्थाची साधने आहेत.

**काम :**

काम हा पुरुषार्थ मनुष्याच्या नैसर्गिक उर्मी, इच्छा व भावनिक गरजांशी संबंधित आहे. आस्था, आपुलकी, प्रेम ही कामाचीच रुपे आहेत. कामाची अनुभूती इंद्रियजन्य सुखे व सौंदर्यासक्त अनुभव यातूनही होते. शारीरिक प्रेरणांचे शमन तसेच भावनांची संतुष्टी यांचा समावेश काम संकल्पनेत होतो. काम पुरुषार्थाच्या प्राप्तीमुळे आत्मसंवर्धन तसेच वंश संवर्धन होते.

कामाची अभिव्यक्ती कलेच्या सौंदर्याविष्कारामधून होते. मानवी मनाच्या तीन अवस्था असतात. ज्ञानविषयक, भावनाविषयक व कृतिविषयक. भावनेशी संबंधित आदर्श म्हणजे सौंदर्य होय. कलेच्या माध्यमातून होणाऱ्या सौंदर्याविष्कारामुळे मनुष्याच्या दमन झालेल्या अव्यक्त भावनाचे विशुद्धीकरण होते.

मनुष्याच्या शमन न झालेल्या भावना व वासना पुन्हा पुन्हा जागृत होतात व मनुष्यास अशांत बनवितात. ही अशांतता व अतृप्ती परमप्राप्तव्याच्या मार्गासाठी हानीकारक आहे. मनुष्याच्या इच्छांची पूर्ती होण्यासाठी धर्माची म्हणजे नैतिक सदाचरणाची साथ अनिवार्य आहे. वासनांचे, इच्छांचे व भावनांचे धर्माचरणाने शमन केलेला जीव मोक्षाच्या मार्गाकडे जाऊ शकतो.

**मोक्षः**

मोक्ष हा परमपुरुषार्थ आहे. मानवी जीवनाचे सर्वोच्च ध्येय म्हणजे आध्यात्मिक पातळीशी जोडला गेलेला मोक्ष पुरुषार्थ होय.

मनुष्य जेव्हा अंतर्मुख होऊन आत्मपरीक्षण करतो. तेव्हा त्याला स्वतःच्या अपूर्णतेची जाणीव होते. इंद्रियजन्य सुखे तात्कालिक, अनिश्चित व दुःखमिश्रित असतात याची मनुष्याला जाणीव होते. मनुष्याची त्याच्या आत्मतत्त्वाशी ओळख म्हणजे मोक्ष होय.

मोक्ष म्हणजे जन्म-मृत्यूच्या चक्रातून, सुख दुःखाच्या फेऱ्यातून तसेच वासनांच्या बंधनातून मुक्ती होय. आत्मतत्त्वाचे परमतत्त्वाशी एकरुप होणे म्हणजे मोक्ष होय. मोक्षाची प्राप्ती झाल्यानंतर कोणतीही इच्छा रहात नाही म्हणून मोक्षास परम पुरुषार्थ म्हटले जाते.

मोक्ष म्हणजे मानवी जीवनाच्या आदर्शांचा पाठलाग होय. जेव्हा 'काय असावयास हवे' व 'काय आहे' यातील फरक नाहीसा होतो, म्हणजेच आदर्श वास्तवामध्ये अवतरतात तेव्हा मोक्षाची प्राप्ती होते.

मोक्ष पुरुषार्थाचे दोन प्रकारे विवरण दिले जातेः

१) मोक्ष म्हणजे विदेह मुक्ती आहे. काही तत्त्वचिंतकांच्या मते मनुष्याचे शरीर व मन मर्यादित, दोषपूर्ण असते. अश्या शरीराचा त्याग केल्यानंतरच मोक्ष प्राप्ती होऊ शकते.

२) मोक्ष म्हणजे जीवन मुक्ती आहे. काही तत्त्वचिंतकांच्या मते ह्या सदोष व मर्यादित शरीरामधून योग्य व शुद्ध आचरणाद्वारे मोक्ष प्राप्ती शक्य आहे. व्यक्तीची मोक्षासाठीची तळमळ व्यक्तीला शारीरिक, मानसिक व नैतिक विशुद्धीकरणानंतर चैतन्याच्याा परमोच्च पातळीकडे नेते. त्यामुळे भौतिक शरीरामध्ये मोक्ष प्राप्ती होऊ शकते.

'मोक्ष प्राप्ती' ही मनुष्याची आंतरिक इच्छा असते. उपनिषदांमधील पुढील प्रार्थना मनुष्याची मोक्षासाठी आर्तता प्रकट करते.

असतो मा सद्‌गमय । तमसो मा ज्योतिर्गमय । मृत्योमा` अमृतं गमय ।

### पुरुषार्थांची एकात्मताः

प्रा. शहा व डॉ. सुंदरराजन यांच्या मते पुरुषार्थवाद एक परिपूर्ण नैतिक सिद्धान्त आहे. पुरुषार्थवादाने मानवी जीवनाचे सर्व प्रश्न सोडविणे शक्य आहे. ह्या सिद्धान्तामध्ये व्यक्तीजीवन, समाज जीवन व जीवन ध्येये यांचा मेळ घातला गेला आहे. तसेच चारही पुरुषार्थांमध्ये एकात्मता आढळून येते. कोणत्याही एका पुरुषार्थाचा विचार स्वतंत्रपणे करता येणार नाही. धर्माचरणाने अर्थप्राप्ती होते. अर्थप्राप्ती ने कामपूर्ती होते. कामपूर्ती नंतर मोक्ष शक्य आहे.

अर्थाशिवाय धर्म म्हणजे नुसते कर्मकांड ठरेल कामाशिवाय अर्थ म्हणजे लोभीपणा होईल. मोक्षाशिवाय काम म्हणजे वासनांचा उद्रेक ठरेल. तसेच धर्म, अर्थ व काम याशिवाय मोक्ष म्हणजे एक प्रचंड पोकळी ठरेल.

### आपली प्रगती  तपासा

प्रश्नः १. भारतीय तत्त्वज्ञानातील 'धर्म' संकल्पनेचे अर्थ काय आहेत ?

२. चार पुरूषार्थ कोणते ते सांगा ?

## २.६ सारांश

नीतिशास्त्राविषयी भारतीय व पाश्चात्य दृष्टिकोन वेगवेगळे आहेत. पाश्चात्य विचारवंताच्या मते नीतीशास्त्र हा तत्त्वांचा बौद्धिक शोध आहे. भारतीय तत्त्वज्ञांच्या मते नीतिशास्त्र हा अंतिम सत्तेची अनुभूती घेण्याचा मार्ग आहे. भारतीय दर्शनातील 'धर्म' ही संकल्पना अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. ऋत, ऋण व पुरषार्थ त्या संकल्पनांमधून धर्म संकल्पना वेगवेगळ्या अर्थाने प्रतीत होते. ऋत मधील धर्म म्हणजे चिरंतन व शाश्वत अशी वैश्विक व्यवस्था आहे. ऋण मधील धर्माची अभिव्यक्ती व्यक्तीच्या जीवनातील नैतिक कर्तव्य म्हणून होते. पुरुषार्थामधील धर्म म्हणजे व्यक्तिनिष्ठ नैतिकता होय.

श्रीमद्‌भगवतगीता मोक्षाप्रत जाण्यासाठी ज्ञानमार्ग, भक्तिमार्ग व कर्ममार्ग अश्या तीन मार्गांचा पुरस्कार करते. निष्काम कर्ममार्गाला गीता प्राधान्य देते. गीतेमध्ये प्रत्येक व्यक्तीसाठी त्याच्या वर्ण व आश्रमानुसार कर्तव्ये निर्धारित केली गेली आहेत. स्वधर्माचे म्हणजे विहित कर्तव्याचे निरपेक्षपणे पालन केल्याने मोक्ष म्हणजे जीवनाचे परमप्राप्तव्य प्राप्त होते. भगवद्‌गीता केवळ व्यक्तीच्या आत्मकल्याणाचा पुरस्कार न करता समाजकल्याणाचा ही पुरस्कार करते.

## २.७ विद्यापीठीय दीर्घोत्तरी प्रश्न

१. भारतीय नीतिशास्त्राची वैशिष्ट्ये सविस्तर स्पष्टीकरण करा.
२. श्रीमद्‌भगवद्‌गीतेमध्ये मोक्षाप्रत जाण्याचे कोणते मार्ग सांगितले आहेत? त्यातील निष्काम कर्ममार्ग स्पष्ट करा..
३. श्रीमद्‌भगवद् गीतेमधील निष्काम कर्मयोगसविस्तर स्पष्टीकरण करा.
४. गीतेमधील स्वधर्म म्हणजे काय? सविस्तर स्पष्ट करा.
५. स्थितप्रज्ञ ही संकल्पना सविस्तर स्पष्टीकरण करा.
६. स्थितप्रज्ञ एक नैतिक आदर्श कशाप्रकारे आहेसविस्तर स्पष्टीकरण करा.
७. ऋत, ऋण संकल्पना सविस्तर स्पष्टीकरण करा
८. पुरुषार्थवादाचे सविस्तर स्पष्टीकरण करा.
९. पुरुषार्थ या संदर्भातील धर्म संकल्पना स्पष्ट करा.
१०. टिपा लिहा
   अ) भगवद्‌गीते मधील स्वधर्म
   ब) भगवद्गीतेमधील निष्काम कर्म
   क) भगवद्गीतेमधील भक्तिमार्ग
   ड) स्थतप्रज्ञ संकल्पना
   इ) तत्त्वज्ञानातील 'धर्म' संकल्पना
   ड) मोक्ष एक पुरुषार्थ
   इ) धर्म एक पुरुषार्थ
   फ) ऋत संकल्पना
   ग) ऋण संकल्पना

❖❖❖❖

# घटक -३

# शुभ (चांगले) जीवन : ग्रीक नैतिक चिंतन
# (THE GOOD LIFE: GREEK ETHICS)

**घटक रचना :**

३.० उद्दिष्ट्ये
३.१ प्रास्ताविक
३.२ सद्‌गुणांचे स्वरुप
३.३ सॉक्रेटिस सद्‌गुण विषयक संकल्पना
३.४ प्लेटोची सद्‌गुण विषयक संकल्पना
३.५ ॲरिस्टॉटलची सद्‌गुण विषयक संकल्पना
३.६ सारांश
३.७ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

## ३.० उद्दीष्ट्ये

१) प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ सॉक्रेटिस, प्लेटो व ॲरिस्टॉटल यांनी मांडलेले शुभ जीवन विषयक विचार व त्यांचा अन्वयार्थ समजून घेणे.
२) मानवी शुभजीवन हे सद्‌गुणयुक्त असते हे जाणून घेणे.
३) प्लेटो व ॲरिस्टॉटल यांचे सद्‌गुण व चारित्र्य या संदर्भातील योगदान जाणून घेणे.

## ३.१ प्रास्ताविक

आदर्श निर्धारक (आदर्श नियामक) नीतीशास्त्र हे शुभाशुभ, चांगलेवाईट यांच्या संदर्भात मानवी ऐच्छिक वर्तनाचा अभ्यास करते. या संदर्भातील मानवीवर्तनाच्या नैतिक मापदंडाचाही (मानंदड) शोध घेते. त्याचबरोबर मानवी सद्‌गुणांचेही हे शास्त्र विश्लेषण करते. साधारणतः आपण मानवी वर्तनाचे व चारित्र्याचे नैतिक मूल्यमापन करतो. प्रस्तुत घटकात प्लेटोप्रणित शुभजीवन वा चांगले जीवन आणि सद्‌गुण यांची चर्चा केलेली आहे.

## ३.२ सद्‌गुणांचे स्वरुप

प्लेटो-प्रणित चार प्रधान सद्‌गुणांची चर्चा करण्यापूर्वी आपणाला सद्‌गुण ही संकल्पना समजून घेतली पाहिजे. आपण नैतिक विधाने करतो. मानवी ऐच्छिक वर्तन, त्या वर्तनाच्या

मुळाशी असलेले हेतु व इच्छा, व मानवाचे शील तीन विषयांवर आपण नैतिक निर्णय देतो. यांत नैतिक निर्णयाचा महत्त्वाचा विषय असतो तो चारित्र्य वा माणसाचे शील. माणसाचे गुण, भावना, अभिवृत्ती व सवयी यांचे ते रसायन असते. ते सातत्याने घडत असते व थोडेफार बदलतही असते. ते अगदीच अपरिवर्तनशील नसते तरी त्याला एक प्रकारचा स्थायीपणा आलेला असतो. त्यात मानसिक गुणांची कमीअधीक प्रमाणात स्थायी एकात्मता आलेली असते.

**आदर्शलक्ष्यी (आदर्शनिर्धारक):**

नीतिशास्त्रात नैतिक चारित्र्य व नैतिक सद्‌गुण यांचे विश्लेषण केले जाते. अशा गुणांनाच सद्‌गुण म्हटले जाते. व्युत्पत्तिशास्त्रानुसार वीर (Vir) म्हणजे हिरो संस्कृतातील 'वीर' शब्दाचा अर्थही हिरो (Hero) होतो. प्रा.पी.बी. चटर्जी या संदर्भात लिहितातः इंग्रजीतील Virtue हा शब्द लॅटिनमधील व्हर्ट्स (Virtus) व संस्कृतातील 'वीर्य' यांच्याशी मिळता जुळता आहे. या शब्दांचा अर्थ होतो पौरुष, शौर्य, शक्ती वा उत्कृष्टता (निपुणता) इ. ग्रीकांच्या दृष्टीने व्हरच्यू शब्द निपुणतेचा, उत्कृष्टतेचा निदर्शक आहे. माणसाचे चांगले गुण म्हणजे सद्‌गुण होत. त्याचे वाईट गुण म्हणजे दुर्गुण हेत. हे सद्‌गुण जाणिवपूर्वक व निर्धारपूर्वक संपांदन केले पाहिजेत. अशा सद्‌गुणांच्या संपादनामुळे मानवाचे मनुष्यत्व व माणसांचा समाज टिकून राहतो. अर्थात मानवता व मानवी समाज टिकविण्यासाठी हे सद्‌गुण आवश्यक असतात.

ज्या माणसात असे सद्‌गुण असतात व जो माणूस इतरांच्या संदर्भात व कठीण परिस्थितीत असे सद्‌गुण अभिव्यक्त करतो, त्या माणसाची प्रशंसा केली जाते.अशा सद्‌गुणांना माणसांच्या चांगल्या सवयी असेही म्हणता येईल. एकांन्तात नैतिक जीवनाची अभिव्यक्ती दिसत नाही, बदलत्या परिस्थितीत नियमीतपणे, न चुकता सत्कर्मे, कर्तव्यकर्मे करीत राहील्यास माणूस शुभजीवनाकडे वाटचाल करतो. त्याचे नैतिक जीवन विकसीत होते. माणसांचे वर्तन व चारीत्र्य हे अविभाज्यपणे जोडलेले असते. त्याचे शील वा चारित्र्य हे विविध परिस्थितींमध्ये त्याच्या वर्तनात व्यक्त होत असते. त्या उलट चांगली कर्मे (कर्तव्यकर्म व सत्कर्म) करता करता माणसाचे नैतिक चारित्र्य घडत असते. परंतु ही सत्कर्मे सुसंगतपणे व नियमितपणे केली पाहिजेत. उदा. जर एखादा माणूस आपले कर्तव्यकर्म प्रामाणिकपणे व उत्कृष्टपणे करीत असेल तर त्यात कर्तव्यनिष्ठा हा सद्‌गुण विकसित होतो. तो कर्तव्यनिष्ठ बनतो. म्हणून एक लेखक म्हणतो- Sow an act reap a habit, Sow a habit, reap a character. Sow a character and reap a destiny.

सातत्यपूर्वक चांगले कर्म करीत राहिल्यास चांगली कर्मे करण्याची सवय लागते. अशा सवयीमूळे शील तयार होते. त्यामुळेच आपण आपल्या नियतीचे शिल्पकार बनतो. अशा प्रकारे सद्‌गुण हे संपादन करता येतात. म्हणूनच त्यांना चारित्र्य-मूल्ये असेही म्हणतात. तसेच ते कष्टसाध्य असल्यामुळे त्यांना सद्‌गुण हे माणसाच्या अर्जित प्रवृत्ती असेही म्हणता येईल. अर्थात सद्‌गुण हे मानवी चारित्र्याची उत्कृष्टता दर्शवितात. दुर्गुण हे त्यासंदर्भातील दोष होत. होण्याची नैतिकता व करण्याची नैतिकता असे नैतिकतेचे भाग केल्यास सद्‌गुण हे सद्‌गुणी होण्याची नीतीमत्ता दर्शवितात. कर्तव्य व सत्कर्म हे करण्यांच्या नैतिकतेचे द्योतक आहेत. महापुरुषांचा एक अर्थपूर्ण संदेश असतो. तो म्हणजे, 'चांगले व्हा व चांगले वागा'. (Be good and do good) चागंले वा सद्‌गुण होण्याचा एक राजमार्ग म्हणजे सुसंगतपणे, सातत्यपूर्वक चांगली कामे वा सत्कर्मे करणे होय.

कर्तव्ये ही अत्यावश्यक स्वरुपाची असतात. कोणताही माणूस हा आपले कर्तव्यकर्म करीत असतो. सद्‌गुण हा त्या माणसाचे गुण दर्शवितो. म्हणून आपण रास्तपणे म्हणतो की एखादा माणूस सद्‌गुणी आहे याचा अर्थ त्यांच्या व्यक्तित्वात सद्‌गुण आहेत असा होतो. असा सद्‌गुणी माणूस केवळ सद्‌गुणी न राहता, सदाचारी वा सत्कर्मे करणाराही असतो 'सद्‌गुणांना रजा नसते' असे म्हणतात. जर माणूस नैतिक चारित्र्यसंपन्न असेल तर त्याच्या जीवनात नैतिकतेत रजा नसते. तो माणूस नीतीमत्तेचा मार्गसोडीत नाही. एवढेच नव्हे तर त्याच्या सुसंगत सदाचरणावरुन आपण त्यांच्या चारित्र्याविषयी अनुमान करतो. अर्थात माणसाने 'सद्‌गुणी' होण्याचा निर्धार करावा लागतो व त्यासाठी सत्कर्मकरण्याचा मार्गनिवडावा लागतो. विशेष म्हणजे सद्‌गुणांमुळे सद्‌गुणी व सदाचारी माणसांचे कल्याण होते व समाजाचेही भले होते. दुर्गुण हे दुर्गुणी व दुराचारी माणसाचे व त्याच्या समाजाचे नुकसानच करतात.

## ३.३ सॉक्रेटिस सद्‌गुण विषयक संकल्पना :

सॉक्रेटिस चा जन्म ख्रिस्तपूर्व ४७० किंवा ४६९ साली असा झाला असावा. त्याच्या पित्याचे नाव सोप्रोनिकस होते. त्याच्या आईचे नाव फेंनरीट होते व ती सुईनीचा व्यवसाय करीत असे. त्याच्या व्यक्तिमत्त्वात प्रसन्नता होती व स्वभावात सौजन्य होते. तो महान द्रष्टा होता, तसाच तो व्यवहार निपुण होता. त्याचे टीकाकार त्याला धूर्त समजत. त्याला जेवढे स्पष्टपणे दिसे व आकलन होईल तेवढेच तो मानत असे. त्यापलीकडे तो काहीच मान्य करावयास तयार नसे. असे तो जाणून-बुजून करीत नसे. पण तो कोणतेही अतिरेकी भूमिका घेण्याचे टाळत असे.

सॉक्रेटिस ने स्वतःचे असे वेगळे देव निर्माण करुन तो त्याची पूजा करीत असे व तरुणांना बहकवून कुमार्गाला लावणारी शिक्षण देतो. हा आरोप त्याच्यावर लावून त्याला दोषी ठरवले व खटला चालवून त्याला मृत्यूची शिक्षा देण्यात आली. त्याला हेमालॉक नावाचे विष देण्यात आले. त्याचा मृत्यू ख्रिश्चन पूर्व ३९९ साली मे महिन्यात झाला.

**सद्‌गुण म्हणजे ज्ञान :**

सॉक्रेटिसला ज्ञानाचे प्रचंड आकर्षण व प्रेम असूनही केवळ ज्ञाना करिता ज्ञान मिळवणे हे त्याचे ध्येय नव्हते. केवळ कल्पनांचा खेळ करण्यात रमून जाणे, स्वैर कल्पनांच्या विहारात व साम्राज्यात स्वच्छंदाने तरंगत राहणे हे सॉक्रेटिसचे ध्येय नव्हते. उलट ज्ञानाने आपले नैतिक आचरण व नैतिक जीवन स्वच्छ, पवित्र व उच्च पातळीचे व्हावे असाच त्याचा आग्रह होता. व्यवहारात व प्रत्यक्ष जीवनात ज्ञानाने माणसांना सदाचरणी व सच्छील बनवावे अशीच त्याच्या त्याची खऱ्या ज्ञानापासून अपेक्षा आहे.

सॉक्रेटिसच्या मते संकल्पनेचे स्पष्ट व निसंदिग्ध ज्ञान हे नैतिक आचरणास कसे सहाय्यक, उपयुक्त व आवश्यक आहे हे स्पष्ट होते. 'सद्‌गुण म्हणजे ज्ञान' ही त्यांची उक्ती एक अविनाशी विश्वसत्य म्हणून ओळखली जाते. त्याच्या मते, आत्म्यामध्ये अविवेकाचा असा कोणताही भाग जणू नसतोच. माणसाची प्रत्येक कृती ही बुद्धीने निर्धारित होत असते. माणसाची केवळ बुद्धीच सर्व काही ठरवीत व नियंत्रित करीत असते. म्हणजे एखादी गोष्ट योग्य व चांगली आहे आणि तरीही ती न करणे व कृतीत न आणणे किंवा एखादी गोष्ट वाईट आहे असे माहीत असूनही ती करावयास भाग पाडणाऱ्या प्रवृत्तींना बळी पडणे ही गोष्ट सॉक्रेटिसच्या मते केवळ शोकजनक व घातकच नाही पण ती घडणे केवळ अशक्यप्राय आहे. इच्छेच्या आहारी जाणाऱ्या

मनाच्या प्रवृत्तीच्या विरुद्ध सॉक्रेटिस नुसता निषेध किंवा झगडा करुन थांबत नाही, पण इच्छेने मानवी मन पूर्णपणे गिळंकृत होणे, मानवी कामवासनेच्या संपूर्ण हरी जाणे ही गोष्ट तो अशक्यच समजतो.

सॉक्रेटिस म्हणतो 'स्वेच्छेने कोणीही मनुष्य चुकीचे व अनिष्ट वर्तन करीत नाही.' या त्याच्या उक्तीला दुहेरी महत्त्व आहे. एक तर तिचा अर्थ असा आहे की प्रत्यक्ष घटनांच्या असंख्य त्रुटीचे खरे कारण हे आकलनशक्तीचा अपुरा विकास झालेला असतो अशी खात्री असणे खात्रीशीररित्या असेही त्यात अभिप्रेत आहे की कृतींच्या उद्दिष्टं विषयी नव्हे, पण केवळ साधनांबाबत मतभेद आहेत. प्रत्येक जण निरपवादपणे केवळ जे चांगले व शिव आहे फक्त त्याचीच इच्छा करतो असे गृहीत धरण्यात येते. माणसामाणसांमधील भेद हे त्यांचे उद्दिष्ट व ध्येये वेगवेगळी असतात म्हणून होत नसून सर्वांचे जे सामायिक व साधारण ध्येय आहे ते प्राप्त करुन घेण्यासाठी कुवत व ताकद लागते तिच्यातील कमी जास्त प्रमाणावर अवलंबून असतात आणि ही कुवत बहुतांशी विकासाच्या प्रमाणावर अवलंबून असते असा अर्थ सॉक्रेटिसच्या या उक्तीचा होऊ शकतो.

सुख व सदाचरण यात सॉक्रेटिसच्या मताप्रमाणे तादात्म्य आहे. पण शहाणपण व सदाचरण हे दोघे गुण एकच आहेत आणि ज्याप्रमाणे शहाणपण शिकवता येते तसेच सदाचरणी ही शिकवण्याने येते व त्याचे धडे देता येतात अशी सॉक्रेटिसची भूमिका आहे. सॉक्रेटिसचा बुद्धीच्या स्वयंपूर्णतेवर प्रचंड विश्वास असण्याचे कारण असे होते की, आपल्या ध्येयांनी तो इतका भरुन गेला होता की विचारातील चुकी शिवाय इतर कोणत्याही कारणामुळे माणसाचे अधःपतन होऊ शकते ही गोष्ट काही केल्या त्याच्या कल्पनेला पटेना.

नेमके चांगले काय व वाईट काय हे काढण्याची कुवत म्हणजे एक प्रकारचे अंतदृष्टी असते काही वेळा माणसे याचा अर्थ स्पष्ट नसतो अशा भावना, पूर्वग्रह, कल व परंपरेने प्राप्त झालेल्या रुढी यांच्या प्रभावाखाली विचार करतात व या यद्दच्छेने चांगले काय हे निवडतात; पण ते जाणीवपूर्वक व विवेकपूर्वक रीतीने घडत नाही. योगायोगाने चांगले कार्य हे त्यांना समजते व त्याची निवड करुन ते आचार करतात. सर्वसामान्य माणसे बऱ्याच वेळा भ्रमात वावरतात व चुकीचा निर्णय घेतात. पण त्यांची विचारशक्ती तरतरीत, निर्विकार, निस्वार्थी व समतोल असली तर चांगले काय आहे हे ठरवताना त्यांच्या मनात संदेह, ओढाताण, संघर्ष राहणार नाही व अशी माणसे अचूकपणे अयोग्य व चांगले आहे त्याचे स्वरूप यथार्थपणे समजून घेऊन त्याची निवड करु शकतात. हे कळण्यासाठी वस्तूचे किंवा परिस्थितीचे अचूक ज्ञान व निदान ज्यामुळे होते ती एक प्रकारची अंतदृष्टी असते असे सॉक्रिटिसचे मत आहे.

झेनोफोनने लावलेला चांगला या शब्दाचा अर्थ ते हितकारक व उपयुक्त असते आणि या अर्थाने पाहिल्यास सदाचरण हे विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट उद्दिष्टे साध्य करुन घेण्यास जे मदतगार असते ते ठरते. या पद्धतीने विचार केल्यास शहाणपण हे एखाद्या कृतीचे परिणाम कितपत हित अहीत करतील याचा तौलनिक विचार करण्यात व्यक्त होते. मात्र सॉक्रिटिसने नेमका या विरुद्ध अर्थ लावून सद्‌गुण म्हणजे आत्मसंयम व इंद्रियनिग्रह असा अर्थ लावला.

या अर्थाने पाहता सॉक्रेटिसच्या शिवाच्या संकल्पनेचा आशय अनिश्चित ठरतो; कारण चांगले (शिव) काय ते प्रत्येक विशिष्ट बाबतीत वेगवेगळ्या उद्दिष्ट व त्यास सहाय्यक व उपयोगी

ठरणारे असल्याने शिवाचा अर्थ पोकळीत व मूर्त स्वरूपात ठरवता येणे शक्य नाही. कारण जे चांगले असते ते कशासाठी तरी चांगले असेच राहणार. खरे पाहता संबंध ग्रीक तत्वज्ञानात चांगले याचा अर्थ नेहमीच भावात्मक व भरीव आहे. चांगुलपणा हा चांगल्या माणसाच्या आत्म्याची काहीतरी मूर्त करण्याची सवय असते. केवळ अमुक अमुक प्रकारांचे अपायकर्म न करणे असा नकारात्मक अर्थ त्याला राहिलेला नव्हता. समाज किंवा शासन संस्था यांचे हित व भले करण्याची प्रवृत्ती हे नैतिक सद्‌गुणांची द्योतक समजले जात होती. वेगवेगळ्या उद्दिष्टांना व ध्येयांना अनुलक्षून सहाय्यकारी व उपकारक जी साधने किंवा मार्ग असतात ते चांगले ठरतात. पण या रीतीने बघितल्यास चांगुलपणात किंवा सद्‌गुणात एक प्रकारची अनेकता व सापेक्षता येऊ शकते. अनेक कारणास्तव अनेक प्रकारचे वागणे किंवा अनेक प्रकारच्या कृती चांगल्या ठरु शकतात. पण सर्वांना एकाच अथार्ठने अमुक एक चांगले हे मात्र या पद्धतीने ठरवणे शक्य होत नाही. सर्वांना साधारण व एकाच अर्थाने चांगले वाटावे असे सार्वदेशिक शिव (चांगले) असले पाहिजे असे सॉक्रेटिसला वाटते.

दुसरा एक मुद्दा सॉक्रेटिसने उपस्थित केलेला आहे व तो म्हणजे चांगुलपणाचे ऐक्य होऊ शकते का? चांगुलपणाची जी व्यवसायिक शिकवणूक होती ती असे सूचित करते की, एखादा मनुष्य चांगुलपणाची एक शाखा शिकू शकतो व दुसरी शिकू शकत नाही. म्हणजे एखादा मनुष्य धैर्य शकतो पण प्रामाणिकपणा मात्र शिकू शकत नाही किंवा प्रामाणिकपणाशिवाय धैर्य हा गुण शिकू शकतो; आणि चांगुलपणाचे असे पुष्कळ आकार हे बाह्यप्राप्तीसारखे असले तर त्यांचा परस्परांशी काहीच प्राणमय संबंध असू शकणार नाही व म्हणून चांगुलपणा हा एक असतो असेही आपणास म्हणता येणार नाही. उलट, सॉक्रेटिस एखाद्या विशिष्ट सद्‌गुणास ज्ञानाशी एकरूप समजण्यास तयार नव्हता; कारण त्याच्या मते जर आपण एखाद्या विशिष्ट सद्‌गुण ज्ञानाशी एकरूप समजलो तर मग तो सद्‌गुण व चांगुलपणा दुसरा एखादा प्रकार यांच्यात फरक करावयास जागाच राहणार नाही. या दृष्टिकोनातून सर्व विशिष्ट सद्‌गुण हे एकाच चांगुलपणात विसर्जन पाहतात.

सॉक्रेटिसचे दुहेरी एक म्हणणे आहे की, नैतिक सद्‌गुण किंवा सदाचरण शिकविता येते. म्हणजे जसे आपले अंकगणित, भूगोल किंवा इतर विषय शिकवून येतात, तसेच सदाचरणीही शिकवून निर्माण करता येते. पण अधिक काळजीपूर्वकपणे विचार केला तर असे दिसून येते की, केवळ चांगले व इष्ट काय यांचे बौद्धिक आकलन होऊन नैतिक आचरण सुधारत नाही, तर नैतिक सदाचरण हे व्यक्तीची जन्मजात स्ववृत्ती व वंशदाय परिस्थिती यावर शिक्षण, सवयी व वर्तन यांचे होणारे बरेवाईट परिणाम या सर्वांचा परिपाक असते. आणि या सर्वांचा परिणाम असा होतो की जसजशी व्यक्ती वयाने वाढते तसतसे तिचे शील बदलतेच असे नाही. अर्थात हेही खरेच आहे की सतत इंद्रियनिग्रह करण्याने व चांगले व विचारपूर्वक वागण्याने काही प्रमाणात माणसाचे आचरण सुधारते, पण एकूण मनुष्य असतो तसाच राहतो. त्याच्यात संपूर्ण व समूळ परिवर्तन फारसे घडू शकत नाही.

सॉक्रेटिसची युगप्रवर्तक कामगिरी आहे ती अशी की, त्याने संकल्पनांची वैज्ञानिक उपपत्ती घडविली. या त्याच्या उपपत्तीमुळे त्याला तत्त्वज्ञानाच्या इतिहासाच्या प्रदीर्घ क्षेत्रात अत्यंत उच्च, मोलाचे व शाश्वत असे स्थान प्राप्त झाले. त्याची दुसरी महत्त्वाची कामगिरी आहे ही त्याने नैतिक उत्पत्ती तयार केली ही त्याच्या नैतिक उत्पत्तीची युक्तता जरी सार्वदेशिक अर्थाने प्रस्थापित होऊ शकली नाही तरी ती फार महत्त्वाची आहे यात शंका नाही.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न: सॉक्रेटिस मते सद्‌गुण म्हणजे काय?

## ३.४ प्लेटोची सद्‌गुणविषयक संकल्पना

प्लेटो हा महान तत्त्वचिंतक सॉक्रेटिस या तत्त्ववेत्त्याचा खरा शिष्य म्हणून ओळखला जातो. प्लेटोने चार प्रधान सद्‌गुणांची संकल्पना मांडली. ह्या चार सद्‌गुणांचा सिद्धांन्त समजून घेण्यासाठी त्याचे सद्‌गुणविषयक विचार समजून घेणे अगत्याचे होय. प्लेटोच्या मतानुसार मानवी स्वभावाच्या प्राकृतिक व योग्य कार्यात चांगलेपणा असतो. तसेच माणूस हा समाजशील प्राणी आहे. मानवाचे नैतिक जीवन हे सामाजिक परिसराच्या संदर्भात घडत असते. माणसाच्या सामाजिकतेच्या पार्श्वभूमीवर त्याची नैतिकता तपासली पाहिजे. सॉक्रेटिस म्हणत असे, 'सद्‌गुण म्हणजे ज्ञान होय'. (न्रूल ग ख्व्हदैुा)याचा अर्थ असा की खऱ्या अर्थाने सद्‌गुणी होण्यासाठी माणसाने सद्‌गुणांचे मर्म जाणले पाहिजे. अशी नैतिक मर्मदृष्टी प्राप्त झाल्यास माणूस सद्‌गुणी होतोच. सॉक्रेटिसचे हे मत खरे असले तरी सद्‌गुणी होण्यासाठी सद्‌गुणांचे ज्ञान होणे, पुरेसे नसते. कर्तव्यकर्मे व सत्कर्मे करीत करीत माणसाला सद्‌गुण आत्मसात करावयाचे असतात.

प्लेटोच्या मते सद्‌गुणयुक्त जीवन हेच खरे चांगले मानवी जीवन होय. त्याच्या नैतिक चिंतनात प्लेटोने चार प्रधान वा मौलिक सद्‌गुणांचा सिद्धांत मांडलेला आहे. हे चार सद्‌गुण संपादन करणे म्हणजेच नैतिक जीवन होय. हे चार सद्‌गुण म्हणजेच शहाणपण (ज्ञान), धैर्य (शौर्य), आत्मसंयम व न्याय होत. प्लेटोने या सद्‌गुणांना 'कार्डिनल' असे विशेषण लावलेले आहे. कार्डो या शब्दापासून कार्डिनल शब्द निष्पण्ण होतो. कार्डो म्हणजे बिजागिरी होय. ही बिजागिरी दरवाजाला आधार देते व तिच्या आधारावर दरवाजा उभा राहतो व फिरतो तसेच सद्‌गुणांचे आहे समाजाच्या संदर्भातील मानवी नैतिक जीवनांचा आधार म्हणजे हे चार सद्‌गुण होत. हे सद्‌गुण मूलभूत असून इतर सद्‌गुण गौण होत. फ्रँकेनाच्या मते हे प्रधान सद्‌गुण परस्परांमधून निष्पन्न होत नाहीत. इतर सद्‌गुण हे त्यांच्यातून निष्कर्षित केले जाऊ शकतात. मानवी स्वभावात व व्यक्तित्वात बुद्धीप्रमाणे विकार व वासनाही असतात.

प्लेटोच्या मतानुसार मानवी व्यक्तित्वात तीन घटक असतात:- १) वासनात्मक वा विकारप्रधान घटक, २) गतिमान अशी इच्छाशक्ती ३) बौद्धिक वा दार्शनिक घटक या तीन घटकांच्या कार्यामध्ये सामंजस्य वा सुसंगती असेल तर व्यक्तीच्या जीवनात 'न्याय' हा सद्‌गुण साकारित होतो. प्रत्येक घटकाचे काही प्राकृतिक कार्य असते. या तीन घटकांची कार्ये परस्परांशी सुसंगत राहून सुरळीतपणे होत राहिल्यास नैतिक जीवन जगता येते. त्यासाठी बौद्धिक घटकाने दिलेले आदेश इच्छाशक्तीने स्वीकारुन वासनांवर नियंत्रण ठेवल्यास तीन घटकांमधील एकात्मता साधता येते व मानवी जीवन सुरळीत चालते.

**शहाणपण :-**

शहाणपण (ज्ञान) हा बुद्धीचा सद्‌गुण आहे. ज्ञान संपादन करणे व ज्ञानांकुशता हे या घटकांचे कार्य होय. हे केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे. या ज्ञानामुळे निर्धारपूर्वक योग्य मूल्यांचा व सद्‌गुणांचा स्वीकार केला पाहिजे. अर्थात ज्ञानी माणूस हा ज्ञानांकुशता स्वीकारतो, ज्ञानाच्या आधारे निर्णय घेतो व वासना विकारांवर नियंत्रण ठेवतो.

**धैर्य:-**

धैर्य (शौर्य) हा इच्छाशक्तीचा सद्‌गुण होय. बुद्धीने निर्धारित केलेल्या कक्षेत या घटकाने कार्य करावयास हवे. शौर्यात दोन प्रकार दिसून येतात.

१) सैनिकाचे भौतिक शौर्य
२) विचारवंताचे व समाज सुधारकाचे नैतिक धैर्य. युद्धात सैनिकाने शौर्य दाखविले पाहिजे. तसेच चिंतकाने व तत्त्वज्ञाने तत्त्वनिष्ठेच्या वा सत्यनिष्ठेच्या संदर्भात धैर्य दाखविले पाहिजे.

**आत्मसंयम :-**

आत्मसंयम (संयमाने उपभोग) हा वासनात्मक घटकाचा सद्‌गुण होय. 'वासना त्याज्य आहेत'. अशी प्लेटोची भाषा नाही. तो वासनांची निंदाही करत नाही. त्यांच्या मागण्यांकडेही माणसाने लक्ष दिले पाहिजे. विशिष्ट प्रमाणात त्यांचे समाधान करणे आवश्यक आहे. संयमित उपभोग हा या संदर्भातील सद्‌गुण होय. या घटकाने बौद्धिक नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्राकृतिक विकारांचे नियंत्रण केले जाते. त्यांच्यात एक व्यवस्था निर्माण केली जाते. इच्छाशक्तीने व वासनांनी बुद्धीचे आदेश मान्य केल्यास नैतिक जीवन जगणे सुलभ जाते. व जीवनातील घटकांमध्ये समरसता, सामंजस्य निर्माण होते.

**न्याय:-**

न्याय हा संपूर्ण व्यक्तित्वाचा सद्‌गुण होय. व्यक्तित्वाच्या विविध घटकांमध्ये व त्यांच्या कार्यात सामंजस्य निर्माण करणे म्हणजे 'न्याय' हा सद्‌गुण प्राप्त करणे होय. ज्या कार्यासाठी जो घटक योग्य आहे. ते कार्य त्या घटकाकडून व्हायला हवे. बुद्धी, इच्छाशक्ती व वासनाविकार आपले व्यापार वा कार्य परस्परांशी सामंजस्य साधून करीत असतात, तेव्हा 'न्याय' हा सद्‌गुण साधला जातो. अर्थात प्रत्येक घटकाने आपले कार्य करण्यात 'न्याय' आहे. प्रत्येक घटकाने स्वतःच्या स्वधर्मानुसार (स्वभावानुरुप) काम करावयास हवे. आदर्श नैतिक जीवन म्हणजे ज्ञानी, शूर, संयमित व न्यायी माणसाचे जीवन होय. न्यायी माणूस हा भोगांचा गुलाम नसतो. त्यांनी बुद्धीचे श्रेष्ठत्व स्वीकारलेले असते. त्यांच्या जीवनात आशा, आकांक्षा असतात. परंतु त्यांच्यावर बुद्धीचे वर्चस्व असते.

प्लेटोच्या मते हे सद्‌गुण व्यक्तिगत व सामाजिक दृष्ट्याही महत्त्वाचे असतात. ते व्यक्तीत व समाजातही दिसून येतात. माणूस हा बुद्धिमान तसाच समाजशील प्राणी आहे. तो एकटा राहात नाही. त्याला दुसरा माणूस हवा असतो. 'समाज ही व्यक्तीची विस्तृत आवृत्तीच असते.' म्हणून व्यक्ती व समाज या दोहोंनाही नीतीमत्ता आवश्यक असते. वर सांगितल्याप्रमाणे व्यक्तित्वात तीन घटक असतात. हे तीनही घटक प्रत्येकात असतात. परंतु ते प्रत्येकात कमी अधिक प्रभावी असतात. काही व्यक्तींमध्ये बौद्धिक घटक प्रभावी असतो, तर काहींमध्ये

इच्छाशक्ती प्रभावी असते. बहुसंख्य लोकांमध्ये विकार अधिक प्रभावी असतात. म्हणून समाजात तीन वर्ग दिसून येतात.

हे तीन वर्ग म्हणजे:-
१) लोकपालांचा वर्ग,
२) सहाय्यक वर्ग,
३) सर्वसामान्य लोकांचा वर्ग.

**१) लोकपालांचा वर्ग:-**

लोकपालांमध्ये दार्शनिक वा बौद्धिक घटक प्रभावी असतो. ते ज्ञानोपासक असतात. ते सत्यशोधक असतात. तसेच ते सत्यनिष्ठ असू शकतात. शहाणपणा वा ज्ञानांकुशलता हा त्यांच्यातील प्रधान सद्‌गुण होय. त्यांन प्लेटा राजर्षी (तत्त्वज्ञशासक) असे म्हणतो. अशा राजर्षींचे शासन आदर्श राज्य वा आदर्श समाज निर्माण करु शकते.

**२) सहाय्यक वर्ग:**

ह्या वर्गाचा मुख्य सद्‌गुण असतो तो म्हणजे 'दुर्दम्य इच्छाशक्ती'. ह्या वर्गातील सदस्यांचा मुख्य सद्‌गुण असतो धैर्य वा शौर्य ते कर्तृत्ववान असतात. पराक्रमाने कीर्ती व यश संपादन करण्यात त्यांना धन्यता वाटते. ते बाह्य आक्रमणे व आंतरिक बंडाळीपासून समाजाचे, राज्याचे रक्षण करतात. विद्वानांनी अर्थात लोकपालांनी केलेले कायदे ते अमलात आणतात. ते राजर्षीचे समर्थन करतात. त्यांच्या आज्ञांचे पालन करतात.

**३) बहुजन समाज:**

हा सर्वसामान्य माणसांचा असतो. या वर्गात उत्पादक, शेतकरी, मच्छीमार, व्यापारी, सुतार, लोहार, चांभार, कुंभार वगैरे सर्वांचा समावेश होतो. त्यांच्यात भौतिक गरजा प्रभावी असतात. 'संयमित उपभोग' हा त्यांचा सद्‌गुण होय. उत्पादक कामे करून ते समाजाच्याही भौतिक गरजा भागवितात. हा वर्ग प्रामुख्याने श्रमजीवी असतो.

लोकपाल हे जाणते शासक असतात. ते बहुजन समाजाला दिशा दाखवितात, त्यांना नियंत्रणाखाली ठेवतात. या तीन वर्गातील व्यक्ती जेव्हा आपली कामे व्यवस्थितपणे व नियमितपणे करतात. तेव्हा समाजात 'न्याय' हा सद्‌गुण विकसित होतो. नायाधीष्ठित समाजात ज्ञानी लोकपालांनी केलेले नियम इतर दोन वर्गातील सदस्य मान्य करतात. लोकपालांच्या जीवनातसुद्धा ज्ञानांकुशता असते. ते ही आपल्या वासना नियंत्रित करतात व आपली कर्तव्यकर्मे उत्कृष्टपणे पार पाडीत असतात. 'न्याय' हा सद्‌गुण व्यक्तिच्या विविध पैलुंमध्ये समरसता निर्माण करतो, तसाच सामाजिक वर्गांमध्येही एकात्मता निर्माण करतो.

**आपली प्रगती तपासून पहा**

प्रश्नः १) सद्‌गुण म्हणजे काय ?

२) 'कार्डिनल' या शब्दाचे महत्त्व काय आहे ?

३) प्लेटोप्रणित चार प्रधान सद्‌गुण कोणते ?

४) राज्यातील लोकपालाचा सद्‌गुण कोणता ?

५) प्लेटोच्या मते मानवी व्यक्तित्वाचे तीन घटक कोणते ?

## ३.५ ॲरिस्टॉटलची सद्‌गुणांविषयक संकल्पना

ग्रीक तत्त्वज्ञ ॲरिस्टॉटल हा प्लेटोचा शिष्य असला तरी तो फार थोर, प्रतिभावान तत्त्वज्ञ होता. नीतीशास्त्रावर पुस्तक लिहिणारा तो पहिला पाश्चात्य विचारवंत होय. ज्ञान, शौर्य, धैर्य व चिकाटी हे मानवी गुण आहेत. परंतु केवळ असे गुण माणसाचे नैतिक चारित्र्य घडवित नाहीत. त्यांचे नैतिक महत्त्व त्यांच्याशी संबंधित असलेल्या प्रयोजनांवर, मूल्यांवर वा हेतूवर अवलंबून असते. म्हणूनच ॲरिस्टॉटलने नैतिक सद्‌गुण व बौद्धिक सद्‌गुण यांच्यात फरक केलेला आहे. एखादा विद्वान नैतिकदृष्ट्या श्रेष्ठ असेलच असे सांगता येत नाही. ॲरिस्टॉटलने सुवर्णमध्याची कल्पना मांडलेली आहे. ती आपण पुढे पाहू. तसेच ॲरिस्टॉटलने न्यायाच्या संकल्पनेचा अर्थ अधिक स्पष्टपणे व विस्तृतपणे मांडला आहे. पहिली गोष्ट म्हणजे त्याने न्यायाला सर्वश्रेष्ठ सद्‌गुण म्हणून प्राधान्य दिले. न्यायाचे दोन प्रकार आहेत.

१) वितरणात्मक न्यायः संपत्ती व हुद्दे वा मानसन्मान यांचे नागरिकांमध्ये त्यांच्या योग्यतेनुसार वितरण.

२) परिमार्जनात्मक वा निवारणात्मक न्यायः व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समाज यांच्यामधील व्यवहारात अन्याय होता कामा नये व अन्याय झाल्यास त्याचे परिमार्जन केले पाहिजे, अन्याय दूर केला गेला पाहिजे व न्याय मिळवून दिले पाहिजे. विचार करणे व स्वतःच्या इच्छा, वासनांवर नियंत्रण ठेवणे हे माणसाचे वैशिष्ट्य होय. सत्कर्मे करता करता चांगली कर्मे करण्याची सवय लागते. या चांगल्या सवयीतूनच सद्‌गुण विकसित होतात.

ॲरिस्टॉटलने 'अति सर्वत्र वर्जयेत' हा नियम स्वीकारलेला आहे. एखाद्या गुणाचा संपूर्ण अभाव व त्या गुणाचा अतिरेक ही दोन टोके दुर्गुण दर्शवितात. उदा. भोगांचा अतिरेक व भोगांचा अतिरेकी त्याग ही दोन टोके आहेत. त्यांतला मध्य आहे संयमित उपभोग. हा आत्मसंयम नावाचा सद्‌गुण होय. भित्रेपणा व अतिरेकी उतावळेपणा टाकून धैर्य हा सद्‌गुण विकसित केला पाहिजे. कंद्रुपणा (कंजुषपणा) व उधळपट्टी हे दुर्गुण आहेत. परंतु या संदर्भात औदार्य हा सद्‌गुण होय. हा मध्यबिंदू शोधणे हे कठीण काम आहे. म्हणून विवेकनिष्ठेची वा बुद्धिनिष्ठेची आवश्यकता आहे.

सहकिअन या नीतीशास्त्रज्ञाने ॲरिस्टॉटलच्या नैतिक चिंतनाचे सार खालील विधानात स्पष्ट केलेले आहे. नैतिक दृष्ट्या योग्य बाब योग्य माणसाच्या संदर्भात योग्य प्रमाणात, योग्यवेळी, योग्य हेतूने केली पाहिजे. उदा. औदार्य योग्य व्यक्तीला उदारपणे, योग्यवेळी, योग्य प्रमाणात, चांगल्या हेतूने वित्त वा पैसे दिले पाहिजेत.

म्हणून माणसाला योग्य नैतिक वर्तन ठरविण्यासाठी वेळोवेळी बुद्धीचा उपयोग करावा लागतो. तसे करण्याची सवय लावून घेतली पाहिजे. म्हणून ॲरिस्टॉटल म्हणतो, 'सद्‌गुण हा सवयीचा परिपाक आहे.' योग्य कर्मांची निवड करून अशी कर्मे प्रयत्नपूर्वक व सातत्याने केली पाहिजेत. दोन दुर्गुणांमधील मध्य शोधणे कठीण काम आहे. ते गणितीपद्धतीने शोधता येत नाही. व्यावहारिक शहाणपण वा विवेक ते शोधण्यास उपयोगी ठरते. त्यासाठी वेगवेगळ्या व बदलत्या परिस्थितींचा अभ्यास करावा लागतो. त्यातील साम्य/भेद हे लक्षात घ्यावे लागतात. अशा सद्‌गुणांची निश्चिती करून, त्यांचे स्वरुप निर्धारित करुन ते आत्मसात केले पाहिजेत. असे सद्‌गुणयुक्त सदाचारी जीवन हे समाधानी, सुखी जीवन होय.

**आपली प्रगती तपासून पहा**

प्रश्नः १) ॲरिस्टॉटलने कोणते दोन प्रमुख सद्‌गुण सांगितले ?

२) ॲरिस्टॉटलने न्यायाचे कोणते प्रकार स्पष्ट केले ?

२) ॲरिस्टॉटल 'सद्‌गुण हा सवयीचा परिपाक आहे' असे का म्हणतो ?

## ३.६ सारांश

नैतिकदृष्ट्या शुभजीवनासाठी सद्‌गुण-संवर्धनाची अत्यंत आवश्यकता असते. सद्‌गुण विकसित केल्यास माणसाकडून नैतिकदृष्ट्या योग्य वर्तन केले जाते. बुद्धि व अनुभव यांची महत्त्वाची भूमिका नैतिक जीवनात आढळून येते. सद्‌गुणांच्या एकात्मतेतूनच चारित्र्य घडते. असा चारित्र्यसंपन्न माणूस वा शीलवान माणूस नैतिकदृष्ट्या चांगलेच वर्तन करतो. या संदर्भातील अत्यंत महत्त्वांची बाब म्हणजे ॲरिस्टॉटलने ज्ञानाबरोबर सवयीला अधिक महत्त्व दिले. केवळ पुस्तकी वा शाब्दिक ज्ञान असून चालत नाही. त्याचा विनियोग करून चांगले वर्तन निर्धारित करणे व तसे वागण्याचा प्रयत्न करणे महत्त्वाचे होय. म्हणूनच ॲरिस्टॉटल बौद्धिक सद्‌गुण व नैतिक सद्‌गुण असे सद्‌गुणांचे वर्गीकरण करतो.

कुठल्याही धर्मपंथाचा वा धर्मग्रंथाचा आधार न घेता नीतीशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथ लिहिणारा ॲरिस्टॉटल हा पाश्चात्य जगातील पहिला तत्त्वज्ञ होय.

## ३.६ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

१) सॉक्रेटिसची सद्‌गुण विषयक संकल्पना स्पष्ट करा.

२) सॉक्रेटिस सद्‌गुण म्हणजे सवय असे का म्हणतो ? सविस्तर स्पष्ट करा.

३) राज्यातील लोकपालांचा सद्‌गुण कोणता ? त्याचे विवेचन करा.

४) श्रमजीवी वर्गाचा महत्त्वाचा सद्‌गुण सांगून त्याचे विवरण करा.

५) 'सद्‌गुणयुक्त जीवन हे चांगले जीवन होय'. चर्चा करा.

६) ॲरिस्टाटलप्रणित शुभजीवनाची संकल्पना स्पष्ट करा.

७) ॲरिस्टॉटल म्हणतो, 'सद्‌गुण हा सवयीचा भाग आहे'. चर्चा करा.

८) ॲरिस्टॉटलचे नैतिक चिंतन थोडक्यात विशद करा.

९) प्लेटोप्रणित चार मौलिक सद्‌गुण या विषयावर विस्तृत टीप लिहा.

१०)टिपा लिहा.

अ) सद्‌गुणांचे स्वरुप

ब) सॉक्रेटिस : सद्‌गुण म्हणजे सवय

क) प्लेटोप्रणित चार प्रधान सद्‌गुण.

ड)ॲरिस्टॉटलचे नैतिक चिंतन.

इ) ॲरिस्टाटलप्रणित न्याय एक सद्‌गुण.

फ) ॲरिस्टॉटलचे चरित्रविषयक नीतिशास्त्र.

ग) प्लेटोची सद्‌गुणविषयक संकल्पना.

❖❖❖❖

# घटक -४

# आम्ही मुक्त आहोत का? स्वातंत्र्य आणि नियतत्ववाद

# (ARE WE FREE? FREEDOM AND DETERMINISM)

**घटक रचना**

४.० उद्दिष्ट्ये
४.१ प्रस्तावना
४.२ नियतिवाद
४.३ अनियतिवाद
४.४ आत्म-नियतिवाद
४.५ संकल्पाचे स्वातंत्र्य
४.६ सारांश
४.७ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

## ४.० उद्दिष्ट्ये

१) नियतिवादाचे स्वरूप लक्षात घेता येईल.
२) अनियतिवाद म्हणजे काय ते समजून घेता येईल.
३) आत्म-नियतिवादाचे स्वरूप लक्षात जाणून घेता येईल.
४) संकल्पाचे स्वातंत्र्य म्हणजे काय ते जाणून घेता येईल.

## ४.१ प्रस्तावना

कृतीबद्दल तिच्या कर्त्यास आपण जबाबदार धरतो, तिचे दायित्व त्याच्याकडे आहे असे मानतो. त्यामुळेच चांगली अथवा युक्त कृती केली असेल तर कर्त्याची प्रशंसा करतो, अयुक्त अथवा वाईट कृती केली तर कर्त्याची निंदा करतो किंवा क्वचित त्याला शिक्षाही करतो. पण जी कृती त्याने केली त्याहून अन्य कृती होणे शक्यच नसेल, म्हणजे ती कृती पूर्वनियत असेल तर दायित्व अथवा जबाबदारी ही गोष्ट संपून जाते. इतिहासक्रमात अमुक व्यक्तीकडून अमक्या वेळी अमूक एकच कृती घडणे शक्य असेल तर निंदा प्रशस्तीला अर्थ उरत नाही. कारण व्यक्तीला तिच्या कृतीबद्दल जबाबदार धरुनच तिच्या चांगल्या कृतीबद्दल आपण स्तुती करतो व वाईट कृतीबद्दल तिला दोष देतो. पण व्यक्ती कृती करण्यास स्वतंत्र असेल तरच तिला जबाबदार धरता येईल.

मनुष्याला स्वकर्माबद्दल जबाबदार धरावे की नाही या प्रश्नाचा विचार करण्यासाठी मनुष्य कर्म करीत असताना स्वतंत्र असतो की बाह्य परिस्थितीने बद्ध वा नियत असतो. या प्रश्नाचा विचार करणे अपरिहार्य ठरते. या प्रश्नाचे उत्तर तीन वादांनी तीन प्रकारे दिलेले आहे. नियतिवाद अनियतिवाद व आत्म नियतिवाद हे ते तीन वाद होत.

## ४.२ नियतिवाद (DETERMINISM)

या वादानुसार संकल्पाचे स्वातंत्र्य सर्वथा अमान्य करण्यात येते. नियतिवाद म्हणतो आत्मा व हेतू किंवा इच्छा यांचा संबंध बाह्य स्वरूपाचा आहे. आंतरिक स्वरूपाचा नाही या वादाप्रमाणे मानवी संकल्प ही एक नियत घटना आहे. या मताच्या पुष्ट्यर्थ पुढीलप्रमाणे युक्तिवाद केले जातात.

१) मानवी इच्छा अथवा संकल्प ही सृष्टीतील एक घटना आहे. कोणत्याही घटनेचे कारण हे असणारच. एखादी घटना केव्हा, कोठे आणि नेमकी कधी घडवायची हे सर्वस्वी तिच्या कारणाने निघत होते. अमुक एक कृती करावी की न करावी याविषयी माझ्या बुद्धीचा निश्चय कृतीनिश्चय म्हणजे संकल्प काय होईल हे पूर्वीच ठरुन गेलेले असणार. याचा अर्थ मला संकल्पाचे स्वातंत्र्य नाही असा होतो.

२) मनुष्य हा विचार करुन आचरण करणारा प्राणी आहे. आचरणाची निवड करताना तो स्वतःच्या प्रेरणा विचारात घेईल. सर्वात बलवान असलेल्या प्रेरणेला अनुसरुनच तो कृतीची निवड करेल. त्या माणसाचा जो काही स्वभाव असेल त्यामुळे विशिष्ट परिस्थितीत कोणती तरी एक प्रेरणा सर्वात बलवान ठरेल व प्रेरणेला अनुसरुनच तो कृती विषयीचा निर्णय ठरवेल. याचा अर्थ असा होतो की भविष्यातील कोणत्याही क्षणी प्रत्येक व्यक्तीचा संकल्प नियत असतो. अशा रीतीने संकल्प नियत ठरल्यावर त्याचे स्वातंत्र्य उरले कोठे?

आत्म बाह्य अशा हेतुनुसार निर्णय घेतला जातो व तो निर्णय आत्म्याला बंधनकारक ठरतो. म्हणजे आत्मा हा बाह्य परिस्थिती द्वारा वर्तणारा आहे, नियत असा आहे. असे हा वाद प्रतिपादन करतो म्हणून या वादाला नियतिवाद असे म्हणतात. नियतिवाद स्वतःच्या मताचे समर्थन करण्याकरिता तीन आधार देतो.

### १) मानसशास्त्रीय आधार :

मानसशास्त्रीय दृष्ट्या विचार केल्यास आपले संकल्प हे हेतू किंवा इच्छा यांच्या द्वारा निश्चित होत असतात. सरळ किंवा साध्या कृतीमध्ये हेतू एकच असतो. हा हेतू संकल्प व तत्संबंधी अशी कृती दोन्ही निश्चित करतो, नियत करतो. परंतु अनेक हे हेतुंचा संघर्ष निमार्ण झाला असता त्या सर्व हेतू मध्ये जो अधिक बलवत्तर असेल तो इतर हेतुंचे दमन करुन स्वतः विजय होतो. या विजयी झालेल्या हेतू नुसार संकल्प अस्तित्वात येतो. कोणता हेतू विजय होतो? कोणता हेतू बलवत्तर असतो? हेतुची शक्ती निश्चित करण्याचे गमक कोणते? नियतिवाद म्हणतो, हेतूंनी शक्ती काही अंशी बाह्य परिस्थितीवर अवलंबून आहे तर काही अंशी आनुवंशिक स्वभावावर अवलंबून नाही आणि अनुवंशिक स्वभाव शेवटी अंशतः गतकालीन वंशजांच्या जन्मजात प्रवृत्तींवर व अंशतः शरीर व मेंदू यांच्या रचनेवर अवलंबून आहे, याप्रमाणे आपले संकल्प कारण किंवा पूर्ववर्ती घटकांकडून पूर्णतः बंद आहेत, नियत आहेत. जर

आपल्याला संकल्पाच्या सर्व पूर्ववर्ती घटनांचे पूर्ण ज्ञान असले, तत्संबंधीत कृतींची ओळख असती तर मानवाकडून घडणाऱ्या भावी घटनांचे अचूक भविष्यकथन करणे अशक्य नाही.

## २) वैज्ञानिक आधार - कार्य करण्याचा नियम :

जर संकल्प पूर्ववर्ती घटनाकडून नियत नाहीत असे मानले तर तथाकथित संकल्पही कारण विरहित घटना ठरेल. परंतु ही गोष्ट अशक्य आहे. कारण कार्य कारणाच्या नियमानुसार मानसिक असो की नैसर्गिक असो प्रत्येक घटनेला कारण असलेच पाहिजे, मनात म्हणा अगर निसर्गात म्हणा कारण विरहित घटना असूच शकत नाही, याचा अर्थ असा की संकल्पाला कारण नाही, संकल्प कारणाने पूर्ववर्ती घटनेने बद्ध नाही हे म्हणजे कार्यकारणाच्या नियमासारख्या विचार शास्त्राच्या मूलभूत आधार तत्त्वाचा विरोध करणे होय.

## शक्तीच्या अविनाशतेचा नियम :

संकल्प स्वातंत्र्य याचा अर्थ असा की, संकल्प करते समयी आत्म्याकडून मेंदूमध्ये शक्तीची निर्मिती घडून येत असते व या नवीन निर्माण झालेल्या शक्तीद्वारा बाह्य परिस्थितीत बदल घडून येत असतो. अशाप्रमाणे आपण विश्वात उपस्थित असलेल्या शक्तीच्या मात्रेत नवीन शक्तीची भर घालीत असतो. परंतु संकल्पशक्तीच्या नवनिर्माण क्षमतेला म्हणजे स्वातंत्र्याला मान्यता दिल्यास विश्वात उपस्थित असलेली शक्ती कधीही कमी होत नाही व कधीही जास्त होत नाही. तिची मात्रा, तिचे परिणाम नेहमी एकच असते या शास्त्रीय जगाच्या आधारतत्वाला जबरदस्त धक्का बसतो.

## जडद्रव्यवाद :

द्रव्य व शक्ती यांचे अणू आगंतूकपणे किंवा आकस्मितपणे एकत्र येतात, एका ठिकाणी जुळतात व त्या आकस्मित संयोजनातून मूर्त जग अस्तित्वात येते, त्या अणूमध्ये आवश्यक वा नियत स्वरूपाचा संबंध नसून आंतरिक संबंध नसून, पूर्णतः बाह्य संबंध असतो. या वादानुसार मन किंवा आत्मा ही सुद्धा नैसर्गिक घटना असून इतर घटनांप्रमाणे या घटना सुद्धा स्वतः स्वतंत्रपणे कारणरूप असू शकत नाहीत व त्यांच्यात स्वतंत्रपणे संकल्प निर्माण करण्याची पात्रता येत नाही.

## ३) धार्मिक आधार :

या मूर्त विश्वाचे सर्वांना आधारभूत असे एक तत्त्व आहे, त्यालाच ईश्वर असे म्हणतात. ईश्वर स्वतः पूर्ण असल्यामुळे विश्व निर्मिती करीत असताना त्याला कोणत्या वस्तू उत्पन्न होणार आहेत, कोणते संकल्प जन्माला येणार आहेत याचे संपूर्ण ज्ञान असतेच असे नाही तर त्याच्या सर्वज्ञत्वालाच बाधा येईल. अशाप्रकारे मनात निर्माण होणाऱ्या संकल्पनांचे पूर्वज्ञान ईश्वराला आहे तर मग मन किंवा आत्मा स्वतंत्रपणे संकल्प करीत असतात म्हणजे कसे मान्य करता येईल? असे मान्य केल्यास ईश्वराचे स्वातंत्र्य नष्ट होते व ईश्वराचे स्वातंत्र्य मान्य केल्यास संकल्पाचे स्वातंत्र्य निरर्थक ठरते.

## परीक्षण :

संकल्पाचे मानसशास्त्रीय विश्लेषण हेच मुळात चुकीचे आहे. नियतिवाद म्हणतो, त्याप्रमाणे संकल्प हा हेतू नव्हे हेतूच्या शक्तीवर अवलंबून असतो हे आपण मान्य करतो. परंतु पुढे जाऊन नियतिवाद जेव्हा आत्मा व हेतू यांचा काही संबंध नाही, हेतू पूर्णता बाह्य स्वरूपाचा

आहे असे प्रतिपादू लागतो तेव्हा त्याचे प्रतिपादन मानसशास्त्रीयदृष्ट्या चूक वाटू लागते. कारण बलवान हेतू म्हणून जो संबोधला जातो तो त्या अनेक हेतू पैकी कोणताही हेतू नसून फक्त तोच हेतू असतो ज्याची आत्म्याने निवड केलेली असते, ज्याच्याशी आत्मा तादात्म्य पावलेला असतो त्याच्यामध्ये आत्म्याला स्वतःचा अधिकाधिक आदर्शवत अविष्कार घडवून आलेला दिसतो. तात्पर्य निर्णय प्रसंगी हेतू व आत्मा यांचा बाह्य स्वरूपाचा संबंध नसून आंतरिक नव्हे एकरुपतेच्या संबंध असतो.

दुसरी गोष्ट अशी की कार्यकारणाचा नियम सुद्धा नियतिवाद म्हणतात त्याप्रमाणे संकल्पाच्या स्वातंत्र्याशी विसंगत नाही. संकल्प ही एक कारणविरहित घटना आहे ही नियतिवाद कल्पनाच मुळात चूक आहे. वास्तविक संकल्पनासुद्धा कारण आहेच. परंतु ते कारण नियतिवाद समजतो तसे नसून आंतरिक आहे, नव्हे स्वतः आत्माच आहे. आत्मा स्वतःच्या संकल्पाला घडवीत असतो.

तसेच नियतवादाची भविष्य कथन करण्याची कल्पना सुद्धा तितकीच सदोष ठरते. ते म्हणतात की संकल्पाचे कारण ठरलेल्या आवश्यक पूर्ववर्ती घटना जर कळल्या तर मानवाकडून भावी काळात कोणत्या कृती घडतील हे अचूकपणे सांगता येते आणि अशाप्रकारे जर संकल्पाचे व तत्संबंधी कृतीचे भविष्यकथन करणे जर अशक्य ठरत असेल तर मग संकल्पाचे स्वातंत्र्य राहिले कुठे ? परंतु कृतीचे किंवा स्वतः संकल्पाचे भविष्यकथन केल्याने संकल्पाच्या स्वातंत्र्याला बाधा येते हे ही म्हणणे वरील म्हणण्याइतके चूक आहे. संकल्पाला विशिष्टप्रकारे निर्णय घेण्याची एकदा सवय झाली की संकल्पाच्या सवयीला सील म्हणतात. एकदा असे सवयरूप म्हणजे स्थिर स्वरूपाचे कायम स्वरूपाचे शील आकारास आले म्हणजे त्यानंतरचे संकल्प हे व या शीलाचे परिणाम वा कार्य असतात. त्यामुळे या शिलाच्या स्वूरुपावरुन पुढील संकल्पाचे तसेच संबंधित कृतीचे भविष्यकथन सहज करता येते. परंतु त्यामुळे संकल्पाचे स्वातंत्र्य मुळीच धोक्यात येत नाही.

संकल्पाचे स्वातंत्र्य मान्य केल्यास शक्तीच्या अभिनाशतेच्या नियमाला विरोध येतो असे नियतिवाद म्हणतो ते बरोबर आहे काय? संकल्पाचे स्वातंत्र्य मान्य करुनही शक्तीच्या अविनाशतेचा नियम किंचितही बाधित होत नाही. नाश पावणे म्हणजे मूर्त शक्तीचे अमूर्त शक्तीमध्ये रूपांतर होणे होय व निर्मान होणे म्हणजे अमूर्त शक्तीचे मूर्त शक्तीमध्ये रूपांतर होणे होय. असे या नियमाचे स्वरूप आहे. आता मन किंवा आत्मा जेव्हा स्वतंत्रपणे नवीन संकल्पना जन्म देतो व त्यावेळी मेंदूमध्ये नवीन शक्ती निर्माण करतो तेव्हा तो वास्तविक दुसरे-तिसरे काहीही करीत नसून अमूर्त शक्तीचे मूर्त शक्तीमध्ये रूपांतरित रुपांतर करीत असतो व या अर्थाने नियतिवादाच खोटा ठरतो.

नियतिवादाचे शेवटचे प्रतिपादन असे की, ईश्वराच्या पूर्वज्ञानाचे संकल्पाचे स्वातंत्र्य बाधित होते. परंतु पूर्वज्ञान व पूर्वसंकल्प या दोन्ही कल्पना भिन्न आहेत. एखादी गोष्ट आपल्याला पूर्वीच माहीत असली म्हणून तिचा संकल्पही आपणच स्वतः केला असे म्हणता येत नाही. म्हणजे पूर्वज्ञान असून सुद्धा पूर्वसंकल्प शक्य ठरतो. समजा संकल्पाचे स्वातंत्र्य या ईश्वराच्या पूर्व ज्ञानामुळे बाधित होते. सिद्ध होत नाही. म्हणजे आत्म्याला वा मनाला संकल्पाचे स्वातंत्र्य नाही असे सिद्ध होते. तर त्यामुळे स्वकर्माबद्दल आज जी जबाबदारी वा उत्तरदायित्व येते ती मानवावर

येऊ शकत नाही. मग मानवाकडून घडणाऱ्या कृतीच्या बरेवाईट पणाबद्दल मानवाला जबाबदार न धरता ईश्वराला जबाबदार धरावे लागेल.

**आपली प्रगती तपासून पहा :**

१) अनियतिवाद सविस्तरपणे स्पष्ट करा.
२) नियतीवादातील वैज्ञानिक आधार स्पष्ट करा.
३) नियतीवादातील मानसशास्त्रीय आधार स्पष्ट करा.
४) नियतीवादातील धार्मिक आधार स्पष्ट करा.

## ४.३ अनियतिवाद (INDETERMINISM) :

या वादानुसार आत्मा कोणतेही कारण, कोणताही हेतू किंवा कोणतेही तत्त्व विचारात घेऊन संकल्पना जन्म देत नाही. संकल्प किंवा निर्णय घेते प्रसंगी तो पूर्णतः स्वतंत्र असतो. त्या निर्णय प्रसंगी शील सुद्धा गौण ठरते. म्हणजे संकल्प व तत्संबंधित कृती याचा शीलाशी सुद्धा काहीही संबंध नसतो. याचा अर्थ असा की संकल्प हा कारण व हेतू एवढेच नव्हे तर शील यांच्याकडून नियत होत नाही; तर अ-नियत असतो. म्हणून या वादाला अनियतिवाद असे म्हणतात.

हा वाद म्हणतो मानव म्हणून संबोधल्या गेलेल्या प्राण्यांमध्ये निरपेक्षतेचा स्वतंत्र संकल्प वसत असतो. त्या स्वतंत्र संकल्पाचे निरपेक्षता हे व्यावर्तक लक्षण आहे. त्यामुळे प्रत्यक्ष कृती करते समयी या संकल्पसमोर जे अनेक विकल्प असतात, त्यापैकी कोणत्यातरी एका विकल्पाची हा संकल्प कोणत्याही हेतूला वा इच्छेला विचारात न घेता म्हणजे पूर्णतः हे हेतू निरपेक्ष व इच्छानिरपेक्ष अशी निवड करतो. याचा अर्थ असा की वरील प्रकारची निवड करते समयी भूतकालीन परिस्थिती विचारात घेतली जात नाही ही निवड पूर्णतः स्वतंत्रपणे करण्यात येत असते. स्वःसमर्थनार्थ हा वाद दोन मुद्दे पुढे करतो.

१) जेव्हा आपण जबरदस्तीने नव्हे स्वयंस्फूर्त अशा स्वतंत्र निवडीद्वारा काहीतरी करतो तेव्हा आपल्याला नेहमीच मनात असे वाटते की, आपण या सारखेच सध्या केलेल्या कृतीच्या अगदी उलट दिशेने वागू शकलो असतो.
२) आपल्या प्रत्यक्ष अनुभवाची गोष्ट आहे की, मोहाच्या परिणामांना म्हणजे प्रभावांना दाबताना आपण अशा प्रकारचे मोहालासुद्धा दाखवू शकतो नव्हे दाबतो आणि म्हणून आपला संकल्प आपल्या हेतूचा किंवा शीलाच्या निर्णयाशी परावलंबित्वाच्या नात्याने संबंधित नसून निरपेक्षतेच्या या नात्याने संबंधित असतो.

तात्पर्य, संकल्पाचा निर्णय हेतुच्या व शीलाच्या प्रभावाने परिणामित होत नसून पूर्णता निरपेक्षपणे अस्तित्वात येतो, यालाच संकल्पाचे स्वातंत्र्य असे म्हणतात. जर अशा प्रकारचे संकल्पाचे स्वातंत्र्य मान्य केले नाही तर नीतिशास्त्राचे हा प्रश्नच उद्भवत नाही.

**परीक्षण :**

समर्थन म्हणून पुढे केलेल्या पहिल्या मुद्यात अनियतिवाद म्हणतो की मला वाटले तर मी उलट दिशेने सुद्धा वागू शकलो असतो असा आपला अनुभव आहे व या अनुभवावरुन संकल्पाचे स्वातंत्र्य आपोआपच सिद्ध होते. परंतु या मुद्याचे खंडण करीत असताना A.E. Taylor म्हणतो. ‘मला असे वाटणे हा पूर्वी एक तर मी दुसऱ्याच प्रकारचा मनुष्य बनलो पाहिजे व जर मी आज आहे असाच बुद्धिनिष्ठ मनुष्य असलो तर मला असे वाटू शकत नाही.’

अनियतिवादाचा दुसरा मुद्दा असा आहे की, अधिकाधिक दमनाच्या दिशेने आपण वागु शकतो व वागतो आणि म्हणून आपला संकल्प हेतूनिरपेक्ष किंवा शीलनिरपेक्ष असा म्हणजेच स्वतंत्रपणे निर्णय घेणारा आहे. परंतु हे ही त्याचे समर्थन तितकेच चुकीचे आहे. मनुष्य हा बुद्धिनिष्ठ, बुद्धिप्रधान जीव असल्यामुळे त्याच्या शीलानुसार त्याच्या ध्यायाची कल्पना त्याच्यासमोर असते. हेतू किंवा इच्छा इत्यादी आपण जे काही म्हणतो ते सर्व त्याच्या शीलाचे आविष्कृत झालेले पर्याय आहेत. शील या सर्व संकल्पाचे व हेतूचे अधिष्ठान आहे. अनियतिवाद म्हणतात की, आपण जास्तीत जास्त दमनाचा सुद्धा मार्ग करु शकतो व स्वीकारतोही. परंतु अनियतीवाद्यांनी एक गोष्ट पक्की लक्षात ठेवावी की, दमनाचा मार्ग कोणताही मानवी जीव अवलंबून शकत नाही किंवा अवलंबित नाही, तर त्या जीवांचे शील तितकेच मजबूत व कायम स्वरूपाचे आहे. अशा कडूनच वरील प्रकारच्या दमनाच्या दिशेने पाऊल टाकण्याचे शक्य आहे. याचा अर्थ असा की शीलाच्या स्वरूपावरुनच दमनाचा मार्ग स्वीकारणे किंवा न स्वीकारणे निश्चित होत असते.

तात्पर्य आत्मा स्वतंत्र आहे याचा अर्थ असा की त्याचे संकल्प त्याच्या अंतिम ध्येयानुसार निश्चित होत असतात व त्याचे अंतिम ध्येय त्याचीच पूर्णावस्था, त्याचेच कल्याण हे आहे. म्हणून त्याचे संकल्प परनियत नाहीत, अनियत नाहीत तर आत्मनियत आहेत.

**आपली प्रगती तपासून पहा :**

१) अनियतिवाद सविस्तरपणे स्पष्ट करा.

## ४.४ आत्म-नियतिवाद (SELF DETERMINISM) :

हा वाद दोन्ही वादांचे समन्वयात्मक स्वरुप होय. नियतिवादाप्रमाणे ‘आत्मा नियत आहे’ हे ही विधान या वादाला मान्य आहे. त्याचप्रमाणे अनियतिवादा प्रमाणे ‘आत्मा बाह्यसत्तेद्वारा नियत नाही’ हे ही विधान या वादाला मान्य आहे. म्हणून दोन्ही वादातील सत्यांश स्वीकारुन ‘आत्मा-आत्म-नियत आहे’ हे तिसरे रुप धारण करुन आत्म-नियतिवाद प्रस्थापित करण्यात आला.

हा वाद म्हणतो संकल्पाची सवय म्हणजे शील. या शीलालाच प्रकृतीसुद्धा म्हणतात. या शीला प्रमाणे आचार घडत असतो. अशा प्रकारे प्रकृती व आचार यांचा कार्यकारण संबंध आहे. म्हणूनच आचारावरुन प्रकृतीचा अंदाज होतो. मग आत्मा हा प्रकृतीतंत्र ठरत नाही काय? अशी शंका निर्माण होणे साहजिक आहे. पण ही शंका आत्म-नियतिवादाबाबत घेणे संयुक्तीक ठरत नाही. प्रकृती किंवा शील म्हणजे दुसरे तिसरे काही नसून आत्म्याचे देशकाल परिस्थितीसापेक्ष असे विशिष्ट रूप होय. शीलाद्वारा आत्माच व्यक्त होत असतो. म्हणून शील व आत्मा यांच्यामध्ये बाह्य संबंध नसून आंतरिक संबंध आहेत. नव्हे दोन्ही एकरूप आहेत असेच मानावे लागते. सामान्यतः आपला आचार शील किंवा प्रकृतीप्रमाणेच घडत असतो. तरीही आत्मा हा प्रकृति पेक्षा श्रेष्ठ आहे हे विसरता येणार नाही. स्वतःचे शील किंवा प्रकृती बरोबर नाही ती सुधारली पाहिजे असे जर आत्म्याला वाटले तर तसा इष्ट बदल करण्याचे स्वातंत्र्य आत्म्याला आहे. अर्थात असा बदल घडवून आणणे प्रवाहाच्या पाण्यातून विरुद्ध दिशेला जाण्याइतके अवघड आहे, पण अशक्य नाही. प्रसंग पडल्यास आत्मा इष्ट बदल घडवून आणू शकतो. त्याच्यामध्ये स्वनिर्णयाची शक्ती आहे. स्वतःचा अचार कसा असावा हे ठरविण्याकरिता तो पूर्णतः स्वतंत्र आहे. फक्त सर्वसामान्य जीवनात प्रकृतीप्रमाणे वागतो एवढेच. म्हणून तो प्रकृतीतंत्र आहे असे म्हणता येत नाही. हा वाद म्हणतो आत्म परतंत्र नाही, आत्म अतंत्र नाही, तो आत्म तंत्र आहे. म्हणून या वादाला आत्म-नियतिवाद असे म्हणतात.

**आपली प्रगती तपासून पहा :**

१) आत्म-नियतिवाद सविस्तरपणे स्पष्ट करा.

## ४.५ संकल्पाचे स्वातंत्र्य

आपले संकल्प आपल्या शीलाकडून नियत आहेत व आपल्या कृती ज्यांना आपण संकल्पित कृती म्हणतो - संकल्पातून जन्माला येतात. कृतीपूर्व काळात संकल्पासमोर अनेक विकल्प असतात, प्रत्येक विकल्प विशिष्ट दृष्टिकोनाचे प्रतिनिधित्व करीत असतो. मात्र या विकल्पापैकी कोणत्या विकल्पाचा स्वीकार करावा वा निषेध करावा असा निर्णय घेणे त्या

विकल्पावर अवलंबून नसते. त्या विकल्पाचा आपला संकल्प साधकबाधक विचार करायला स्वतंत्र असतो. या क्षणी बाह्य परिस्थिती किंवा बाह्य स्वरुपाचे कोणतेही बंधन त्याच्यावर नसते. अशावेळी तो संकल्प आपल्यासमोर असलेल्या अंतिम ध्येयाच्या कल्पनेनुसार एकाचा स्वीकार करतो व त्या स्वीकृत विकल्पानुसार कृती घडते व म्हणूनच त्या कृतीला संकल्पित कृती किंवा कर्म किंवा आचार असे म्हणतात.

अशाप्रकारे विकल्पाचा स्वीकार करताना संकल्प स्वातंत्र्य असल्यामुळे आपण आपल्या कृतीबद्दल जबाबदार आहोत, उत्तरदायी आहोत. जर आपला संकल्प निर्णय घेते समयी बाह्य सत्तेकडून नियत असता तर त्या बद्धकतेमुळे आपल्याला आपल्या कृतीबद्दल जबाबदार धरणे व म्हणून त्या कृतीवर निर्णय देणे चूक ठरले असते आणि अशा प्रकारचा निर्णय जेथे नाही तिथे नीतिशास्त्राचे प्रयोजनच उरत नाही. म्हणून संकल्पाचे स्वातंत्र्य हे नीतिशास्त्राचे पहिले व पंतप्रधान आधारतत्त्व आहे.

माझ्या संकल्पाचे कारण मी हेच असेल तर ते खरेखुरे आत्म स्वातंत्र्य होय. या ठिकाणी मी म्हणजे कोण ? हा प्रश्न निर्माण होतो.

समजा उद्यापासून पहाटे पाच वाजता उठून मोकळ्या हवेत फिरावयास जावे असे पूर्ण विचारांनी मी ठरवले. झोपताना घड्याळाला गजर लावला. गजर ऐकून सकाळी जाग आल्यावर मी जर स्वत:शीच म्हटले की आज अनपेक्षितपणे थंडी जरा अधिकच आहे. म्हणून पहाटे उठण्याचा कार्यक्रम उद्यापासून सुरु करावा. तर हा दुसरा निर्णयही माझाच आहे. हे दोन्ही मी एकच आहेत काय? मी माझ्या संकल्पाचे कारण असणे म्हणजे आत्मस्वातंत्र्य असा अर्थ केल्यावर मी म्हणजे कोण याचा काही अर्थ करणे प्राप्त होते. मी म्हणजे माझा स्वभाव हे तर खरेच. पण कोणता भाव म्हणजे स्वभाव? माझ्या व्यक्तित्वात विवेक आहे आणि विकारही आहेत. द्वेष, क्रोध, मोह इत्यादी विकार हे संकल्पाचे कारण असतील तर तो संकल्प स्वतंत्र नव्हे विकार म्हणजे मी चे खरे स्वरूप नव्हे. म्हणून मी क्रोधाच्या आहारी गेलो, मी मोहाच्या आधीन गेलो, असे शब्द प्रयोग होतात. कारण विवेक हेच मी चे खरे स्वरूप होय. अंथरुणाच्या उबेचा मोह पडून पहाटे उठू नये ही माझी इच्छा मोहातून निर्माण होते. पहाटे उठावे या संकल्पाला विवेकाचे जे पाठवले होते ते तिला नाही. तेव्हा संकल्प स्वातंत्र अथवा आत्मनियतत्व याचा अर्थ विवेकाकडून झालेले नियतत्व असा होतो.

माणसास संकल्प स्वातंत्र्य आहे असे म्हटल्यास ते नेहमीच असले पाहिजे; कधी असते आणि कधी नसते असे म्हटल्यास त्यास स्वाधीनता नाही या अडचणी उत्तर असे की, कोणत्याही वेळी विवेकयुक्त आचरण करणे माणसास शक्य असते. म्हणजेच संकल्प स्वातंत्र्य उपभोगण्याचे स्वातंत्र्य त्यास सदैव असते. 'विवेकयुक्त कृतीत स्वातंत्र्य असते' असे म्हणताना स्वातंत्र्य याचा जो अर्थ आहे त्याच्यापेक्षा मागील वाक्यातील स्वातंत्र्य याचा अर्थ वरच्या पातळीवर आहे. माणूस स्वतंत्र आहे याचा अर्थ एवढाच नीतीची मागणीही एवढीच असते.

या स्वातंत्र्याच्या संकल्पनेत कारणत्व नाकारले नाही. किंबहुना कारणाचे नियततत्वसुद्धा येथे मान्य केले आहे. आत्म स्वातंत्र्य म्हणजे आत्म नियतत्व अथवा असेही म्हणता येईल की, स्वतंत्र संकल्प म्हणजे मी हा ज्याचे कारण आहे असा संकल्प.

**आपली प्रगती तपासून पहा :**

१) संकल्पाचे स्वातंत्र्य हे सविस्तर स्पष्ट करुन तुमचे मत मांडा.

## ४.६ सारांश

नियतिवादानुसार संकल्पाचे स्वातंत्र्य सर्वथा अमान्य करण्यात येते. नियतिवाद म्हणतो आत्मा व हेतू किंवा इच्छा यांचा संबंध बाह्य स्वरूपाचा आहे आंतरिक स्वरूपाचा नाही या वादाप्रमाणे मानवी संकल्प ही एक नियत घटना आहे. नियतिवाद स्वतःच्या मताचे समर्थन करण्याकरिता तीन आधार देतो.

१) मानसशास्त्रीय आधार
२) वैज्ञानिक आधार
३) धार्मिक आधार

अनियतिवादानुसार आत्मा कोणतेही कारण, कोणतेही हेतू किंवा कोणतेही तत्त्व विचारात घेऊन संकल्पना जन्म देत नाही. संकल्प किंवा निर्णय घेते प्रसंगी तो पूर्णतः स्वतंत्र असतो. आत्म-नियतिवाद दोन्ही वादांचे समन्वयात्मक स्वरूप होय. नियतिवादाप्रमाणे 'आत्मा नियत आहे' हे ही विधान या वादाला मान्य आहे. त्याचप्रमाणे अनियतीवादा प्रमाणे 'आत्मा बाह्यसत्तेद्वारा नियत नाही' हे ही विधान या वादाला मान्य आहे. म्हणुन दोन्ही वादातील सत्यांश स्वीकारुन 'आत्मा-आत्म-नियत आहे' हे तिसरे रुप धारण करुन आत्म-नियतिवाद प्रस्थापित करण्यात आला.

आपले संकल्प आपल्या शीलाकडून नियत आहेत व आपल्या कृती ज्यांना आपण संकल्पित कृती म्हणतो - संकल्पातून जन्माला येतात. कृतीपूर्व काळात संकल्पासमोर अनेक विकल्प असतात, प्रत्येक विकल्प विशिष्ट दृष्टिकोनाचे प्रतिनिधित्व करीत असतो.

जी कृती चांगली अथवा युक्त असेल म्हणजे जी विवेकाला अनुसरुन असेल तेवढीच काय ती स्वतंत्र कृती व जी वाईट अथवा अयुक्त असेल म्हणजे असंस्कारीत वासनांनी जी नियत असेल ती अस्वतंत्र कृती होय. पण हा अर्थ पत्करला तर कृती चांगली असेल तर मी संकल्प-स्वातंत्र्य उपभोगतो व वाईट असेल तर पारतंत्र्याचा बळी ठरतो असते होते. या म्हणण्यात काही पिसंगती दिसते. माणसास संकल्प-स्वातंत्र्य आहे असे म्हटल्यास ते नेहमीच असले पाहिजे, कधी असते आणि कधी नसते असे म्हटल्यास त्यास स्वाधीनता नाही. या अडचणीस उत्तर असे की, कोणत्याही वेळी विवेकयुक्त आचरण करणे माणसास शक्य असते. म्हणजेच संकल्प-स्वातंत्र्य उपभोगण्याचे स्वातंत्र्य त्यास सदैव असते. 'विवेकयुक्त कृतीत

स्वातंत्र्य असते' असे म्हणताना स्वातंत्र्य याचा जो अर्थ आहे त्याच्यापेक्षा मागील वाक्यातील 'स्वातंत्र्य' याचा अर्थ वरच्या पातळीवर आहे. माणूस स्वतंत्र आहे याचा अर्थ एवढाच नीतीची मागणीही एवढीच असते.

## ४.७ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न :

१) नियतिवाद सविस्तरपणे स्पष्ट करा.
२) अनियतिवाद सविस्तरपणे स्पष्ट करा.
३) आत्म नियतिवाद सविस्तरपणे स्पष्ट करा.
४) संकल्पाचे स्वातंत्र्य हे सविस्तर स्पष्ट करुन तुमचे मत मांडा.
५) टिपा लिहा
   १) नियतिवाद
   २) अनियतिवाद
   ३) आत्म नियतिवाद
   ४) संकल्प स्वातंत्र्य
   ५) नियतिवाद - वैज्ञानिक आधार
   ६) नियतिवाद - धार्मिक आधार

❖❖❖❖